म. ग्रं. सं. वाचनालय, पुणे

विषय नाटक

दा.क्र. १९५८९

IRBK-0119589

IRBK-0119589

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 24 APR 1983 | 25 JUL 1983 |
| APR 1983 | |
| 3 MAY 1983 | 21 JUL 1983 |
| 14 JUN 1983 | 2 AUG 1983 |
| 18 JUN 1983 | AUG |
| 1 SEP 1983 | 18 AUG 1983 |
| SEP 1983 | 21 AUG 1983 |
| SEP 1983 | 27 AUG 1983 |
| | 20 MAY 1984 |
| | 16 SEP |

( क्र. मा. प. ) २-८२

वाचनालय
नाटक
१९५८९
१५।३।८३

# राजू तू खरं सांग

शशिकांत कोनकर

IRBK-0119589
IRBK-0119589

किमत पंधरा रुपये

सुयश प्रकाशन

प्रकाशक

सुयश प्रकाशन

शशिकांत गोखले
४, वृन्दावन, नौपाडा,
गोखले रोड पोस्ट ऑफिसच्या मागे,
ठाणे–४०० ६०२.

© सुरक्षित

पहिली आवृत्ती १९८२

प्रकाशन क्र. १३

मुद्रक
सुरेश श्री. हरपुडे,
मनिषा मुद्रणालय,
१४३७, शुक्रवार, भाऊमहाराज बोळ,
पुणे–२.

# "असं लिहा असं नको"

सौ. आशास

या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क सौ. आशा शशिकांत कोनकर यांच्या स्वाधीन आहेत.

आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये.

तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि परवानगी मूल्य या संबंधात—

सौ. आशा शशिकांत कोनकर<br>
४, पांचाली, विष्णुनगर, ठाणे.<br>
या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

—शशिकांत कोनकर

# तालमीपूर्वी

" राजू तू खरं सांग " या नाटकाचे बीज अमेरीकन नाटक " विन्स्लो बॉय ". तरी राजू हे नाटक भाषांतर नव्हे.

या नाटकातील श्रीकांत, गद्रेकाका, कमाकाका या व्यक्तीरेखा स्वतंत्र. कोर्टसीनही मूळ नाटकात नाही. बँकेचा व चेकचा उपयोगही मी केलेला.

परंतु मूळ नाटक व नाटककाराचे ऋण पूर्ण मान्य.

नाटकाचे पहिले वाचन श्री. श्रीराम देव यांचेकडे झाले. श्री. सखाराम भावे, श्री. शशी जोशी, सौ. मंजिरी देव यांना नाटक खूप आवडले.

सखाराम भावे यांनी माझ्याकडून रंगावृत्ती तयार करून घेऊन नाटक परिश्रमपूर्वक बसविले. श्री. प्रभाकर सावंत या नव्या परंतु जोमदार उमेदीच्या निर्मात्याने आपल्या ' स्वयंभू ' या नाट्यसंस्थेतर्फे ते अल्पावधित धडाडीने रंगभूमीवर आणले यांत माझे स्नेही रामभाऊ बोरकर यांचाही मदतीचा हात होताच.

तसेच सौ. कुसुम बोरकर व सौ. वनिता जोशी यांचे सहाय्य मोलाचे.

आमचे प्रकाशक श्री. शशिकांत गोखले यांनी नाट्यवाचन संपताक्षणी पुस्तक काढण्याची तयारी दर्शवली. व दहा तारखेला दहा वाजता पुस्तक देतो असे सांगून ते जे पसार झाले ते दहा तारखेल दहा वाजता पुस्तकाच्या प्रती घेऊनच उगवले.

या सर्वांचे आभार... मनःपूर्वक आभार पण त्याहीपेक्षा या गुणी, परिश्रमी माणसांचा लोभ वाढावा हीच मनोमन इच्छा.

लेखक

" राजू तू खरं सांग " या नाटकाचा पहिला प्रयोग रविवार दिनांक १ ऑगस्ट १९८२ रोजी दुपारी ४।। वाजता 'राम गणेश गडकरी रंगायतन' ठाणे येथे " स्वयंभू " या नाट्यसंस्थेतर्फे सादर करण्यात आला.

| | |
|---|---|
| दिग्दर्शक / नेपथ्य / प्रकाश योजना | सखाराम भावे |
| रंगभूषा | वर्दम मेकअप् सर्व्हिस |
| पार्श्वसंगीत | सुभाष कोरगावकर |
| रंगमंच व्यवस्था | सुधीर आठवले |
| वेषभूषा | सदानंद धुरी |
| रंगमंच सहाय्यक | कोंडीबा आणि सहकारी |
| निर्मिती प्रमुख | रामभाऊ बोरकर |
| सूत्रधार | शशी जोशी |
| निर्माता | प्रभाकर सावंत |

## कलाकार

| | |
|---|---|
| श्री | दिपक पोतनीस |
| हेमा | सुषमा |
| गद्रेकाका | सखाराम भावे |
| मोहन | प्रदीप पवार |
| आई | शीला गुप्ते |
| आबा | रवि पटवर्धन |
| कमाकाका | शशी जोशी |
| ॲडव्होकेट चक्रवर्ती | सुधीर दळवी |
| राजू | कुमार अमर |

# आमची प्रकाशने

- खेळांचा राजा लॉन टेनिस– र. गो. सरदेसाई (वीस रु.)
- क्रिकेट महर्षि प्रो. दि. व. देवधर– रविंद्र पाटकर (बारा रु.)
- नक्षत्र वेध (कृष्णमूर्ती पद्धतीवरील मराठीतील पहिलेच प्रकाशन)– डॉ. म. ध. गद्रे (पंधरा रु.)
- पुष्पसंगे (एक आत्मकथन व चिंतन)– पु. शं. पतके (पंधरा रु.)
- असे हे ना. सी. फडके– अरविंद ताटके (दहा रु.)
- पु. भा. भावे– एक व्यक्तीदर्शन– अरविंद ताटके (आठ रु.)
- ग. त्र्यं. माडखोलकर– एक व्यक्तीदर्शन– अरविंद ताटके (आठ रु.)
- मुक्ता (कादंबरी)– सुनिता देवधर (नऊ रु.)
- पाच तीन दोन (विनोदी कथासंग्रह)– अनंत तडवळकर (दहा रु.)
- बाजे पायल छुम् छुम् व पाताळसरिता– नयना आचार्य यांच्या दोन कादंबऱ्या (तीस रु.)

## श्री शशिकांत कोनकर यांची निर्मीती

नाटक– तीन घोडे अडीच घरात. / खुनी पळाला काळजी नसावी / मृगजळावर एक सावली / हनिमून एक्सप्रेस / इकडे व्हीलन तिकडे मिलन / लव्हगेम / पत्त्यात पत्ता / कलीकवच.

एकांकिका– ठिपक्यातील तरुणी / इच्छा / किती रंगला खेळ.

अर्थशास्त्र प्रकाशने– अर्थशास्त्राची रुपरेषा / चलनशास्त्राची मूलतत्त्वे / विकासाचे अर्थशास्त्र / अर्थशास्त्राचा अभ्यास

कथा संग्रह– मिठीत मावणारी बायको / उचक्या

कादंबऱ्या– मुद्रिका / ग्रहण

बालवाङमय– चोपन्न गोष्टी / छानदार इसापनीति / सिंदबादच्या सात सफरी / चतुर बिरबल / मी तुला खाणार / महाभारतातील छान छान गोष्टी / गुलबकावली / पंचतंत्र व हितोपदेशातील छानदार १८ गोष्टी / हातीमताई / छोटे अरेबियन नाइटस् / प्रवासी गलिव्हर / वेताळ पंचविशी / गोष्टींचे शतक / चांदोबाचा डाग / बाळोबा आणि भोळोबा / चीनमधला वैद्य / तीन रुपयांची गोष्ट.

बँक ऑफ इंडियातील एक आधि-कारी आणि अर्थशास्त्रावरील पुस्तके लिहिणारे श्री. शशिकांत कोनकर हे ललित लेखनात विशेष रमणारे. बालसाहित्याद्वारे छोट्यांसमोर आणि रंगभूमीतर्फे छोट्या मोठ्यांसमोर येणारे कोनकर हे नाट्यविषयात जास्त रमणारे. त्यादृष्टीने त्यांच्याकडून बरेच काही अपेक्षित आहेत आजचे रसिक आणि मार्मिक समिक्षकसुद्धा.



# परिशिष्ट

पृष्ठ क्र. ९५ वरील ओळ पाचवी

हेमा– काय झाले रे राजू

यानंतर खालील मजकूर वाचावा

(स्टेजवर राजू आणि हेमा, मोहन येतो. त्याच्या हातात मिठाईचा वॉक्स )

मोहन– हेमा !... हेमा !... कॉंग्रेच्युलेशन्स !... हेमा तुम्ही केस जिंकलात. कोर्टानं राजूची निर्दोष मुक्तता केली.

हेमा– म्हणजे ? तू कोर्टात गेला होतास ?

मोहन– नाही. इथून जड पावलांनी निघालो तो थेट घरी. तोच काका आले.

हेमा– काकासाहेब ?

मोहन– हो, आणि माझ्या हातात हा मिठाईचा वॉक्स ठेऊन म्हणाले ' जा नुसते विचार करत बसू नका. सांगा बातमी. कोर्टानं राजूची निर्दोष मुक्तता केली, तस्साच आलो.

हेमा– ( आश्चर्याने ) म्हणजे ? काकासाहेब केसचा निकाल ऐकायला कोर्टात गेले होते ?

मोहन– हो, कुणालाहि न सांगतासवरता. हेमा तुम्ही केस जिंकलात.

हेमा– ( शांतपणे ) आम्ही केस जिंकलो असलो तरी आमच्या एकूण आर्थिक परिस्थितीत काहीच फरक पडत नाही मोहन. तत्त्वासाठी व्यावहारीक तडजोड न करणाऱ्या घरातली मुलगी सून म्हणून काकासाहेबांना–

मोहन– ... बाई ग !... तिकडे काकांनी मोजक्या शब्दांत खरडपट्टी काढली. आता तू !... साष्टांग नमस्कार घालू का ?

हेम– का ?

मोहन– माझा गाढवपणा. आमच्या घरातले सगळे या केसबद्दल जे बोलत होते त्यावरून मी समज करून घेतला की सगळे आपल्या लग्नाच्या विरुद्ध आहेत. काका शब्दही बोलत नव्हते. म्हणजे तेही नको म्हणणार हा माझा निष्कर्ष. पहिला गाढवपणा. मी ठरवलं. वेगळं रहावं लागलं तरी हरकत नाही. लग्न तुझ्याशीच करायचं. म्हणून, मित्राच्या सल्ल्यानं कुणालाहि न विचारता मी ब्लॉक ' बुक ' केला. दुसरा गाढवपणा. आणि इथं पैसे मागितले, गाढवपणाचा कळस, याबद्दल काकांकडून कानपिचक्या मिळाल्या. आता तू बोल.

मी फक्त आपल्या दोघांचाच, तोही तुझ्या माझ्या लग्नाचा विचार करत होतो. माझं चुकलं

( साष्टांग नमस्कार घालू लागतो. )

( तोच श्री येतो )

श्री– ओ !. सॉरी. आई . . . बाबा . आई, राजू निर्दोष सुटला. आपण केस जिकलो.

( आई बाहेर येते. आणि आबांना सांगायला वर जाते. (हेमाला) . . नाही. तुला सांगायची गरज नाही हे इथं आले आहेत म्हणजे. .

मोहन– ( हसत ) प्रत्येकाची आनंद व्यक्त करण्याची ठिकाणं वेगळी !

श्री– नाही. ठिकाणं वेगळी असू देत. पण तुमची ही . ही . . पद्धतही मला वेगळी दिसते.

हेमा !. मी कसा आनंद व्यक्त केला माहित आहे ? तिचे दोन्ही हात धरून . पपांच्या देखत . आणि हे . हे तुझे पाय धरून हो हो आई मिलन की बेला देखो आई . आई ऽ ऽ

हेमा– एवीतेवी उशीरच केलास ना ? मग येताना पपांना आय मीन आमच्या चक्रवर्तींना नाही का घेऊन यायचंस बरोबर ? त्यांनी एकदा सांगितलं म्हणजे आबांचं समाधान.

श्री– कसा आणणार ? माझा नी वेलाचा नाही असा त्यांचा नी गद्रेककांचा ब्रॅकेट झालाय. गद्रेकाका सोडायला तयार नाहीत त्यांना.

हेमा– का ते ?

श्री– अग पपा नी गद्रेकाका पुण्याच्या नुतन मराठीचे काय योग आहे !

गद्रेकाकांच्या घरी जाऊन मग ते दोघं येताहेत. मला हाकललं त्यांनी पुढं.

हेमा– अस्स होय. तरीच कुस्मीची धावपळ चाललीय.

श्री– काय मोहनराव !.. तुम्ही नेमके हवं तिथं नसता. ए आई ! अग अशी काही धमाल आली कोर्टात. आपल्या काकाकुवाला तू कोर्टात बघायला हवं होतंस काय रुबाब !. . काय मिजास आयला. जसा काही हाच चक्रवर्तींची क्रॉस घ्यायला उभा. वा रे काका.. कोर्टानं पुकारलं यमाजी भास्कर करमकर, कमलाकर भास्कर करमकर.

( कोर्ट सीन सुरू ) ( पुकारा )

.. कमलाकर भास्कर करमकर.

( कमाकाका झकपक पोशाखात येऊन टाय चा चपीत उभा रहातो. चक्रवर्ती उलट तपासणीला सुरुवात करतात)

यापुढे पृष्ठ क्र. ९६ वरील ओळ २३ वी

चक्रवर्ती– आपलं नाव

आणि पुढील मजकूर

# अंक पहिला

म. श्री. सं. ... वाचनालय ...
क्र. ... दि. ...
वि. ... 15/3/...

(आबासाहेब करमरकर यांच्या दोन खणी खोल्यांपैकी बाहेरची खोली)

खोलीतील एकूण फर्निचरवरून या खोल्यांचे भाडे भरत असलेला माणूस मध्यमवर्गातील असावा असा अंदाज करता येतो.

बाहेरच्या खोलीतून आतील स्वयंपाकघराचा जो भाग दिसतो त्या भागातील भांडी मोजकीच असून अत्यंत टापटीपीने लावलेली आहेत.

बाहेरच्या खोलीत लोकमान्य टिळक, गुरुवर्य टागोर, यांचे फोटो टांगलेले आहेत. एक दोन जुने ग्रुप फोटो.

बाहेरच्या खोलीत टेबल–खुर्ची, शिवणाचे मशीन, शेजारी पुस्तकांची आलमारी.

पडदा उघडतो तेव्हा साधारण दुपारची वेळ.

खोलीत टेपरेकॉर्डरवर धम्माल हिंदी गाणे भसाड्या आवाजात लावलेले आहे. जणू घर म्हणजे इराण्याचे हॉटेल वाटावे इतका त्या गाण्याचा आवाज मोठा आहे.

श्रीनिवास वय वर्षे २२–२३.

आजूबाजूला अभ्यासाची पुस्तके घेऊन त्या पसाऱ्यात झकासपैकी हिंदी गाण्याच्या सुरावर ताल घेऊन टेबल बडविण्यात मग्न.

" मेरा दिल अब तेरा हो साजना "

" कैसा जादू फेरा हो साजना..."

गद्रेकाकांच्या घरी जाऊन मग ते दोघं येताहेत. मला हाकललं त्यांनी पुढं.

हेमा– अस्स होय. तरीच कुस्मीची धावपळ चाललीय.

श्री– काय मोहनराव !.. तुम्ही नेमके हवं तिथं नसता. ए आई !.. अग अशी काही धमाल आली कोर्टात. आपल्या काकाकुवाला तू कोर्टात बघायला हवं होतंस काय रुबाब !.. काय मिजास आयला. जसा काही हाच चक्रवर्तींची क्रॉस घ्यायला उभा. वा रे काका.. कोर्टानं पुकारलं यमाजी भास्कर करमकर, कमलाकर भास्कर करमकर.

( कोर्ट सीन सुरू ) ( पुकारा )

.. कमलाकर भास्कर करमकर.

( कमाकाका झकपक पोशाखात येऊन टाय चाचपीत उभा रहातो. चक्रवर्ती उलट तपासणीला सुरुवात करतात)

यापुढे पृष्ठ क्र. ९६ वरील ओळ २३ वी

चक्रवर्ती– आपलं नाव

आणि पुढील मजकूर

# अंक पहिला

म. ग्रं. सं. ... शाखा.
बा. क्र. ९०५८९ ग्रं. वि. ...
वि. ... नाटक ... दि. १५।३।८३

(आबासाहेब करमरकर यांच्या दोन खणी खोल्यांपैकी बाहेरची खोली)

खोलीतील एकूण फर्निचरवरून या खोल्यांचे भाडे भरत असलेला माणूस मध्यमवर्गातील असावा असा अंदाज करता येतो.

बाहेरच्या खोलीतून आतील स्वयंपाकघराचा जो भाग दिसतो त्या भागातील भांडी मोजकीच असून अत्यंत टापटीपीने लावलेली आहेत.

बाहेरच्या खोलीत लोकमान्य टिळक, गुरुवर्य टागोर, यांचे फोटो टांगलेले आहेत. एक दोन जुने ग्रुप फोटो.

बाहेरच्या खोलीत टेबल–खुर्ची, शिवणाचे मशीन, शेजारी पुस्तकांची आलमारी.

पडदा उघडतो तेव्हा साधारण दुपारची वेळ.

खोलीत टेपरेकॉर्डरवर धम्माल हिंदी गाणे भसाड्या आवाजात लावलेले आहे. जणू घर म्हणजे इराण्याचे हॉटेल वाटावे इतका त्या गाण्याचा आवाज मोठा आहे.

श्रीनिवास वय वर्षे २२–२३.

आजूबाजूला अभ्यासाची पुस्तके घेऊन त्या पसाऱ्यात झकासपैकी हिंदी गाण्याच्या सुरावर ताल घेऊन टेबल बडविण्यात मग्न.

" मेरा दिल अब तेरा हो साजना "

" कैसा जादू फेरा हो साजना..."

आवाज आता असह्य होईल इतका मोठा आवाज.

(आतून बायकी आवाजात)...श्री !...ए श्री !...

(श्री ला आतली हाक ऐकूच येत नाही.)

ए...श्री ! ...

(एकदम कुणीतरी हाक मारते हे कळल्यावर-)

(आतून) तुझा अभ्यासच चाललाय ना ?

श्री- (बेदरकारपणे) हो !...

(आतून) आज पूर्ण व्हायला पाहिजे हं तेवढा विषय !...

श्री- हो ग !...होईल.

(टेपवरचे संगीत आणि तबला चालूच)

हेमा- (आतून तिखटपणे) बी. कॉम्‌ला बसणार आहेस ना रे श्री ?

श्री- हो ग !...बसणार !- यंदा ड्रॉप घेऊन कसं चालेल ?

(पुन्हा गाण्यावर ताल धरतो.)

एकदम काहीतरी आठवण येऊन-

शिश्टर !...ए शिश्टर !...तू जेवायला वाढ आपल्याला.

(हेमा तरातरा बाहेर येते. वय वर्षे २४. स्मार्ट !...

आल्या आल्या खाड्कन् टेप बंद करते. श्रीनिवास जेवायची ॲक्शन करून दाखवतो तोच-

हेमा- ना...ही. गिळायला मिळायचं नाही. तू प्रथम तेवढा भाग पूर्ण कर मग जेवण. आबांनीच बजावलंय मला तसं !...

श्री- आयला !... तू पण अश्शी आहेस. वाढ ना आता... वाजले किती ?

हेमा- आई आबा येतील इतक्यात !

श्री- आई आबांची काय भाजी करायचीय !... मी शाकाहारी आहे. नरमांसभक्षक नाही.

हेमा- श्री !... तू काय बोलतो आहेस ते सगळं सांगेन हं मी आबांना.

श्री- जा... आत जा... ढवळा चमचा.

(मोठ्यांदा वाचू लागतो.)

द चेंबरलीनज् कन्सेप्ट ऑफ मोनॉपॉलीस्टिक कॉंपिटीशन ॲन्ड जोन रॉबिन्सनज् कंसेप्ट ऑफ इम्परफेक्ट कॉंपिटीशन ऑर मोर ऑर लेस

सेम. द इक्वीलिब्रियम प्राइस इज ऑलवेज अॅट मार्जिनल रेव्हन्यू अॅन्ड मार्जिनल कॉस्ट...

...विषय फिनिशड् ग !...आता वाढून ठेव...पोळी एकदम गरम पाहिजे. आबा जसे आपल्यावर गरम होतात तश्शी !–

हेमा– (बाहेर येत) हो...हो...इथं नोकर ठेवलेत तुझ्यासाठी.

...श्री !...तुला भीती नाही का रे वाटत नापास होण्याची ?

श्री– छ्या: !...अपयशाचे भय हेच मुळी अपयशाचे कारण असते. मी यशस्वी होणारच असा आत्मनिर्धाराचा दीप हाती धरून माणूस चालू लागला की त्याला पुढच्या पावलावर नेहमी उजेड पडलेला दिसतो.

हेमा– श्री !...

श्री– असं आपले आबाच म्हणतात...

हेमा– श्री !...चेष्टा नको...मी तुला बजावून सांगते...तुझा अभ्यास झाल्याशिवाय...

श्री– (उसळून) अगं पण भूक लागली की कॉन्सेंट्रेशन जातं माझं !... मला आत्ता ताबडतोब जेवायला बसायला हवं !... (तिच्या कानाजवळ तोंड नेत) समझी ?

हेमा– शी: !...तोंडाला सिगरेटचा वास येतोय तुझ्या !...

श्री– या बाबतीत आम्ही मासाहेबांना योग्य तो खुलासा दिलेला आहे.

हेमा– काय खुलासा दिलास रे ? मला तरी कळू दे.

श्री– आपलं त्या मोहन्याशी जमलं असलं तरी आपण अजून लहान आहात !–

हेमा– फाजिलपणा बंद कर पाहू. माझी अजून कामं पडलीत. कपडे धुवायचे आहेत. भांडी अडगवायचीत...

श्री– मग इतका वेळ केलंस काय ? नुसती स्वत:च्या साड्यांना इस्त्री ?

हेमा– साड्यांना नाही. आपल्याच बुशशर्टला नी पॅन्टला करीत होते.

श्री– माझे आई !..माझ्या पॅन्टला तू इस्त्री करू नकोस.

हेमा– काही पैसे खर्चायला नकोत. चांगली होते इस्त्री.

श्री– कमाँची चांगली त्या दिवशी कॉलेजला पॅन्ट घालून गेलो तर सगळ्यांच्या पॅन्टला पुढे इस्त्री. आणि आमच्या पॅन्टला ही अशी

आडवी. पार आडवा केलास मला.

हेमा– श्री !...गोष्ट बदलू नकोस.

श्री– कशाबद्दल म्हणतेस तू ?

हेमा– सिगरेटबद्दल आईला काय सांगितलंस तू ?

श्री– मी म्हणालो, ' माते, मी सिगरेट, विडी, काडी, असली चिल्लर व्यसने करीत नाही. माझ्यासारखी ग्रेट माणसे ग्रेट व्यसने करतात.

हेमा– मोहनने सुद्धा तुला पाहूचलं !–

श्री– हुचः !...तो स्वतःच दिवसभर फुंकत असतो. आणि दुसऱ्यांना बदनाम करीत फिरतो.

हेमा– नाही हं श्री !–

श्री– तो तुला सांगणार !...नी तू ऐकणार !... (ओरडून)...जाने दो... वाद नकोय मला. जेवायला वाढा...भूक लागलीय इथं. भूक.

हेमा– इतकी काही भूक लागलेली नाही तुला. सकाळी हडसलंस !... हातावर पाणी पडलं की पळायचं असेल तुला. कुठं जायचंय ?

श्री– जायचंय !...विचारलंस ?

हेमा– बेला बरोबर असेल.

श्री– कुणी सांगितलं ?

हेमा– कळलं !

श्री– मोहन्या असेल तुझा. नेहमी जळतो साला ! तो माझ्यावर.

(मागे दरवाजात एक तरुण उभा.)

मोहन– काय म्हणताय ?

श्री– या... मोहनराव. जा... इस्त्री बघ. नेहमी जळतो साला.... माझा बुशशर्ट ! हिच्या हातून.

श्री– आलीच ती. बसा .. तुम्ही बसा. हेमाताई चहा टाक ग !

मोहन– नाही... नको... मला नको.

श्री– नाही. तुम्हाला नाही ' टाक ग ' म्हणजे चहाचा चोथा. आम्ही आत्ताच घेतला ना !

मोहन– हो का ?

श्री– हो ना ! कसं काय येणं केलंत ? अचानक ?

मोहन– नाही. म्हणजे झालंय काय ! ... आमची मावशी अचानक आली.
श्री– मग ? तुम्ही कंटाळून इकडे आलात !
मोहन– नाही... नाही... मी इकडे अशाकरता आलो... या म्हाताऱ्या बायका म्हणजे अगदी... सारखं म्हणतेय मला बघायचीय... हेमाला.
श्री– हो... आलं लक्षात.
मोहन– तिला जमत असेल तर घेऊन जाईन.. आमच्या घरी.
श्री– (पुस्तकाशी चाळा करीत) कठीण आहे.
मोहन– का ? अगोदर कुठं जायचं ठरलंय ?
श्री– नाही. तुम्हाला नाही. इकॉनॉमिक्स कठीण आहे.
मोहन– हं ! ... हं ! ... तिला न्यायला हरकत नाही ना ?
श्री– छे !... छे ! छे... हरकत कसली ? पण आबांना विचारायला हवं !
मोहन– आबा कुठे आहेत ?
श्री– बाहेर गेलेत.
मोहन– केव्हा येतील ?
श्री– बाहेर जाणाऱ्या माणसाचं काय येण्याचं सांगता येतंय ! येतील आज संध्याकाळपर्यंत.

(हेमा एक डबा घेऊन बाहेर येते–)

हेमा– श्री !
श्री– तो तुझा पैशाचा डबा ठेवून दे. हे मोहनराव काय सांगताहेत बघ !
मोहन– (खाकरत) मी अशासाठी आलो...

(तोच दारात गद्रेकाका येतात. शेजारी. आबांचे मित्र. पेन्शनर)

श्री– (तुटकपणे) या गद्रेकाका ! ... हेमा, आपला पेपर द्या...
गद्रेकाका– (सगळ्यांकडे बघत) डिस्टर्ब नाही ना केलं कुणाला ?

(तिघे मानेने नाही म्हणतात) हाँ ! मग ठीक. (गद्रेकाका आरामात बसतात. श्री त्यांच्या हातात पेपर देतो.)

गद्रेकाका– (मोहनला) सकाळपासून बघितला नव्हता. म्हटलं आबांचा वाचून झाला की जावं !

हल्ली पेपरात असतं काय म्हणा बघायला ! चार नाटकं, सिनेमाच्या चटोर जाहिराती... आणि फुटकळ बातम्या ! मी आमच्याकडे बंद

केला. मुलं नेमकं नको ते वाचतात आणि बिघडतात. (पेपरात डोकं घालतात.)

श्री– गद्रेकाका ! घेऊन जा तुम्हाला हवा असेल तर !

गद्रेकाका– नको. माझं आपलं एक तत्त्व आहे. कुणाकडून काही उसनंपासनं घ्यायचं नाही. घरातसुद्धा.. स्ट्रिक्ट वार्निंग ! नो.

आता हा पेपर ! ... इथं बसून चाळणार. आणि लगेच देऊन टाकणार. दुसऱ्याच्या घरची वस्तू आपल्या घरात नको.

(पेपरात डोकं घालून बसतात) (मोहन आणि हेमा एकमेकांच्या जवळ येतात.)

मोहन– तू येऊ शकलीस तर बरं होईल.

हेमा– अय्या ! .. आत्ता ?

मोहन– का ?

हेमा– आई-बाबा घरात नाहीत. त्यांना विचारायला हवं ना ?

गद्रेकाका– (पेपरातून) हो.. हो... विचारायला हवंच ! चांगलं खडसावून विचारायला हवं ! एकसारखे पक्ष बदलतात (ओशाळून) नाही... नाही. तुम्हाला नाही. तुमचा कुणाचा खोळंबा होत नाही ना ? (हेमा श्रीला खुणा करते.)

श्री– नाही. खोळंबा कसला ? आम्ही आता जेवायलाच बसतो आहोत !

गद्रेकाका– मग बसा... बसा की !... मला काही आबांचं घर परकं नाही. तुम्ही बसा. एवढा अग्रलेख संपवतो नी निघतो.

श्री– तुम्ही घेऊनच जा ना गद्रेकाका. आरामात संध्याकाळी दिलात तरी चालेल. आता नाही कुणाला वाचायचा ! आणि तू जा की !... थोडा वेळाचा तर प्रश्न आहे.

गद्रेकाका– हो... हो... तू मात्र लगेच नीघ हो ! आमची कुसुम वाट पहात असेल. आणि आमच्या घरी सांग म्हणावं काका पेपर चाळून येतातच .. आँ ! (श्रीला) पण तुला कसं कळलं आमच्या कुसुमनं हिला बोलावलेलं ? मी निरोप दिला का ? की नाही ? आँ !... हे असं होतं पहा आमच्या डोक्याचं.

कुसुमनं तुला निरोप दिलाय ! आत्ताच्या आत्ता बोलावलंय. ती

काहीतरी विणतेय... सगळे टाके चुकलेत. जा... जा पळ.

हेमा– हो निघतेच काका–(मोहनला) आता मी असं करते. थोड्यावेळाने येते. तेवढ्यात आई बाबा येतीलच.

मोहन– केव्हा येशील ?

हेमा– संध्याकाळी आले तर चालेल ? मावशी रहाणार आहेत ना ?

मोहन– नाही... हो... म्हणजे आपलं !

हेमा– संध्याकाळी येते की, पाच वाजता.

मोहन– पण मग पुन्हा यायला रात्र होईल.

हेमा– घरी सांगितलं असलं म्हणजे हरकत नाही.

मोहन– (नर्व्हस होत) हो... हो... तेही खरंच म्हणा. मग निघू मी ?

गद्रेकाका– हो. तुम्ही निघा. (हेमाला) तू आता पहिली आमच्याकडे जा. कुसुम मला म्हणालीसुद्धा तिकडेच गप्पा मारत बसू नका. गेल्या गेल्या हेमाला पाठवा. चल... चल... चल... (उठतात) (हेमा पुढे)

मोहन– बरं ! मी निघतो.

श्री– (गालात हसत) एवढ्यात ? ताई जळाला बघ !

मोहन– हो. म्हणजे मग घरी जाऊन तसं सांगतो.

श्री– (मोहनकडे पहात) ताई ! अग शेगडीवर काय ठेवलंस तू ? जळाल्याचा वास येतोय. बघ... बघ... (हेमा घाईने आत जाते) गद्रेकाका, तुम्हीही घरी जाऊन सांगा. येते ती.

गद्रेकाका– फक्त पाच मिनिटांसाठी. टाके चुकलेत तेवढे बरोबर करून द्यायचे की आमच्या कुसुमची गाडी चालू.

श्री– हो ... हो ... ( गद्रेकाका जातात )

मोहन– मीही निघतो.

श्री– तिकीटं परत करणार असाल आता ?

मोहन– म्हणजे ? ( गोंधळून ) तुम्हाला कसं कळलं ?

श्री – शर्टच्या वरच्या खिशात ठेवलीत ! रंग समजत नाही तुम्हाला जायचंय पिक्चरला ? मग जा ना !

मोहन– ( चेहरा पाडून ) एकटा ?

श्री– मी येऊ ?

( मोहन नुसताच हसतो )

ताई येईल. मी पाठवतो तिला पंधरा मिनिटांत. तुम्ही तोवर तिकडे नेहमीच्या इराण्याच्या हॉटेलात बसा. मी करतो बरोबर !

( मोहन निघून जातो. हेमा येते. )

हेमा– हे काय ? गेले ते ?

श्री – तू नाही म्हणालीस !

हेमा– रागावला असेल आता !

श्री – रागावणारच. मला जर कुणी असं नाही म्हटलं असतं तर मी तिच्या घरात थैमान घातलं असते.

हेमा– तिच्या म्हणजे कुणाच्या ?

श्री– कुणाच्याही असेल.

हेमा– कुणाच्या कसं ? ( त्याची टेबलावरची वही घेत ) या वहीत काय लिहिलंय ! .. माय डिअर बेल.

श्री ! . . आशंना तुझं हे . . - तिच्या मागं करणं.

श्री–काही होणार नाही. तुझा मोहन्या नाही का तुझ्या मागं मागं करतो.

हेमा– श्री ! . . . असलं नाही हं त्याचं !

श्री – हे सोड हं ! . . . पूर्वी तर सारखा आपल्या राजूला विचारायचा. तुझी हेमा शिस्टर कोणत्या क्लासला जाते !

किती वाजता जाते ? कधी परत येते ? आयला ! . . . मला विचार. राजू कमाकाकाकडे गेल्यावर वांधे झाले बिचाऱ्याचे.

एकदा कॉलेजातून बाहेर पडताना माझ्याजवळ आला आणि म्हणाला, " एवढं पुस्तक तुमच्या शिशटरला द्याल का ? "

आपण पुस्तक घेतलं तर कव्हरात चिठ्ठी ! . . . तो घाईने निघून जात होता मी म्हटलं, " मिस्टर ! हे बघा पुस्तकात तुमचं पत्र राहिलंय ! . . . " आणि तुला लिहिलेली चिठ्ठी त्याला परत दिली. चेहरा बघण्यासारखा झाला त्याचा ! . . . कारण चिठ्ठी पोचविण्यासाठी पुस्तकाची लाईन होती.

हेमा– हो. पण किती हुशार आहे तो. कॉलेजातसगळ्या प्राफेसर्स चा

आवडता.

श्री – तो फेकतो नी तू ऐकतेस ! सगळ्यांना पोलसन लावत बसलो तर आम्ही पण प्रोफेसरचे लाडके होऊ.

काय पण सांगू नकोस. तू निघालीस की हा तुझ्या मागे. तू कुठल्या त्या काथ्याच्या नी भुश्याच्या बाहुल्या करायच्या क्लासला जायचीस ! चांगल्या वस्तूंच्या चिध्या करायच्या नंतर चिध्याच्या बाहुल्या करायच्या.

हा स्कॉलर तिकडे भुश्याच्या बाहुल्या करायला फुक्कट आपल्या आबांवर इंप्रेशन मारलंय !

हेमा– काही नाही हं श्री ! . . . तो आपल्या घरीसुद्धा येत नव्हता. तू बेलाच्या फ्लॅटवर तास न् तास वाहिलेला असतोस !

श्री – अग येत नव्हता म्हणजे काय ! . . . सभ्य म्हणून नाही काही. मी माझ्या फ्रेन्डसर्कलमध्ये सांगितलं होतं "साला, माझ्या बहिणीच्या वाटेला कोण जाईल ना तर हॉकी स्टीकनी डोकंच आऊट करीन त्याचं ! . . ." आपल्याशी जास्त बोलत नाही तो . . .

हेमा– तुझ्याशी मुळी बोलण्यातच अर्थ नाही. मला इतकं माहीत आहे कारणाशिवाय तो कधीही येणार नाही तू मात्र बेलाच्या फ्लॅटवर...

श्री– कारणाशिवाय जातो. तो येण्यासाठी कारण काढतो. म्हणजे त्या येण्याला 'वेट' येतं.

बरं ! जातेस ना आता तू ? त्याच्याबरोबर पिक्चरला.

हेमा– पिक्चर ? कुठलं पिक्चर ?

श्री– मग ? मघापासून तो तुला खाणाखुणा करत होता कशासाठी ? सालं मला कळायला नको ते माझ्या लक्षात आलं. आणि जिला कळायला हवं तिथं बोंब !

हेमा– अय्या ! खरंच का रे ?

श्री– खरं म्हणजे ? तिकिटंसुद्धा काढून आणली होती. तू म्हणजे आयला आहेस तशी बिनडोकच.

हेमा– आता काय करू रे ? गद्रेकाकांकडे अजून जायचंय.

श्री– गद्रेकाका और कुसुमको मारो गोली. साडी बदल आणि पळा. कोप-

प्यावरच्या इराण्याच्या हॉटेलात बसवून ठेवलाय त्याला मी.

हेमा– पण आई बाबा.

श्री– मी सांगेन. जा आटप आता. (लाडीगोडी लावत)ताई ! ए हेमाताई रेनबो टॉकीजला टॉप इंग्लिश पिक्चर लागलाय. पैसे दे ना !

हेमा– माझ्याकडे एक पै नाही.

श्री– मघाशीच तर डब्यातले पैसे खुळखुळवत होतीस. दे ना ! इंग्लिश पिक्चर आहे. आम्हाला कादंबरी आहे ती अभ्यासाला. आबा म्हणतात फक्त पुस्तकातला किडा होऊन अभ्यास करण्यापेक्षा त्या त्या विषयातले आजूबाजूचे ज्ञानही मिळविण्याचा...

हेमा– बस् झालं ! प्रत्येक पिक्चरच्या वेळी तू हेच सांगतोस ! अशा किती कादंबऱ्या आहेत रे तुम्हाला अभ्यासाला ?

श्री– तू साला माझ्यावर खुन्नस काढणार. आपला पिक्चर घालवणार !.. आणि आबांच्या लेक्चरला बसायला भाग पाडणार !...दे की हेमाताई...फक्त. .

हेमा– नाही हं !...माझ्याजवळ पैसे नाहीत. (हेमा झटकन् आत जाते... श्री टेप सुरू करतो.)

ये पैसा ये कसा...

नही कोई ऐसा...

तोच बाहेरून कडी वाजते. श्रीनिवास टेप बंद करतो. आणि पुस्तक हातात धरून मोठमोठ्यांदा वाचू लागतो.

इक्वीलिबियम प्राइस...

हेमाताई !...दार उघड...कोण आलंय...बघ जरा कुठं कॉन्सेंट्रेशन होत होतं तर...आलो आबा ..

(पुस्तक हातात घेऊन नम्रपणे दरवाजा उघडतो. दारात एक चवदा वर्षांचा मुलगा शाळेचा युनिफॉर्म. तो आत येतो. चुणचुणीत. लांबून आल्यासारखा वाटतो. त्याचा चेहरा थकलेला आणि घाबरलेला आहे. उन्हातून आल्याने घामाने त्याचा शर्ट ओला झाला आहे. तो कपाळावरचा घाम पुसतो. आणि चोरासारखा हलकेच आत येतो.)

श्री– (आश्चर्याने) आयला तुम्ही ? या...मी काय जाम टरकलो. मला वाटलं आई आबाच आले हृचः... (पुस्तक दूर भिरकावून देतो)... हेमाताई !... तुझं कोकरू आलंय बघ.

श्री–...मध्येच टपकलास ? भऱत्यावेळी ?

राजू– हं !...

श्री– बॅग कशाला घट्ट धरून बसला आहेस ? नोटांची पुडकी भरून आणलीस काय बॅगेत ?

(राजू गोरामोरा होत नाही म्हणतो.)

राजू– (हलक्या आवाजात) बॅग कुठं ठेवू दादा ?

श्री– ठेवा आमच्या बोडक्यावर !...

(राजू शांतपणे बॅग कपाटाच्या खणात ठेवायला जातो तो–)

ए !...माझ्या खणात ठेवशील तर थोबडीन हं !..सांगून ठेवतो च्याआयला !...

राजू– (चांचरत) पण..मी माझ्याच खणात ठेवतोय !...

श्री– तो खण आता मी घेतलाय !...

राजू– पण मी आलोय !...आता माझा खण मला देऊन टाक की...

श्री– मी तो खण मे महिन्यात रिकामा करणार आहे. तू अगोदर आलासच का ?

राजू– (रडवेला होत) मग मी बॅग कुठे ठेवू ?

श्री– फेक तिकडे. शामळूभाय साला...

(राजू बॅग कोपऱ्यात ठेवणार तोच–) तिथं काय ठेवतोस !... उचाल...उचाल...जा ..वर व्यवस्थित नेऊन ठेव.

हेमा– (बाहेर येत)...अय्या !..कोण ? राजू ? केव्हा आलास ?...बॅग वर घेऊन कशाला जातोस ? असू देत तिथेच.

श्री– असू देत काय ? आबा आले की मला बोलतील. आल्याबरोब्बर आबा या शामळूभायला विचारणार,

" राजू !...बॅग इथं का ठेवली ?"

शामळूभाय म्हणणार, " दादानी सांगितलीन् म्हणून मी ठेवली." बोंबला !...

हेमा– थांब रे श्री !...असं काय करतोस ? मी ठेवीन ती.

श्री– अगं तुला जायचंच ना आत्ता...मनमोहना...

हेमा– पण आता हा आलाय ना !...

श्री– मी आहे. कुठंही जात नाही. बस्. तू जा...

हेमा– आणि जेवण ?

श्री– आम्ही हाताने घेऊ. नाहीतर आई आबा येतीलच की...

हेमा– आबांनी विचारलं तर–

श्री– नीट सांगेन. चमचा, नाय ढवळणार ! जा...

राजू– ताई !...तू बाहेर जातेस ?

हेमा– हो. मी येते हं थोडचा वेळात. का रे ? जाऊ ना ?

श्री– तिला जाऊ दे रे !...मी आहे.

हेमा– निघू मी राजू ?

राजू– (मान फिरवून) हं !... (हेमा जाते.)

श्री– काय रे ए ? केव्हा आलास ?

राजू– मगाशीच आलो.

श्री– आयला ! ..मग इतका वेळ काय करत होतास ?

राजू– (थरथरत) बाहेर उभा होतो.

श्री– एकाएकी आलास ? सुट्टीला अवकाश आहे ना अजून ?

राजू– हो.

श्री– मग ? असा कसा आलास ?

राजू– आईची आठवण आली.

श्री– कमाकाका नाही आला बरोबर ?

राजू– नाही.

श्री– का ?

राजू– मी कुणालाही न सांगता आलोय !...

श्री– म्हणजे ? कमाकाकाला आणि काकीला माहीत नाही तू इथं आलास ते ?

राजू– नाही.

श्री– आयला !...आता पुरी भरली तुझी. शाळा बुडवून आलास ना ?

आबा आता तुला तुडवणार !... (राजूचा चेहरा रडवेला)
..ए !...आता रडण्याची ॲक्टिंग करू नकोस.

राजू– आई, आबा कुठे गेलेत ?

श्री– बाहेर. हेमाताईचं ठरतंय ना !...खरेदीला गेलेत. चल...चल.. ते येण्याच्या आत तुझा बाडबिस्तरा उचल ..हा टेपरेकॉर्डर पण उचल... एकदम वर...

राजू– टेप तू ने की !...

श्री– आयला...उलट उत्तर !...आबांनी खाली बघितला तर वैतागतील ना !
(तितक्यात राजूच्या हातातून बॅग सुटते)
काय रे !...कमाकाकांनी जेवायला घातला की नाय !..,तू जा... मी ठेवतो. पाडला बिडलास तर आफत...आपला नाय...मित्राचा आहे. जेवायचं असेल तर चल...हेमाताईनं नेमका तुझ्या आवडीचा रस्सा केलाय !...

राजू– मला भूक नाही.

श्री– का ? काकीनं पंच पक्वान्न घातली वाटतं खायला ? आयला !...
(श्री बॅग घेऊन वर जातो.
राजू एकटा.
अत्यंत अस्वस्थ.
खिशातून पाकीट काढतो.
त्यातील मजकूर वाचतो. वाचता वाचता त्याच्या डोळ्यांत पाणी.
तोच दारात आई आबांची चाहूल.
घाईघाईने राजू पाकीट खिशात ठेवतो आणि आतल्या खोलीत जातो.
आबा वय ४८. आई ४४ च्या आसपास.
श्री निवास जिन्यात)

आई– काहीतरीच किमती सांगतात मेले एकेक.

श्री– (जिन्यातून) काय झालं माते ?

आई– व्हायचंय काय ? एक पैसा कमी करायला तयार नाहीत.

श्री– अरा. रा...

आई– तू आणखी चेष्टा करू नकोस मेल्या.

श्री– चेष्टा नाही ! एका बाजूला आबांचं टाईट बजेट दुसऱ्या बाजूला दुकानदाराची किंमत. आबा बजेट वाढवायला तयार नाहीत. दुकानदार किंमत कमी करायला तयार नाही.

आई– ज्या वस्तू घेतल्या त्या बिलातही चूक. हे चिडले दुकानदारावर.

श्री– आबांना बघून दुकानदार टरकला. त्यामुळे बिलात चूक झाली.

आबा– छे ! सगळीकडे अप्रामाणिकपणा.

श्री– त्याला काय माहीत तुम्ही बिल पुन्हा चेक करणार !

आबा– (एकदम) तोही कॉलेजची परीक्षा फेल झाला असावा.

श्री– हृश: ! पण पैसा खोऱ्यानं ओढतोय आबा.

आबा– मग त्याच्या तिथं तरी नोकरीला लागा.

श्री– आई ! आबा बघ ह्राँ ! जेव्हा तेव्हा माझा पाणउतारा करतात आम्ही फेल झालो ना. पण रिझल्टचं परसेंटेज काय होतं हे कोण बघतो !

आबा– त्याच्या अगोदरही रिझल्टचं परसेंटेज कमी नव्हतं. तेव्हाही आपण गचकला होतात.

श्री– आई ! आता आबाच बघ हं. मागचं उकरून काढतात सगळं. दरवेळी आबा असलं करतात. कालच आबा, तुम्ही मला म्हणाला होतात की मी मागच्या गोष्टींचा उल्लेखही करणार नाही.

आबा– पण माझी अट होती. तू अभ्यास करतोस असं मला दिसायला हवं

श्री– आयला ! नाही करत आई ? तूच सांग ना आबांना ! मी रात्री अभ्यास करतो तेव्हा तुम्ही सगळे निजलेले असता. तर मी अभ्यास करतो हे तुम्हाला कसं दिसणार ? आई ! कमाल करतात हं आबा. आयला.

आई– श्री ! हे तुझं आयला वगैरे बंद कर बघू.

श्री– (आईस) काल रात्री मी किती वेळ जागून अभ्यास केला तूच. सांग ना.

आबा– तू जागलास हे बरोबर. मी नाही म्हणत नाही.

श्री– आई! आबा बघ. मी जागत होतो तर तुम्ही नाही काय म्हणणार आबा ?

आई– ! पण टेपरेकॉर्डर केवढ्यांदा लावला होतास ? त्या आवाजाने हे पण जागे झाले.

आबा– रात्रभर ते तुझं टा... टा... टा... रा... रा... रा... चाललं होतं. एवढ्या आवाजात कुणालाच काही करता येणार नाही.

श्री– पण म्युझिक ऐकता ऐकता माझा अभ्यास होतो तर मी काय करू ?

आबा– कसला अभ्यास होतो ते दिसलं काल.

आई– रात्री हे पुस्तक घ्यायला तुझ्या खोलीत आले होते.

आबा– तेव्हा दिवे सताड उघडे ठेवून तू झोपला होतास श्री ! परीक्षेत दिवे लावता तेवढे पुरे. घरचे तरी विझवत जा.

श्री– आई, आबांचं आता झालं सुरू. आता ते वाटेल तसं बोलतील.

आई– अहो, तुम्ही बारीक सारीक गोष्टींवरून नका बोलू. माझं म्हणणं इतकंच आहे श्री !

आबा– यावेळी लाईटचं बिल किती आलंय माहीत आहे का त्याला ? पैसे कमवायची अक्कल नाही...

श्री– पण मी झोपलो नव्हतो आबा.

आबा– तू झोपला नसशील. त्या डबड्याच्या आवाजाने कुंभकर्णालाही झोप येणार नाही. पण तू झोपला असतास तरी दिवे विझवले नसतेस.

श्री– कशावरून आबा ? कशावरून ? म्हणजे पहिल्यांदा मी अमुक एक करीन असं भाकित वर्तवायचं आणि नंतर मी ते केलं असं समजून हजामत करायची. हा कुठला न्याय ? कशावरून मी दिवे विझवले नसते आबा ?

आबा– मी बघतो ना रोज !

श्री– आयला. रोज काय बघणार तुम्ही ? अभ्यासासाठी जागण्याचा कालचा पहिला दिवस. कमाल आहे हं आबा !

आबा– मला तुझ्याशी वाद घालायचा नाही. पण उद्याच्या उद्या तो टेप-रेकॉर्डर, ज्या कुणाचा आणला आहेस त्याला देऊन टाक. ते डबडं आपल्या घरात नको.

श्री– पण तो मित्र बाहेरगावी गेलाय आबा.

आबा– मग तो बंद करून ठेवून दे.

श्री– आयला ! तो गावाला जाताना कशाला देऊन गेला ? मशीन आहे ते आबा युज नाही केला तर रस्ट होईल.

आबा– आपलं ब्रेनही मशीन आहे लक्षात ठेवा. रस्ट होऊ देऊ नका म्हणजे झालं. विद्यापीठाच्या उरावर दरवर्षी पैसे घालायला मी काही विद्यापीठाचा देणेदार नाही.

आई– श्री ! या वर्षी पास होऊन जा बाबा. सबंध सुट्टी तू अशीच लोळून काढलीस. हे म्हणतात ते काही खोटं नाही. काय तो संस्कृत श्लोक आलस्यस्यस्य...

आबा– संस्कृत श्लोक मरो. त्याचा अर्थ इतकाच की आळशी घोड्याला विद्या कोठून येणार ?

श्री– आबा !...आम्हाला होता हं तो श्लोक. त्यात घोडा हा शब्द नव्हता.

आई– श्री !...श्री तू जा बघू...अभ्यास कर.

श्री– आयला आत्ता ?

आबा– मग केव्हा ? मुहूर्त बघायचा का ?

आई– (जाणाऱ्या श्री ला) चांगला संध्याकाळपर्यंत वाचत बस.

श्री– नाही हं आई !...दुपारी मी पिक्चरला चाललोय.

आबा– आता पिक्चरला जायचं नाही.

श्री– आयला, मी जाणार हं !...माझा अभ्यास झालाय आबा.

आबा– याला पैसे कुणी दिले.

श्री– माझा फ्रेंड मला दाखवणार आहे.

आबा– तरीही जायचं नाही.

श्री– का ?

आबा– तुझा बाप सांगतोय म्हणून.

श्री– याला काय अर्थ आहे ? माझा सगळा अभ्यास झालाय तरी !...

आबा– सगळा अभ्यास झाला असता तर नापास झालाच नसतास.

श्री– कमाल आहे आबा, या वर्षीच्या अभ्यासाचा मागच्या वर्षीच्या परीक्षेला काय उपयोग होणार ? फेल मागच्या वर्षी झालोय मी !

आई– याही वर्षी एक कण अभ्यास करीत नाहीस.

आबा– उनाडक्या चालल्यात तुझ्या उनाडक्या. राजूकडून शीक जरा. तो

तुझ्यापेक्षा लहान असून किती समंजस आहे ! ...

श्री– (उसळून) अगं पण मी माझ्या पद्धतीने अभ्यास करतोच आहे की ! ... राजूचा अभ्यास तो काय ! ...आणि त्याचं कौतुक तुम्ही मला किती वेळा सांगणार आहात ? पाच मिनिटांत दहा गणितं होतात त्याची.

आबा– तू राजू एवढा होतास तेव्हा तुझा जो नंबर यायचा त्यापेक्षा राजूचा नंबर वर येतो. राजूच्या वर तुझा नंबर कधीही आलेला नाही

श्री– आई, आता आबा बघ हं ! ...राजू पहिला येतो. त्याच्यावर नंबर येणं कुणालाच शक्य नाही. त्याच्या मास्तरांनासुद्धा ! ... आणि त्याच्यासारखं मला होता येणार नाही.

आबा– (रागाने) अमुक एक गोष्ट मला येणार नाही ही भावनाच माणसाने मनातून काढून टाकली पाहिजे. आत्मविश्वास हा यशाचा पाया आहे. श्री ! ...

श्री– पण अपयश हा देखील यशाचा पाया आहे आबा.

आई– असं काय करतोस श्री ? उगाच बोलणी खातोस. तू केलंस तर तुलाही का येणार नाही ?

श्री– मला येणार नाही. राजू सिंघानिया स्कूलच्या ओपन मेरिट परीक्षेत पहिला आला. मी पासही झालो नाही. कदाचित् पास झालो असतो. पण मी मुद्दाम पास झालो नाही. कारण मला आई-वडिलांना सोडून कमाकाकाकडे राहयचं नाही.

आबा– कमाकाकाकडे कशाला ? चांगलं हॉस्टेलमधे राहयला मिळालं असतं ! ...

श्री– मी हॉस्टेलमधे रहाणार नाही.

आबा– (संतापून) इथंच राहून आमचा जीव खाणार ! ...चांगलं फ्री हॉस्टेल ! ...हुशारीवर पुढं जायचं...किती मुलं शिकतात. गरीबीतून वर येतात. आई वडिलांचं नाव काढतात. पण इथं कुणाला वडिलांना काय कष्ट पडतात याची जाणीव असेल तर ना ?

(आबा तरातरा आतल्या खोलीत जातात.)

श्री– (आईला) आता आबा ते सगळं पुन्हा उगाळतील. कमाकाका दाताच्या कण्या कशा केल्या ते सांगत बसतील.

आबा– (आतून बाहेर येत) कमाकाका त्यावेळी दाताच्या कण्या करून सांगत होता...

श्री– बघ आई !..आबा मी तिकडे जाणार नाही. मला असं आश्रितासारखं रहाणं आवडत नाही.

आबा– तर !...तर !...मोठा बादशहाच लागून गेलास ना तू !...

श्री– आहेच मुळी. माझ्या घरचा मी बादशहा आहे. कुणाचं काही बोललेलं ऐकून घेणार नाही मी. माझ्या बापाचं खातोय मी.

आई– श्री !...श्री...अरे...अरे...

आबा– आणि बापालासुद्धा हात जोडायची पाळी आणलीय मी !...

श्री– आई...आता आबा बघ ना !..पुन्हा सगळं उकरून काढताहेत.

आई– कुणी काही उकरून काढत नाही बाबा !

श्री– नाही काय आई ? आबांची तीच सवय आहे. आता हेच मला आयुष्यभर ऐकावं लागणार आहे. राजू हुशार आहे. मी उनाडक्या करणारा आहे. राजू चांगला आहे. मी मवाली आहे. आबांचं एकदा एखाद्या माणसाबद्दल वाईट मत झालं की ते कधीही बदलणार नाही.

आई– तोंडाला येईल ते बडबडू नकोस काहीतरी !...

श्री– काहीतरी नाही आई !...मी जे बोलतोय ना त्यातलं अक्षर न अक्षर खरं आहे. राजू जे जे करील ते अगदी बरोबर आणि मी जे जे करीन ते साफ चूक हे आता ठरून गेलं आहे. आबा मला काही एक करू देत नाहीत. काही एक घेऊन देत नाहीत. कारण मी नापास झालोय. त्यांच्या दृष्टीने माझी किंमत शून्य आहे. राजू आबांचं सर्वस्व आहे. पण आम्ही पण मुलंच आहोत त्यांची.

(टेपरेकॉर्डर उचलतो आणि धुसफुसत वर जातो.)

आबा– एवढा मोठा झालाय पण काडीची अक्कल नाही त्याला. आपणच आपलं तोंड वाजवायचं. बधीन बधीन नाहीतर एक दिवस लाथ मारून घराबाहेर हकलून देईन.

आई– असं नका बोलू. थोडं कलाकलानं घेतलं त्याच्या की सगळं ऐकतो. हूड आहे झालं ! श्री. ए श्री!!

आबा– हं ! नापास झालाय ! पण त्याची त्या कोडग्याला काही लाज आहे का ?

परवाच्या दिवशी तो नापास झाल्याचं ओघात निघालं. मी तळतळून म्हणालो, " अरे ! पण वर्ष कुणाचं फुकट गेलं ?" तर लांब जीभ करून मला म्हणतो, " कुणाचं फुकट गेलं तेच कळत नाहीए आबा. तुम्ही तुमचंच वर्ष फुकट गेल्यासारखा गगंशा मांडलाय !" ही. ही याची उत्तरं ! मुलं कसली ही. आदल्या जन्मीचे दुष्मन. आपण मरमर मरायचं ! निढळाच्या घामाचे चार पैसे कमवायचे. आणि यांनी ते उधळायचे.

श्री– (वरून खाली येत) मी खूप उधळीन. पण तुम्ही ते द्यायला हवेत ना ?

आई– श्री ! आता पुरे हं ! चला तुम्हीही हातपाय धुऊन घ्या.

आबा– हेमाचं लग्न करायचं ! म्हणजे ते काहीतरी मागणारच.

श्री– तुम्ही देताहात म्हणून ते मागणार

आबा– मी तुला सांगत नाहीए...आपण म्हणतो मुलगा चांगला शिकलेला आहे प्रॉमिसिंग आहे. आपण होऊन विचारताहेत. नाहीतर यांच्यासाठी आम्ही मागितलं तर कोण देणार आहे ?

श्री– हे सोडा! हं आबा, प्रथम 'लव्ह' करायची, नंतर वडिलांच्या मागे दडून वडील यू म्हणतात त्यूं म्हणतात सांगून पोरीच्या बापाकडून पैसे उकळायचे हेच मुळी आपल्याला पसंत नाही.

आबा– तुम्ही फार मोठे विचारवंत आहात.

श्री– विचारायला आला तेव्हा पहिल्यांदा परमिशनच द्यायचो नाही. पण तो म्हणाला आबांना, 'मी वडील माणसांच्या शब्दाबाहेर नाही' आबांची विकेट गेली. आणि तू पण हुरळलीस हेमाला मागणी घातली म्हणून मग लागला पुडी सोडायला. आमचे वडील म्हणतात. आयला गेले तेल लावत तुझे वडील. प्रेम करतेवेळी वडिलाची परवानगी घेऊन लाईन मारत होतास काय ?

आई– श्री... श्री हे बघ तू आता. अरे. मुलीचं लग्न म्हणजे पैसा ओतावा लागणारच.

श्री– मग ओता.

आबा– अरे पण ओतायला आणायचे कुठून ?

श्री– काढायचं लोन. आम्ही भरू हप्ते.

आबा– अरे पण तू काही कमवत असतास तर मदत नसती का झाली ?

श्री– काही नाही आबा. तुम्ही दोन्हीकडून बोलता. कैक वेळा तुम्ही मला सांगितलंय तुझी एक कपर्दिकही मला नको.

आबा– ऐका. त्यादिवशी कमासुद्धा याला बोलला.

श्री– होऽ

आबा– याची आणि कमाची कुंडली म्हणजे खडाष्टक योग.

...कमाकाका नुसतं एवढंच बोलला. याला असंसुद्धा नाही. सगळे "अरे. बापाचे पैसे सत्कारणी लावा. गमवू नका."

तर हा तिथं हेमाला ओरडून सांगतो काय !...

"गमवतो म्हणजे काय करतो ? रेस खेळतो, दारू पितो की जुगार खेळतो ?"

कमाला याचं बोलणं लागलं.

श्री – लागणारच. कारण तो हे सगळं करतो आबा.

आबा–त्याच्या इतका मोठा हो. आणि तुला काय करायचं असेल ते कर.

श्री – तुमचा भाऊ आहे म्हणून तुम्हाला तो मोठा वाटतो. आम्हाला आमचा काका मुळीच मोठा वाटत नाही.

आबा–हळू !... हळू !... नीट बोल जरा. तुझ्या नोकरीचं काही बघेल तो.

श्री – मी कमाकाकाने दिलेली नोकरी करणार नाही. त्यापेक्षा बूटपॉलिश करीन आबा.

आबा–करा. तीच तुमची लायकी आहे.

(श्री जायला निघतो. आबा आत जातात.)

श्री – ए आई. राजू आलाय. आबांना म्हणावं काय बोलायचं ते राजूला बोला.

आई– कुठं ? केव्हा आलाय ? अरे अगोदर नाही का सांगायचं ?

श्री – अगोदर ? केव्हा ? आल्याबरोबर आबांनी फायरिंग सुरू केलं.

आई– अरे पण आहे कुठं तो ?

श्री– कुठं म्हणजे काय. घरातच असेल. नाहीतर गेला असेल मित्राकडे.

आई– मध्येच कसा आला तो?

श्री– मी नाही विचारलं.

आई– पण तो काही म्हणाला का ?

श्री– तसं काहीच बोलला नाही.

आई– आता तू वस्कन् अंगावर येणार नसशील तर विचारते. तू कुठं जातोस ?

श्री– पुस्तकं दिसत नाहीत का तुला माझ्या हातात ?

आई– पिक्चरला जाऊ नकोस बाबा.

श्री– नाही जात. लायब्ररीत जातोय.

आई– आणि आधी राजू कुठंय ते बघ.

श्री– इथंच असेल कुठंतरी ग. नाहीतर शेजारी गेला असेल. राजू, ए राजू (आई सुद्धा घरभर फिरते. तिला राजू दिसत नाही)

आई– घरात कुठंच दिसत नाही. शेजारीपाजारी सुद्धा नाही. केव्हा आला ? काही खाल्लं का त्यानं ?

आबा–(बाहेर येत) बाथरूममध्ये राजूचे कपडे कसे ?

आई– अहो ! राजू आलाय.

आबा–केव्हा ? कोण म्हणतंय ?

आई– हा श्रीच सांगतोय.

आबा–काय रे ?

श्री– हो.

आबा–तो गेलाय कुठं ?...हेमा कुठं गेलीय ?

श्री– मोहनराव आले होते.

आबा–तू आता कुठं निघालास ?

श्री– अभ्यासाला.

आबा–राजू वर आहे का बघ.

श्री– नाही.

आबा–अरे मग गेलाय कुठं तो ?

श्री– मला काय माहीत ? खिशात घेऊन का फिरतोय मी त्याला ? असेल

इकडेच कुठंतरी.

आबा–तिथं काय बघतोस ?

श्री– माझी वही हवीय.

आबा–(वही चाळत) ही बघ ही आहे का ?

श्री– हो. (पटकन् घ्यायला जातो)

आबा–(चाळत) हे काय लिहिलंय. श्री वेला...श्री बेला...

श्री– ते लाबेला...लाबेला...हॉटेलचं नाव आहे.

(श्रीचा चेहरा गोरामोरा.) (आबा वही त्याच्याकडे टाकतात)

आबा–जाता जाता दिसला तर पाठवून दे.

श्री– हो.

आबा–नाहीतर असं कर. गद्र्यांकडे बघून ये पाहू.

श्री– मी आता अभ्यासाला जाऊ की राजूला शोधायला जाऊ ? आयला ! आता इथं होता

आबा–अरे पण तो आज आलाच कसा ? त्यानं पत्रात लिहिलं होतं. त्याच्या पत्राप्रमाणे आज त्याचा पेपर होता. विचारलंस का तरी त्याला ?

श्री– नाही

आबा–घरात लक्ष असेल तर ना ?

श्री– तो काय आता कुक्कुल बाळ आहे ?

आई– (पुन्हा वाद वाढेल असं वाटून) श्री श्री जा रे जरा. पाहून तरी ये रे !

श्री– (अनिच्छेने) आता तू पण आई !

(आबांच्या चेहऱ्याकडे बघत) जातो. दिसला ना की दोन झापडया चढवतो नी आणतो दरवेळी माझ्या अभ्यासाच्यामधे याचं काहीतरी.

आबा–हे बघ. तुला जिथं जायचं असेल तिथं जा. उगाच त्रागा नको. मी स्वत: बघून येतो

श्री– आता मी जातोय ना आबा. (जातो)

आबा बघितलंस ना कसा गुरगुरत गेला कोण समजतो स्वत:ला.

आई– अहो तुम्ही नं एकसारखं त्याला बोलता तोहि आता मोठा झालाय की नाही ?

आबा–नुसता एरंड वाढलाय. त्यात तुझे लाड. त्यामुळे आणखी शेफारलाय.
आई– त्याला नीट सांगितलं ना की सगळं ऐकतो. आता मोठी झाली मुलं.
आबा–हो. राजूसुद्धा अचानक का आलाय कळत नाही. तिकडं काय झालंय. कुणाची तब्येत बरी नाही का ? या श्रीनं विचारायला नको.
आई– पण म्हणालाय ना राजूला घेऊन येतो. घेऊन येईल तो.
(तोच श्री येतो. त्याच्या हातात सुटकेस)
आबा--काय रे. परत का आलास ?
आई-- आणि राजू ?
श्री-- कमाकाका आलाय.
आबा--कमा आलाय ? का ?
श्री-- काय माहीत.
आबा–सुटे पैसे आहेत का त्याच्याजवळ ?
श्री-- नाहीत. नेहमीप्रमाणेच मी दिले रिक्षाचे.
आई-- विभावहीनीसुद्धा आल्यात का ?
श्री-- छे. एकटा आलाय.
आई-- का ते ?
श्री-- मला काहीतरी वेगळंच वाटतंय आई. रिक्षातून उतरता उतरता कमाकाकाचा पहिला प्रश्न " राजू आलाय का इथं ?" आई राजूनं नक्की काहीतरी गोची करून ठेवलीय.
आबा--तुला सगळ्या गोची नी भानगडीच दिसतात रे बाबा.
(तोच कमाकाका येतो.) (बसतो)
आबा--का रे अचानक ?
कमा-- राजू आलाय का इथं ?
आबा– हो, श्री म्हणतोय खरं ! ...
कामा-- सुखरूप आलाय ना ?
आई--- का बरं ? ··· काय झालं ?
कमा-- सुटलो ··· पाणी आण रे श्री ! धन्य आहे रे बाबा तुझ्या पोराची. विभा म्हणाली. ' तुम्ही जा आणि सगळं सांगा. तिला तिकडे झोप नाही. आम्हाला जेवण गोड लागेना.

आबा– काय झालं ?

कमा– ही मला म्हणाली ' तो काय नाही नाही ते सांगेल. त्यापेक्षा तुम्ही जा आणि नीट सांगा.

आबा– अरे पण झालं तरी काय असं ?

कमा-- तेच तर सांगतोय ! कुठं आहे कुठं तो ? व्हेअर इज ही ?

आबा-- आहे, शेजारीच असेल.

कमा-- एवढासा मिरीएवढा पोर पण फार हट्टी रे बाबा. हॉस्टेलमधून न सांगता सवरता पळून गेला. कुठं गेला ? काही झालं ! ..... आमच्यावर रिस्पॉन्सिबेलीटी काहीच्या बाही मनात यायला लागलं! त्यात हिची भुणभुण . . . तस्सा लागोपाठ उठलो. आणि तडक गाडी पकडून आलो. बाय फर्स्ट ट्रेन.

आबा– काय केलं तरी काय राजूनं ?

कमा– सांगतो, तू ब्लडप्रेशर वाढवून घेणार नसशील तर सगळं सांगतो इन् डिटेल्स.

आई– काय झालं भावोजी ? तो रागावून वगैरे आला का ?

कमा– ते परवडलं असतं. चल, वर चल. सगळ्यांच्या देखत शोभा नको.

( ते दोघे वर जातात. )

आई– काय रे श्री ? केलंन् तरी काय एवढं राजूनं ?

श्री– राजू काय करणार ग ? कमाकाकाचं उगाच असतं. तो पालीला सुद्धा मगर म्हणेल.

( राजूला घेऊन हेमा येते. राजूचा चेहरा उन्हाने व घामाने लाल, केस विस्कटलेले. )

श्री – ए आई ! राजू आलाय बघ.

आई– राजू.

श्री– काय रे कुठं गेला होतास ? न सांगता सवरता कुठं गुल् झाला होतास ? इकडे मी आबांच्या शिव्या खाऊन हैराण झालोय माहीत आहे ? ( हेमाला ) काय ग तू !

हेमा– आम्ही सिनेमाला गेलोच नाही.

श्री– का ?

हेमा– हा वाटेत दिसला. मला बघितल्यावर पळायलाच लागला आई. याला पहिल्यांदा तुझ्या ताब्यात घे· घरातून पळून जात होता तो.

आई– का ते राजू ?

हेमा– मी सुद्धा विचारलं! तर रडायलाच लागला.

आई– तिकडून न सांगता सवरता आलास ना?

राजू– हो.

श्री– का ? पदक मिळालं म्हणून ? धावत आबांना सांगायला ? आँ,

हेमा– तू थांब रे श्री !

श्री– काकी काही बोलली बिलली वाटतं ? की भांडी घासून घेतलीन् तुझ्याकडून ? म्हणून तर आपण दोन दिवसात वापस. कमाकाका काय काका आहे ?

आई– श्री हळू हळू जरा.

श्री – माहीत आहे ग काय भानगड केलीस एवढी ? मला सांग काकीनं हात धरून घराबाहेर काढला ? ( राजू मानेने नाही म्हणतो ) मग ?

राजू– सहस्रबुद्धेसरांनी मला छड्या मारल्या. मी काहीसुद्धा केलं नाही.

श्री– म्हणजे अभ्याससुद्धा केला नाहीस ?

राज– अभ्यासाचं नाही. अभ्यास केला.

श्री– अभ्यास केला तरी तुला झोडला ? आयला भंगारच दिसते तुमची शाळा. कोण साला मास्तरडा आहे मला सांग. डोकंच आउट करतो त्याचं !

राजू– खरंच दादा. पण मी काहीसुद्धा केलं नाही.

श्री– हे बघ राजू. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे तू एकदा काही केलं नाही म्हणालास म्हणजे खरंच काही केलं नाहीस. पुन्हा पुन्हा तेच घोळवून माझी खोबडी सरकवू नकोस.
मला फक्त इतकंच सांग तू केलंस काय ?

हेमा– पत्र आहे बघ त्याच्याजवळ.

श्री– पत्र बघू. शाळेचं आहे ? बघू ?
(राजू रडायला लागतो.)

हेमा- कुठं दाखवतोय कुणाला ?

श्री– काय रे केलंस काय एवढं ?

आबा– (वरून खाली येत) चोरी केलीन् त्यानं.

कमा. (आबांच्या मागून) आबा..आबा नाही. म्हणजे मारूबिरू नकोस हो त्याला. पण आपलं नीट विचारून घे. जस्ट आस्क.

आबा– काय रे राजू ?

कमा– राजू! खरं खरं साग. खोटारडेपणा आणि कांगावा नको एकतर न सांगता सवरंता पळून आलास. तिकडे तोंड काढायला आम्हाला जागा ठेवली नाहीस. तुझ्या काकीला झोप नाही. काय ते पटकन् कबूल कर. क्विक्.

श्री– काय रे. तू चोरी केलीस का ? बोल ना ?

राजू– नाही.

कमा– स्कूलचं लेटर कुठंय ? का फाडून टाकलंस मधल्या मधे. गिव्ह मी. (राजू खिशातून एक चुरगळलेलं पाकीट काढतो. आणि हेमाच्या हातात देतो. हेमा पत्र वाचते. तोवर राजू खांदे पाडून उभा.)

हेमा– काय रे तू ?

राजू– मी काहीही केलेलं नाही हेमाताई.

कमा– काही केलं नाहीस मग हे काय ? कुणाचं नाव आहे वरती ? (राजू बोलत नाही.) वाचता येतं ना तुला ?

राजू– हो

कमा- कुणाचं नाव आहे ?

राजू– आबांचं.

कमा– मग तु हे पत्र फोडलंस का ?

श्री– लिहिलंय काय पत्रात ?

हेमा– पत्रात काहीतरी चेक चोरल्याचा आरोप आहे.

राजू– नाही. पण मी काहीही केलेलं नाही आबा.

कमा– कशासाठी ? कशासाठी खोटं बोलतोस ? एवढा हट्टीपणा कशाला ?

आबा– (पुढे सरसावत) जेवायला देऊ नका. हकलून लावा घरातून.

कमा– ते काय ते तुमचं तुम्ही पहा...

आबा– कर्मदरिद्री. नालायक. हुशार, पहिला नंबर. म्हणून तुला हॉस्टेलमध्ये ठेवला.

कमा– नुसती हुशारी काय चाटायचीय.

आबा– (राजूच्या अंगावर धावून जात.) चोऱ्या करा. दरोडे घाला दुसऱ्यांच्या घरावर.

कमा– आबा· .आबा तू शांत हो पाहू आधी !'

आबा– हाही मुलगा दिवटा निघाला रे. खूप वाटलं होतं चांगला निघेल· नाव काढेल.

कमा– पण करून सवरून बेरडासारखा नुसता उभा आहे. बोलतोय का पहा·

आबा– (राजूला फाडफाड मारत) बोल...बोल की. का तुझी जीभ टाळ्याला चिकटली.

श्री– आबा ! आबा ! (राजूला पाठीशी घालत)

आबा– ! तुम्ही बोट लावू नका हं त्याला.

कमा– अरे मग हाऊ हाऊ दिवे ओवाळून का कबूल करून घेणार आहेस तू ? चोऱ्या करायच्या होत्या तर इथंच करायच्या. तिथं येऊन कशाला नस्ते धंदे ? विभा मला म्हणालीच होती. ' ते तिकडे आहेत ते बरे आहेत.' पण आम्हालाच भावाचा पुळका ना· तुझ्यापेक्षा आमचा मनोहर बरा म्हणायची वेळ आणलीस. तो व्रात्य तुझ्या इतका हुशारही नाही तो. पण ही हुशारी काही भलतीच आहे. दट बट रिमाईंडस मी. इथं पोचताच फोन करायला सांगितला होता विभानं, तिचा जीव तिकडं टांगणीला. फोन नसेलच इथं जवळपास ?

हेमा– डॉक्टर साऱ्यांकडे आहे समोर.

कमा– एस् टी डी. येईल का करता ? चल रे आबा माझ्याबरोबर दाखव जरा. थोडं बोलायचंही आहे तुझ्याशी. रिगार्डिंग

(कमाकाका आणि आबा जातात)

राजू– दादा आता काय होईल रे ?

श्री– काही होणार नाही. छोड दो. आम्ही नाही शाळेन पुस्तकं लांबवायचो? खडू ढापायचो ? आमच्या वेळी काटदरे म्हणून क्रिकेटचा कप्तान

होता. मॅच झाली की बॅट, बॉल, स्टंप्स गुल. एकदम् स्वतःच्या घरी. रडतोस कशाला ? हचः.

(त्याला मायेने थोपटतो तोच)

ए आई ! याच्या अंगात ताप बघ किती भरलाय ! जा वर जाऊन पड जा. माझ्या पलंगावर. तरी मी आबांना सांगत होतो, त्याला काकांकडे पाठवू नका. पण आम्हाला विचारतो कोण ? उलट आबा माझ्याकडे पाहून म्हणाले, ‘ आळशी माणसासाठी जगात कोणतीही सोय केलेली नाही आळशी माणसे ही सैतानाला दत्तक दिलेले ईश्वराचे पुत्र आहेत.’

... आमचा काका चिक्कार श्रीमंत आहे. म्हणून काय चाटायचाय. इथं सगळं त्याचं व्यवस्थित चाललं होतं पण सिंघानिया स्कूल उत्तम, कमाकाका तिथं रिस्पेक्टेड मेंबर म्हणून हॉस्टेल फुकट. हे आपलं वेडं गेलं. आणि आलं पहिलं. झक मारत कमाकाकाला अॅडमिशन द्यावी लागली.

आई– आता तू गप्प बसशील का श्री ? तो परीक्षा सोडून आलाय. म्हणजे वर्ष गेलंच ना ?

श्री– नाही जाणार आई ! तू काळजी नको करूस.

(तोच आबा तरातरा येतात.)

आबा– राजू ! ए राजू ! ते पत्र कुणाकडे आहे ?

हेमा– मी देते हं ! थांबा.

आबा– कमा म्हणाला... आता त्यांच्या शाळेत प्रवेश नाही.

(आबा पत्र वाचतात.)

आपला पाल्य कुमार राजेश करमरकर ह्याने दुसऱ्या विद्यार्थ्याचा २५ रु. चा चेक हस्तगत करून व खोटी सही करून बॅन्केत वटवला. अधिक तपासांती व परिस्थितीजन्य पुराव्यावरून असा निष्कर्ष निघतो की तो चेक राजेश करमरकरानेच चोरला.

आपण कृपया आपल्या मुलाचा दाखला शाळेतून घेऊन जावे ही विनंती. ’

हं !

(सगळे स्तब्ध.)

राजूनं असं काही केलं असेल हेच खरं वाटत नाही. राजू ! कुठंय ग ?

आई– तो वर आहे. त्याच्या अंगात थोडा ताप आहे. पडू द्या त्याला. तुम्हीही दोन घास खाऊन घ्या. म्हणजे बरं वाटेल. भाऊजींनाही वाढते.

आबा– श्री ! राजूला बोलाव रे.

आई– अहो ! त्याला पुन्हा मारूबिरू नका हं.

(श्री राजूला घेऊन येतो. राजू भित्र्या नजरेने वडीलांसमोर उभा.)

आबा– राजू ! बैस इथं. ताप कशानं आला तुला ?

राजू– मी उन्हातून आलो.

आबा– परीक्षा बुडवून ?

राजू– हो.

आबा– का ? पेपर्स येत नव्हते ?

राजू– मला तिकडे कुणालाही तोंड दाखवायची लाज वाटत होती.

आबा– तुला आठवतंय राजू ! तिकडे जाताना आपलं ठरलं होतं. तुला काही अडचणी आल्या तर तू प्रथम मला पत्रानं कळवायचंस.

राजू– हो.

आबा– तू मला का नाही कळवलंस ? इकडं निघून का आलास ?

राजू– तिकडे मला बरं वाटेना. सारखी तुमची आणि आईची आठवण यायला लागली. हॉस्टेलमधला जो तो मुलगा मला बघून हसायचा. ते सगळं मला असह्य झालं.

आबा– मग तुझा काका नव्हता ? परीक्षेपर्यंत कमाकाकांकडे जाऊन राह्यचं.

राजू– गेलो होतो. पण विभाकाकीला जेव्हा मी सगळं सांगितलं तेव्हा ती म्हणाली, 'आता आपला तू तुझ्या घरी जा कसा'

आबा– म्हणून परीक्षा बुडवलीस ?

राजू– हो. मला घरी जा सांगितल्यावर रडूच यायला लागलं. काय करावं ते सुचेना. एकटं वाटायला लागलं.

आबा– तुझी तयारी झाली होती ?

राजू– हो. सगळी झाली होती.

(वडील त्याच्याकडे बघतात. राजू शब्दही बोलत नाही, नुसता खाली मान घालून उभा रहातो.)

आबा– या पत्रात असं लिहिलंय की तू चेक चोरलास...(राजू मान हलवून काहीतरी पुटपुटण्यासाठी तोंड उघडतो.) थांब... मी तुला काय सांगतो ते पूर्ण ऐकल्याशिवाय मधे शब्दही बोलू नकोस.

...जर तू हे केलं असशील तर माझ्याजवळ कबूल कर. मी तुला रागावणार नाही की शिक्षाही करणार नाही.

फक्त तू खरं बोलायचं खोटं बोलायचं नाही. माझ्याशी खोटं बोललास–लक्षात ठेव–खोटं लपत नाही मला ते कळेल. तेव्हा माझ्याशी बोलण्याअगोदर नीट विचार कर. (शांतता)

तू चेक चोरलास ?

राजू– नाही आबा.

आबा– आठवून सांग राजू ! खरं खरं सांग. तू चेक चोरलास ?

राजू– (ठामपणे) नाही.

(कमाकाका फोन करून येतो.)

कमा– नाही ? म्हणजे आम्ही सगळे खोटं बोलतो ? तू खरा. तू चारचा चेक चोरला नाहीस, मग सहस्रबुद्धे सरांनी तुला का मारलं ?

राजू– सहस्रबुद्धे सरांनी मारलं हे खरं, पण मी चेक चोरलेला नाही.

आबा– अरे काय झालं ते सांगून टाक ना राजू !

कमा– चांगल्या दोन मुस्काटात भडकवल्या म्हणजे बोलायला लागेल.

(आबा उठू लागतात)

श्री– आबा. तो नाही म्हणतोय ना ! ...तो खोटं बोलणार नाही.

कमा– म्हणजे आम्ही खोटे का ?

श्री– मी तुम्हाला कुठं काय म्हटलं काका...

आई– भावोजी...यांना वाढतेच आहे मी !...तुम्हीही आल्यासारखे दोन घास खाऊन जा...

कमा– छे हो !...जेवतोय कसला वहिनी !...आज रात्री पुन्हा मीटींग

आहे तिकडे. ठीक आहे. आबाला बोललोच आहे मी !...मला नाही वाटत त्याला सिंघानिया स्कूल पुन्हा अॅडमिशन देईल. इकडचीच कुठली तरी शाळा बघा झालं !...दाखला इकडेच पाठवून देऊ की कोणी येणार आहे न्यायला ?

(आबा गच्च डोकं धरून बसतात.)

श्री– दाखला न्यायला मी येईन. पण दाखला नेण्यापूर्वी इन्क्वायरी हवीय आम्हाला शाळेकडून.

कमा– (कपाळाला आठ्या घालत) इन्क्वायरी !...कशाबद्दल.

श्री– राजूवरच्या आरोपाबद्दल.

कमा– कशाला उगीच त्रागा करून अडाणीपणे वाकड्यात शिरताय !... इन्क्वायरीतून काहीही निष्पन्न होणार नाही.

आबा– निदान नक्की काय झालंय ते तरी कळेल कमा आम्हाला.

कमा– ( त्राग्याने ) काय झालंय ते पत्रात आहेच. आणि राजूला विचारा !... त्याला सगळं माहीत आहे. ही नोज एव्हरीथिंग इन्क्वायरीत तो दोषी ठरला तर दाखलाही चांगला मिळणार नाही. मग माझ्या इन्फ्लूअन्सचा काहीही उपयोग होणार नाही. अॅबसोल्यूटली नो युस...काय ते तुमचं तुम्ही ठरवा.

(कमाकाका तटकन् उठून निघून जातो.)

राजू– दादा !...एवढ्या चांगल्यां शाळेतून काढून टाकणार का रे मला ?

श्री– राजू ! अरे डफ्फर मुलांना सांगावसं वाटतं मी अमुक शाळेचा विद्यार्थी. तुझ्यासारख्या बुद्धिमान मुलाच्या बाबतीत शाळेला सांगावसं वाटलं पाहिजे...हा आमच्या शाळेचा विद्यार्थी...गप्...गप्...

राजू– पण...मी खरंच काहीही केलेलं नाही.

आबा– (खचलेले उठत)...तू खरंच काहीही केलं नाहीस ना ? मग मी तुझ्या पाठीशी उभा आहे. मी माझं सर्वस्व पणाला लावीन...

राजू– आबा...

(आबांच्या जवळ जात असतानाच पडदा)

▱ ▱



म. ग्रं. ... आ., ...
वा. क्र. १९५.८९. नों. दि.

# अंक दुसरा

(स्थळ पूर्वीचेच. गोविंदराव गद्रे हातात भाजीची पिशवी घेऊन येतात. श्रीची आई काहीतरी शिवत बसली आहे.

गद्रे– काय वहिनी ! काय म्हणतेय आबाची तब्येत ?

आई– (आवरत) या, आता बरी आहे.

गद्रे– डॉक्टर काय म्हणताहेत ?

आई– डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिलाय ! पण ऐकताहेत कुठं ?

गद्रे– आहे कुठ ?

आई– बाहेर गेलेत.येतीलच.

गद्रे– या सगळ्या जंजाळात आबांनी मात्र उगीच तब्येत बिघडून घेतलीन् झालं ! ताप काय आणून घेतला. ब्लडप्रेशर काय चढवून घेतलंन् हं ! हेमा थोडं पाणी आण ग ! या महागाईच्या दिवसात डॉक्टर घरात नको वाटतो.

आई– (उठत) मी आणते. हेमा डॉक्टरकडेच गेलीय.

गद्रे– म्हणजे ? अजूनही डॉक्टर घरात शिरलाच आहे का ?

आई– काय करायचं ?

(तोच श्री पाणी घेऊन येतो) (त्याच्या दुसऱ्या हातात पेपर)

श्री–घ्या गद्रेकाका.

गद्रे–तू घरीच आहेस का ? आँ ! काय म्हणतोय आजच पेपर ? पेपरात असतं काय म्हणा पण एक जरा बातम्या बऱ्या वाटतात. अलीकडे

किमत आणखी वाढवलीय पेपरवाल्यांनी. सगळयांनीच किंमती वाढवल्यात. मग पेपरवाल्यांनी तरी काय घोडं मारलंय.
आज काय तू सबंध दिवस घरीच ?

श्री म्हणजे ?

गद्रे–नाही म्हणजे कुठं फिरायबिरायला नाही गेलास तो ?

श्री– नाही. कुठं जाणार ?

गद्रे– ते आम्हाला रे काय माहीत ? परवाच्या दिवशी तुला बघितला मी.

श्री– केव्हा ?

गद्रे– तू बघितलंस मला. पण बघून न बघितल्यासारखं केलंस.

श्री– छे !

गद्रे– छे काय ! बरोबर कोणीतरी होतं तुझ्या. कोण ते ?

श्री– फ्रेंड.

गद्रे– ते कळलं रे. पण कोण ? तो का ती ?

श्री– तुम्ही बघितलं म्हणता म्हणजे तुम्हाला माहीत असणारच गद्रेकाका तो का ती ते.

गद्रे– नाही रे बाबा. तुम्ही दोघं होतात. खेटून खेटून चालत होतात अलीकडे दृष्टी जरा दगा देते. आणि आजकाल काय ! पोरी केस लांडे कापतात. पुरुषांचे कपडे घालतात. त्यामुळे तो का ती हे लांबून बघणारा काय सांगणार ! कप्पाळ
मधे पेपरात आलं होतं बघ. कॅलिफोर्नियातील एका तरुणानं आत्महत्या केली. का ? विचार की का ?

श्री– का ?

गद्रे– अरे त्यानं गर्लफ्रेंड म्हणून जिच्यावर कोर्टिंग केलं तो निघाला बॉय फ्रेंड.

श्री– कमाल आहे.

गद्रे– कमाल तुम्हा तरुण पोरांची आहे हो पण तुझ्यावरोबर कोण होतं ?

श्री– माझी कॉलेजमधली मैत्रीण होती काका !

गद्रे– वाटलंच मला तशी आमची नजर आम्हाला धोका द्यायची नाही आम्ही तेव्हाच ओळखलं.

# अंक दुसरा

(स्थळ पूर्वीचेच. गोविंदराव गद्रे हातात भाजीची पिशवी घेऊन येतात. श्रीची आई काहीतरी शिवत बसली आहे.

गद्रे– काय वहिनी ! काय म्हणतेय आबाची तब्येत ?

आई– (आवरत) या, आता बरी आहे.

गद्रे– डॉक्टर काय म्हणताहेत ?

आई– डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिलाय ! पण ऐकताहेत कुठं ?

गद्रे– आहे कुठ ?

आई– बाहेर गेलेत.येतीलच.

गद्रे– या सगळया जंजाळात आबांनी मात्र उगीच तब्येत बिघडून घेतलीन् झालं ! ताप काय आणून घेतला. ब्लडप्रेशर काय चढवून घेतलंन् हं ! हेमा थोडं पाणी आण ग ! या महागाईच्या दिवसात डॉक्टर घरात नको वाटतो.

आई– (उठत) मी आणते. हेमा डॉक्टरकडेच गेलीय.

गद्रे– म्हणजे ? अजूनही डॉक्टर घरात शिरलाच आहे का ?

आई– काय करायचं ?

(तोच श्री पाणी घेऊन येतो) (त्याच्या दुसऱ्या हातात पेपर)

श्री–घ्या गद्रेकाका.

गद्रे–तू घरीच आहेस का ? आँ ! काय म्हणतोय आजच पेपर ? पेपरात असतं काय म्हणा पण एक जरा बातम्या बऱ्या वाटतात. अलीकडे

किमत आणखी वाढवलीय पेपरवाल्यांनी. सगळ्यांनीच किमती वाढवल्यात. मग पेपरवाल्यांनी तरी काय घोडं मारलंय.

आज काय तू सबंध दिवस घरीच ?

श्री म्हणजे ?

गद्रे–नाही म्हणजे कुठं फिरायबिरायला नाही गेलास तो ?

श्री– नाही. कुठं जाणार ?

गद्रे– ते आम्हाला रे काय माहीत ? परवाच्या दिवशी तुला बघितला मी.

श्री– केव्हा ?

गद्रे– तू बघितलंस मला. पण बघून न बघितल्यासारखं केलंस.

श्री– छे !

गद्रे– छे काय ! बरोबर कोणीतरी होतं तुझ्या. कोण ते ?

श्री– फ्रेंड.

गद्रे– ते कळलं रे. पण कोण ? तो का ती ?

श्री– तुम्ही बघितलं म्हणता म्हणजे तुम्हाला माहीत असणारच गद्रेकाका तो का ती ते.

गद्रे– नाही रे बाबा. तुम्ही दोघं होतात. खेटून खेटून चालत होतात अलीकडे दृष्टी जरा दगा देते. आणि आजकाल काय ! पोरी केस लांडे कापतात. पुरुषांचे कपडे घालतात. त्यामुळे तो का ती हे लांबून बघणारा काय सांगणार ! कप्पाळ

मधे पेपरात आलं होतं बघ. कॅलिफोर्नियातील एका तरुणानं आत्महत्या केली. का ? विचार की का ?

श्री– का ?

गद्रे– अरे त्यानं गर्लफ्रेंड म्हणून जिच्यावर कोर्टिंग केलं तो निघाला बॉय फ्रेंड.

श्री– कमाल आहे.

गद्रे– कमाल तुम्हा तरुण पोरांची आहे हो पण तुझ्यावरोबर कोण होतं ?

श्री– माझी कॉलेजमधली मैत्रीण होती काका !

गद्रे– वाटलंच मला तशी आमची नजर आम्हाला धोका द्यायची नाही आम्ही तेव्हाच ओळखलं.

श्री– ते माझ्याही तेव्हाच लक्षात आलं गद्रेकाका.

गद्रे– म्हणून लक्ष दिलं नाही ?

श्री– नाही नाही तसं नाही फक्त अजून इतकंच लक्षात आलं नाही की ते आबांच्या कानापर्यंत कसं नाही पोचलं ?

गद्रे– छ्या: छ्या: छ्या ! आम्हाला काही त्या तुझ्या प्रेमाबिमातलं समजत नाही. आम्हाला आपलं एवढं समजतं वहिनी ! अहो वहिनी श्रीचंही आता लवकरच उरकून टाका.

आई– तुम्हीच बघा गद्रे काका एखादी !

गद्रे– आम्ही बघितली तरी त्याला पसंत पडली पाहिजे ना ? त्यानंच कुठं परस्पर जमवलं असलं म्हणजे ?

आई– काय रे श्री ?

श्री– छे ग आई ! काहीतरीच...

आई– आमचं काही नाही हो, पण जातपात पहा रे बाबा.

श्री– चल ग आई ! तुझं म्हणजे सुरू ...

आई– मला आपली आणून दाखवं अगोदर

गद्रे– तुमचं ठीक आहे वहिनी. पण आबाला पसंत पडली पाहिजे.

श्री– काय गद्रेकाका ! पेपरातले सगळे विषय संपले ?

गद्रे– आपली थोडी थट्टा रे ! तू कशाला मनावर घेतोस इतकं ? आपल्या चाळीचा कृष्ण कन्हैय्या काय म्हणतोय ?

श्री– हा कृष्णकन्हैय्या कोण ?

गद्रे– मास्टर राजू रे. तो हॉस्टेल सोडून आल्यापासून चाळीचा कृष्णकन्हैय्या झालाय !

श्री– असं होय ! हे आम्हाला माहीतच नव्हतं.

गद्रे-- मग ? इन्क्वायरीचं काय झालं ? की सगळंच ओमफस्.

श्री-- आम्ही हरलो काका.

गद्रे-- तरीच गेले काही दिवस दडी मारून बसला होता आबा.

श्री– दडी वगैरे काही नाही. तब्येतच बरी नव्हती आबांची.

गद्रे-- फारच मनाला लावून घेतलेलं दिसतंय ! पण इथल्या शाळेत का होईना त्याची वर्णी लागलो यात समाधान मानायचं !

( सुस्कारा सोडतात )

आम्ही तर असं ऐकतोय की तुम्ही म्हणे पुढे जाताय !

श्री– म्हणजे ?

गद्रे– नाही. आपलं ऐकतोय बुवा. तुम्ही म्हणे मुंबईच्या मोठ्या वकिलाच्या हातात ही केस देताय !

श्री–बघायचं !

गद्रे–कोण बघणार हो. या केससाठी मोठा वकील कोण उभा रहाणार हो

श्री–तुम्ही काहीतरी ऐकलंच असणार गद्रेकाका.

गद्रे–नाही...म्हणजे तसं ऐकलंय. पण एवढा मोठा टाप ॲडव्होकेट असल्या केसेस कशाला घेणार म्हणा

श्री– तुम्ही काय ऐकलंत ते तरी सांगा...म्हणजे आम्हीही आणखी ऐकवू.

गद्रे–छ्या: छ्या:...आमची आपली कुमी म्हणत होती.

श्री– काय ते ?

गद्रे–अरे अमीत चक्रवर्ती नाव सांगितलंन फाडकन.

मी म्हटलं माझ्या जवळ बोललीस. दुसरीकडे कुठे बोलू नकोस, तर ती म्हणाली श्री आणील त्यांना. मी तिला म्हणालो, असल्या केसेस ते कशाला घेतील ?

श्री–असल्या म्हणजे ?

गद्रे–छोटया छोटया रे ! ते फक्त खून दरोडयाच्या केसेस घेतात ही केस ती काय. लोणी कापायला काही कुणी कुऱ्हाड नाही आणत. राजूनं चेक चोरला म्हणजे काही दरोडा नाही घातला कुठल्या बँकेवर !

श्री– हो ना !

गद्रे– मग ? चला. वहिनी निघतो आता. आता आपलं जाता जाता एवढंच सांग आम्ही ऐकलं ते चूक की बरोबर ?

श्री– बरोबर काका. तुम्ही चूक कसं ऐकाल ?

गद्रे– म्हणजे ?

श्री– अमीत चक्रवर्ती आजच येणार आहेत.

गद्रे– काय म्हणतोस माझी थट्टा करतोस होय ? नाही !...म्हणजे आम्हांला कल्पना आहे तशी...

(बाहर गेलेले आबा येत…)

आबा– कसली कल्पना ?

गद्रे– ये…ये…बरा आहेस ना ?…ताप काय म्हणतोय तुझा. तापात काय काय बडबडत होतास !…

आबा– बरं आहे आता !…तुझं काय लेक्चर चाललंय !…

गद्रे– हेच. अमीत चक्रवर्ती येणार असं आत्ताच कळलं. बॉम्बेतले टाप अॅडव्होकेट आहेत ते !…बॉम्बेत त्यांचा हात धरणारा कुणी नाही. पण पैसा कसा धो धो ओतावा लागेल आबा…

आबा– नाही. खर्च तर येणारच.

गद्रे– ते एकदा कोर्टात उभे राहिले की अशीलाचा खिसा खाली…पण होऊन जाऊ देत एकदा ते. आमणी नाहीतर ठामणी. म्हणजे तुझ्या मनाला रुखरुख नको.

मला फक्त एका गोष्टीचं राहून राहून आश्चर्य वाटतं. तुमच्या बंधुराजांचा एवढा टाठ वशिला असून सगळी इन्क्वायरी हशब कशी करता आली नाही तुम्हाला आँ !…

आबा– आमचा वशिलाबिशिला काही नाही हो…

गद्रे– वशिला नसणारच होऽऽ…नाहीतर तुम्ही इन्क्वायरीत हरलाच कशाला असतात. चक्क खूनी, दरोडेखोर सुटतात !…ही काय नुसती चोरी होऽ

आबा– आमच्या राजूनं तसं काही केलेलं नाही.

गद्रे– आणि मी म्हणतो केलं असलं…

आबा– नाही हो.

गद्रे– एक धरून चाला…केलं असलं–तरी मुलांना काय कळतंय त्यात ! पण एवढासा पोर असून कमाल आहे हो आबा त्याची !

..ही गंमत आपलं चौकशी सुरू झाली केव्हा ?

आबा– दीड एक महिन्यापूर्वी.

गद्रे– सिंघानिया स्कूलने पहिल्यांदा त्याला काढूनच टाकला.

आबा– हो.

गद्रे– ही काय पद्धत झाली ? मग ? तुमच्या ब्रदरनं तुम्हाला सजेस्ट केलं !

आबा– नाही. तो पहिल्यापासूनच या सगळ्याच्या विरुद्ध. आमचा ब्रदर त्या शाळेचा सन्माननीय सदस्य आहे.

गद्रे– हो. माहीत आहे. त्यांचा मुलगा मन्या..राजूच्या बरोबरीचाच. तो कितवीत आहे ?

आबा– राजूच्याच बरोबर. सिंघानियालाच आहे.

गद्रे– वा ! म्हणजे हुशार आहे तोही.

आबा– हो.

गद्रे– मग ? तुमचे भाऊ विरुद्ध.

आबा– हो. त्यानंच लिहिलं की हे सगळं प्रकरण आम्ही आवरतं घ्यावं. यातून मनःस्तापाशिवाय काहीही पदरी पडणार नाही. खर्चापरी खर्च होईल.

गद्रे– खर्चाला कोण घाबरतोय ! आँ. पुढे.

आबा– आम्ही कशी बशी इन्क्वायरी उभी केली.

गद्रे– भावाची मदत घेऊनच ना ? ते कळलं.

आबा– नाही. इन्क्वायरी स्वतंत्रपणे मिळाली.

गद्रे– (आटपतं घेत) पण शेवटी चोरले असंच ठरलं ना ?

आबा– (एक्साइट होत) पण आम्ही स्वस्थ बसलेलो नाही. माझा मुलगा निर्दोष आहे. त्याच्यावर अन्याय झाला आहे. ती चौकशी म्हणजे नुसता फार्स होता. आम्ही शाळेला तसं पत्रही लिहिलंय !

गद्रे– नुसत्या पत्राला ती शाळा केराची टोपली दाखवील हो. हाँ ! पण हा चक्रवर्ती मिळाला तर मात्र शाळेची उलटीपालटी करून ठेवील. मिळाला मात्र पाहिजे. आहे श्री ! लटपटचा-खटपटचा आहे. तो आणील. चक्रवर्तीला काय ब्रह्मदेवालाही आणील.

(राजू शाळेतून आनंदात येतो.)

राजू– आई !... ए आई.

गद्रे– अरे व्वा ! देवाचं नाव काढल्यावर तुमचा कृष्ण कन्हैय्याच आला वहिनी !...बरंय. आम्ही निघतो. तू जास्त धावपळ करू नकोस आबा. आज चहा नकोच होता हं वहिनी.

राजू– (धावत) आबा..आबा.

गद्रे– संभाळून. .संभाळून.

आबा– राजू हळू. पडशील.

गद्रे– (सहजपणे) काय रे !

राजू– (आबांना) आबा ! आज शाळेत आमचं वजन केलं माझं एक किलो वाढलं.

गद्रे– वा !...छान.. छान. ही शाळा चांगलीच मानवली म्हणायची. आता इथं मात्र व्यवस्थित रहा !

राजू– (पिशवीकडे पहात) आबा हे काय आणलंय !

गद्रे– हं ! हं !...त्या पिशवीला हात लावू नकोस बाळ.

राजू– तुमची आहे.

गद्रे– हो. चला.

आबा– राजू. त्याच्या पिशवीला हात लावू नकोस हं !

गद्रे– लावू देत हो. तसं काही नाहीच आ त्यात. भाजी घ्यायची होती. म्हटलं जाता जाता डोकावून जावं.

राजू– आबा ... शाळेत किनई आज खूप मजा आली. गणिताचा पेपर मिळाला. मला पैकीच्या पैकी मार्क मिळाले आबा. सर नवे होते. ते माझ्याकडे बघत म्हणाले, ' राजेश करमरकर म्हणजे ते वर्तमानपत्रात छापून आलेलं ! तो तू ?'

...माझ्याकडे आणि पेपराकडे बघतच राहिले आबा.

गद्रे– त्यांना काय कापीबिपीचा डाऊट आला.

आई– (आतून) राजू आत चल. तू खाऊन घे काहीतरी.

राजू– मला भूक नाही आई. मग मी खाईन. मी खेळायला जातो.

आई– राजू...मग नको. मग आपल्याकडे पाहुणे येणार आहेत.

गद्रे– खाऊन घे आई म्हणतेय तर. आईचं ऐकावं. बरंय !... आम्ही पण निघतो. तुम्हाला काही भाजीबिजी आणायचीय का ?

आबा– (आत) काही हवंय का ग ? गद्रेकाका निघताहेत.

(गद्रेकाका जातात.)

ए !...

आई– आले हं ! (बाहेर येत) कुठं गेला होतात इतका वेळ.

आबा– ओळख.

आई– काही ओळखायला नकोय. डॉक्टरांनी तुम्हाला घरात फिरायला सांगितलं तर तुम्ही...

आबा– अगं शब्दश: घेऊ नकोस. घरातच फिरता फिरता थोडा बाहेर गेलो...बाहेर गेलो तर वाचनालयाच्या तिथून काकासाहेब.

आई– म्हणजे मोहनरावांचे वडील ?

आबा– हं !...

आई– मग ?

आबा– सगळं ठरवून आलो.

आई– म्हणजे ?

आबा– माणसं बाकी लाख आहेत हो. आपल्या हेमानं नशीब काढलं !

आई– घरी गेला होतात का त्यांच्या ?

आबा– अग नेलंच आग्रहानं. रिक्षात घालून. येताना पोचवायलाही आले काकासाहेब.

आई– मोहनराव होते का ?

आबा– हो. आज यायचंय म्हणाला. सज्जन आहे पोरगा.

आई– काय काय ठरवलंत ?

आबा– लग्न वैदिक पद्धतीनं. मानपान नाही. त्यांचा खर्च त्यांनी करायचा आपला आपण. रिसेप्शन छोटं ! अहेर स्वीकारायचे नाहीत. राजूचेही विचारत होते. काकासाहेब.

(तोच हेमा येते.) (वरून श्री येतो)

श्री– डॉक्टरकडून आलीस ?

हेमा– हो.

श्री– काय म्हणाले डॉक्टर ?

हेमा– रेस्ट घ्यायला सांगितलीय आबांना.

आबा– आता काय ! रेस्टच घेतोय की.

हेमा– अशी नाही काही. त्याहिपेक्षा हवाफेर करून आलात तर उत्तम.

श्री– आबा ! मस्तपैकी बाहेरगावी जाऊन या १५-२० दिवस.

आबा– बाहेरगावी ?

श्री– काय हरकत आहे ? तुम्ही आणि आई. गणपती पुळयाला जाऊन या

हेमा– जाताय का आबा ? खरंच जा. आईदेखील कधी कुठं गेलेली नाही मी पाहीन सगळं.

आबा– पुढं बघू.

श्री– आबा ! आणि बाहेरगावी जाणार ? स्वप्नातसुद्धा ते आपलं घर सोडणार नाहीत. बाहेर गेले तरी घरच्या काळज्या करत राहतील.

आबा– तुम्ही काळज्या लावू नका. म्हणजे आम्ही करणार नाही.

श्री– आम्ही कसल्या काळज्या लावतोय आबा.

आबा– मी तुला काही विचारलं तर त्याची खरीखरी उत्तरं देशील ?

श्री– हो.

आबा– मी काय म्हणतो. तुझं अभ्यासाचं मला काही ठीक दिसत नाही.

श्री– ठीक नाही म्हणजे काय ! मी अभ्यास करतोय आबा.

आबा– तू नीट ऐक आणि मग बोल. कितीही वेळा तुझ्या कानीकपाळी ओरडून सांगितलं तरी तू ऐकत नाहीस. मी तुला असं विचारतो की तुला बी. कॉम होता येईल का ?

श्री– का नाही आबा.

आबा– मला आपलं वाटलं म्हणून विचारलं ! व्यवस्थित पास हो म्हणजे झालं !

श्री– होईन मी.

आबा– मला काही तुझी लक्षणं ठीक दिसत नाहीत.

श्री– पण मी अभ्यासच करतो आबा.. लक्षणं दिसत नाहीत म्हणजे आणखी आता काय दिसायला पाहिजे.

आबा– ही बेला कोण ?

(श्री गोंधळतो खाली मान घालतो)

श्री– माझी कॉलेजची मैत्रीण.

आबा तुम्ही दोघं फिरता ?

श्री– बोलतो. पण म्हणजे तसं काही नाही.

आबा– श्री ! तू जेव्हा खरी उत्तरं देईन म्हणून प्रॉमिस करतोस तेव्हा खोटी उत्तरं देतोस. अभ्यास करीन म्हणतोस तेव्हा करीत नाहीस.

तुम्ही दोघं सिनेमाला गेला होतात की नाही ?

श्री– नाही म्हणजे...

(तोच आतून आई येते) (तिच्या हातात डबा)

आई– श्री ! ए श्री (आबांना) तुम्ही आता वर जाऊन निवांत पडा बघू जरा.

आबा– पण ते आपले वकीलसाहेब.

आई– हो. ते येतील. आले की आम्ही तुम्हाला सांगू. श्रीनं ते सगळं केलंय. (आबा अनिच्छेने उठतात) तुम्हाला डॉक्टरांनी जास्त बोलायचं-सुद्धा नाही असं सांगितलंय हे लक्षात ठेवा. (आबा जातात)

आई– श्री !

श्री– काय ग आई ?

आई– कालपासून मी सांगेन सांगेन म्हणतेय.

श्री– बोल.

आई– अरे कालच मी बेसनाचे लाडू करून या डब्यात ठेवले होते. आज कमी दिसताहेत.

श्री– तुझं आपलं काहीतरीच हं आई.

आई– असं नाही रे !

श्री– मग मोजायला चुकली असशील.

आई– असेल बाबा. पण जरा लक्ष असू देत. आणि.

श्री– आणीक काय आता.

आई– स्टीलची छोटी ताटलीहि दिसत नाहीए.

श्री– ते भीमाला विचार. या मोलकरणी म्हणजे. त्यात आपली भीमा म्हणजे नंबर एकची अजागळ आहे.

आई– तुला हवाय का रे एखादा ? (डबाच पुढे करते)

श्री– आबांना दे. आबांना आवडतात ना.

आई– तू आता कुठं निघालास ?

श्री– स्टेशनवर जातोय. अमीत चक्रवर्तींना घ्यायला जायला हवं ना कुणी-तरी. तसा पत्ता देऊन ठेवलाय मी.

आई– लवकर ये.

श्री– हो. (जातो)

(आई वर जायला निघते तोच–)

हेमा– आई ! ए आई माझ्या डब्यातले पैसे घेतलेस का ग ?

आई– नाही. का ग ?

हेमा– आपलं सहज विचारलं.

आई– कमी आहेत का ?

हेमा– पाच रुपये कमी लागताहेत.

आई– आठव. तूच कुणाला दिलेस का ?

हेमा– नाही. गेले आठ दिवस मी डबाच उघडलेला नाही.

आई– श्रीनं घेतले असतील. त्याला विचार.

(तोच खेळातली स्कुटर घेऊन येणारा राजू एकदम थबकतो.)

राजू.... ए राजू.

हेमा– आई त्याला नको विचारूस.

राजू– मी खेळायला जातो ग आई. (जातो)

आई– अग राजू आल्यापासून हेच प्रकार सुरू झालेत घरात. त्याला तिकडे असली सवय लागली असली तर वाईट आहे. लक्ष ठेवायला हवं त्याच्यावर बारीक.

आबा– (जिन्याच्या पायरीवरून) अग राजूला सांगितलंस का. त्याला म्हणाव लवकर ये. लांब जाऊ नकोस कुठे. आपल्याकडे पाहुणे येणार आहेत.

आई– हो. बोलावून सांगते. इथंच खेळायला गेलाय तो.

हेमा– आई ! आबांना यातलं काही बोलू नकोस हं.

आई– नाही ग. काही कळत नाही बाई त्याचं.

त्यात आज कोण ते वकील येणार आहेत. श्री गेलाय त्यांना आणायला

(दार वाजते.)

आलेच वाटतं. मी आत जाते. (हेमा दार उघडते.)

हेमा– या.

मोहन– का ग ? गेल्या आठवड्यात एकदाही भेटली नाहीस.

हेमा– वेळच मिळाला नाही

मोहन– आज आबा येऊन गेले आमच्याकडे.

हेमा– हो. म्हणत होते. व्यवहाराचंही ठरलं म्हणून आईला कायसं सांगत होते.

मोहन– तसं काहीच ठरलेलं नाही गप्पांच्या ओघात झालं तेवढंच.

हेमा– काकासाहेबांचं कौतुक करत होते.

मोहन– हो.

हेमा– हो ना !

मोहन– आज बाहेर येशील ?

हेमा– का रे ?

मोहन– सहजच.

हेमा– आले असते. पण आज आमच्याकडे ' अमीत चक्रवर्ती ' येणार आहेत.

मोहन– अमीत चक्रवर्ती !

हेमा– हो. श्री गेलाय त्यांना आणायला.

मोहन– कशाला ? राजूसाठी.

हेमा– हो.

मोहन– पैसे फार झालेत का ?

हेमा– तसं नाही. पण त्यांना विचारून काहीतरी करायचं ठरतंय.

मोहन– मग आज तुला बाहेर यायला जमणार नाही.

हेमा– कसं येऊ ? तूच सांग. काही काम होतं का ?

मोहन– थोडं बोलायचं होतं.

हेमा– मग बोलू या की इथंच. चालेल का ?

मोहन– हो. न चालायला काय झालं ?

(आई बाहेर येत . )

आई– कोण आलंय ग ? तुम्ही ?

मोहन– हो.

आई– बसा ना ! श्री नाही का ग आला अजून ?

हेमा– येईल आता.

आई– तुम्ही बसा. (आत जाता जाता) श्री आला की सांग.

मोहन– तुम्हीही या ना इकडेच आई. आत काय करताय !

आई– (उंबरठ्यावर) आहे की... इथंच बरी आहे. हे आज आले होते...

मोहन– हो. तेच सांगतोय मी हेमाला. आम्ही वनरूम किचनचा एक ब्लॉक बुक करतोय आई.

आई– हो का ! वा छान .. हे काही सांगितलं नाही हो यांनी.

मोहन– तरी नव्वद हजारांच्या घरात जातंय सगळं ! आहे छोटाच... तसा स्वस्तच मिळतोय.

आई– वा ! चांगलं आहे. म्हणजे हेमाचा पायगुण चांगला म्हणायचा.

मोहन– हो ना ! आज आठ दिवस धावपळ चाललीय आमची तसा एक इन्स्टॉलमेंट भरलाय. आता दुसरा भरायचाय.

आई– हो रे बाबा... आजकालच्या महागाईच्या दिवसात फार कठीण होत चा ललंय सगळं.

मोहन– पण एकदा केव्हातरी धाडस करायलाच हवं. पुढं आणखी किमती वाढतील.

आई– हो. तेही खरंच. थांबा हं ! मी थोडा चहा करून आणते. (आत जात) बेसनाचे लाडू आवडतात. का ग त्यांना !

मोहन– आईना सांग चहा लाडू वगैरे काही नकोय मला.

हेमा– बघ तर आमच्या आईच्या हातचा...

मोहन– नको ग ! मी थोडा वेगळयाच कामासाठी आलो होतो. थोडं स्पष्टच विचारतो. गैरसमज करून घेऊ नकोस. तुमच्याकडून आम्हाला फार नाही. एक दहा बारा हजाराची तजवीज होऊ शकेल का ? एक आठवड्याभरात सोळा हजार भरायचेत ब्लाकसाठी.

हेमा– सोळा हजार !

मोहन– तुम्ही फक्त बारा हजार द्यायचे.

हेमा– बारा हजार !

मोहन– ब्लॉक आपल्यासाठीच घेताहेत काका.

हेमा– हो पण इतके पैसे कुठून भरायचे ?

मोहन– तू असं कर आत्ताच निर्णय पाहिजे असं नाही. आबांच्या कानावर

घाल.

हेमा– मी.

मोहन– हो. काय हरकत आहे ?

हेमा– त्यांच्याकडे कुठून असणार एवढे पैसे ?

मोहन– तू त्यांच्याजवळ बोलून तर ठेव.

हेमा– अरे पण आबांना इतकं देणं शक्यच नाही. खरंच आम्हाला शक्य नाही.

मोहन– तुम्ही आम्ही काय करतेस. तू सांगून तर बघ.

हेमा– त्यापेक्षा आपण ब्लॉक पुढे घेतला...

मोहन– अग एक इन्स्टॉलमेंट भरून बसलोय आम्ही. त्यामुळे पंचाईत झालीय. शेवटी आपल्या माणसांचा अडचणीच्या वेळी उपयोग नसेल तर ती आपली माणसं कसली ? काहीतरी मार्ग तर निघायला हवा.

हेमा– काय करायचं ! मला तर काहीच सूचत नाही.

(तोच बेल वाजते. हेमा दार उघडते. दारात कमाकाका उभा.)

(बॅग घेऊनच आत येतो.)

कमा– काय म्हणतेय आबांची तब्येत ! पत्र मिळालं ? विभा म्हणाली, मुंबईला जाताच आहात तर पाहून या आबांना. आधीच त्यांचा 'गुस्सा' झाला असणार. बाकी बरे आहेत का सगळे ?

हेमा– हो.

कमा– (मोहनकडे पहात) तुम्ही बसा. उभे नका राहू.

(आई बाहेर येत)

आई– केव्हा आलात भावोजी ?

कमा– जस्ट येतोय इतकाच. (हेमाला)हे काय ! साडी नवी ? (मोहनला) तुमच्याकडून दिली वाटतं ?

हेमा– नवी नाही काका.

कमा– ते लक्षात येतंय. सेकंडची दिसतीय.

हेमा– सेकंडची सुद्धा नाही- आहे तीच रफू केलीय.

कमा– वा ! संसार चांगला करशील हो. तुमची डेट ठरली की नाही ?

हेमा— अजून नाही.

कमा— सध्या आमची तिकडे धावपळच चाललीय. या दोन महिन्यांत ठरलं तर मला यायला जमणं कठीण. पण विभा आणि मुलं येतील म्हणून आपलं विचारून घेतोय.

आई-- या दोन महिन्यांत नाहीच ठरवत आहोत भावोजी.

कमा— का बुवा ? एकदा जमलं की उरकून टाकायचं. नाही का ? एनी प्रॉब्लेम ! मनी मॅटर ?

(आबा वरून)

आबा— कोण आलंय ग ?

कमा— अरे मी आलोय. काय म्हणतेय तुझी तब्येत !

मोहन— (अनिश्छेने) हेमा मी निघतो.

हेमा— निघता ?

मोहन— हो, तू जरा लक्षात ठेव.

हेमा— हो. बघते.

मोहन— (हलक्या आवाजात) तुमच्या काकांनाच विचारून बघ ना बरंय आई ! निघतो काका. (जातो)

कमा— वाय !...येववेल का खाली ? हळू. डॉक्टर काय म्हणतायेत ?

आई— हवाफेर करायला सांगितलंय !

कमा— माझ्याचकडे नेला असता मी त्याला. बंगल्यात एक रूम दिली की रेस्ट ! एकदम काम अॅन्ड क्वाएट, पण तुलाच करमणार नाही. मी माझ्याकडून आग्रहानं सांगतो हो. पण तुझं तू बघ बाबा.

आबा— नाही. आलो असतो रे. पण डॉक्टर म्हणताहेत आता तशी बरी आहे तब्येत. पण विश्रांती हवी. तो काय इथं घेतली काय नी तिथं घेतली काय !

कमा— ठीक...ठीक.

आबा— आणि मीही विश्रांतीच घेतोय. करतोय काय !

कमा— कुठली विश्रांती ? नी काय ! इथं येऊन उतरतोय तर चाळीतले चारजण माझ्या कानाशी. तिथपर्यन्त बातम्या येऊन थडकल्यात. मी म्हणतो तू चालवलंस काय !

आबा– काय ? कशाबद्दल ?

कमा– इथं म्हणे तुमची जंगी तयारी चाललीय ! हा... हा अमीत चक्रवर्ती कोण ? आज मला मुंबईला मीटिंग होती म्हणून म्हटलं निदान उभ्या उभ्या तरी भेटून जावं तुला. तर इथं एकेक नवीनच कळतंय !...

...तुला जर असलं काही करायचं होतं तर मला तरी विचारायचंस की नाही. की आम्ही तुमचे कोणीच नाही ?

आबा– इन्क्वायरीत हरलो म्हणून पुढे काहीतरी नको का बघायला'

कमा– म्हणून हे. असलं काही केलंस तर शाळा त्याला चांगलं सर्टिफिकीट तरी देईल का ? त्या शाळेला कोर्टात खेचणं सोपं आहे का एवढं ? आणि इन्क्वायरीत हरलात तेवढं पुरे नाही का झालं ?

आबा– त्या इन्क्वायरीला काही अर्थ नव्हता कमा.

कमा– असं कोण म्हणतो ? श्री ? का ? राजू चोर ठरला म्हणून ? इन्क्वायरीच्या वेळेला तू बघितलंसच सगळे तुमच्या विरुद्ध. मी एकटा तुमच्या बाजूने. पण सगळेच विरुद्ध असल्यावर मी एकटा काय करणार ? मी फ्राम द व्हेरी बिगिनिंग सांगत होतो. इन्क्वायरीचा फार्स वगैरे करू नका. मी तिथं आहे. नाही म्हटलं तरी आज तिथं माझ्या शब्दाला वेट आहे. पण तुम्ही ऐकलं नाही. काय झालं ?

आज मी आलोच आहे तर इतकंच सांगतो की पुढं जाऊन उगीच पैशापायी पैसा खर्च करू नकोस. पैसे जास्त का झालेत आपल्याला ? जे थोडक्यात निभावलंय त्याचा बभ्रा मात्र होईल सगळीकडे

आबा– अरे बभ्रा कसला त्यात ?

कमा - एक तर तुझ्या पोरानं आम्हाला तोंड दाखवायला जागा ठेवली नाही सोसायटीत. त्यात पुन्हा तुम्ही शाळेला कोर्टात खेचायची तयारी करताय !

विभा म्हणाली, " ते तुमचे मोठे भाऊ आहेत. तुम्ही लहान आहात. तुम्ही कशाला वाईटपणा घेताय ? त्यांना जे करायचं ते करू देत.

आपण कितीही सांगितलं तरी त्यांना काही पटणार नाही.
पण रहावत नाही. किती झालं तरी रक्ताचं नातं ! मी म्हटलं सांगून बघतो. म्हणून हा वेळात वेळ काढून आलोय !

आबा— आलास हे बरं केलंस हो. तू असं कर. आल्यासारखा वस. आपण सावकाशीनं बोलू.

कमा— उद्या पाच पन्नास रुपयांसाठी प्रत्येकजण कोर्टात जाऊ लागला तर वकील न्यायाधीशांना दुसरा उद्योगच उरणार नाही. राजू कुठंय ?

हेमा— खेळतोय बाहेर.

कमा— (आबांना) ज्याला काही वाटायला पाहिजे तो तिकडे मजेत आहे.

हेमा— त्याला यातलं काहींच कळत नाही काका.

कमा— न कळायला काय झालं ? बाकी सगळा हुशार आहे. चोऱ्या करायच्या कळतात. मग अंगाशी आल्यावर पटकन् कबूल करायचं नाही कळत !

हेमा— जाऊ दे. विषयच नको तो.

कमा— नको. सोडला. मला तरी कुठं हवाय ? अग इकडं ये. इकडं ये.
(बॅगेतून तीन कापडं काढतो)
हे बघ. हे पीसेस तुला विभानं दिलेत. ठेव.
(हेमा थोडी आनंदते) (काही बोलणार तोच—
परकर शिवून द्यायचे ह्याचे. तिचं काय झालंय ! साड्या झाल्यात रगड. दोन वॉर्डरोब्स भरलीत. पण मॅचिंग परकर नाही. रेडीमेड घे. म्हटलं तर पसंत पडत नाहीत. हेमानीच शिवलेले आवडतात. एकदा कधी तू शिवला होतास.
आता सुटी लागली तर सगळेच तिकडे या. यायच्या अगोदर एक पत्र टाक तू ! म्हणजे झालं. काय ? आपण मजा करू.
(बेल वाजते. श्री आणि अमीत चक्रदेव)

श्री— या. आबा ! चक्रदेव.
(आबा नमस्कार करतात) आमचे कमाकाका.

कमा— ग्लॅड टू मीट यू.

(शेकहॅन्ड करायला पुढे. चक्रवर्ती नमस्कार करतात)

श्री– हेमा बहीण माझी. आई ! ए आई.

(चक्रवर्ती मान हलवतात)

बसा आपण बसा. तुम्हीहि बसा ना काका.

(तोच येल. दारात गोविंदराव गद्रे)

आबा– या.

गद्रे– नाही, येत नाही. तुमचा पेपर पिशवीतच राहिला मघाशी ! म्हटलं आबाला हवा असणार ! घ्या वहिनी. ही ताटली. बेसनाचे लाडू छान झाले होते असा आमच्या कुमीचा निरोप आहे हेमा तुला.

श्री– या, या गद्रेकाका. आत या ओळख करून देतो. हे अमित चक्रवर्ती.

गद्रे– एवढी मीटिंग बघितली तेव्हा वाटलंच मला. हचः हचः हचः आपलं नाव ऐकून आहोत.

चक्र– थँक्यू. आता आपण.

आबा– श्री ! राजूला आण.

श्री– आई आणतेय आबा.

(आई राजूला घेऊन येते.)

आई– नाही हं राजू. आता हट्ट करायचा नाही हं !

श्री– (पुढे येत) काय आहे राजू ?

आई– आत्ता सिनेमाला पैसें मागतोय माझ्याकडे. मी म्हणाले उद्या देते. उद्या जा. तर ऐकतच नाही.

श्री– नाही हं राजू. परवाच 'लॉरेल हर्डी' च्या पिक्चरला जायला माझ्याकडून पैसे घेतलेस !

राजू– सगळे जातात. आम्ही पण जाणार.

आई– मी तुला सांगते ना !

श्री– जास्त लाड करू नकोस हं त्याचे. राजू माझ्याजवळ नव्हते तरी मी तुला हेमाताईच्या डब्यातून पाच रुपये काढून दिले. आता इथं बैस निमूट. आणि हट्ट करू नकोस.

(राजू अनिच्छेने बसतो. आबा राजूची ओळख करून देतात)

आबा– हा माझा मुलगा राजेश. राजू नमस्कार कर काकांना. (राजू खाली

वाकून नमस्कार करतो. चक्रवर्ती त्याची प्रत्येक हालचाल लक्षपूर्वक टिपत आहेत. त्याची प्रत्येक कृती न्याहाळून पहात आहेत.)

हे बघ राजू ! ...हे तुला जे काही प्रश्न विचारतील त्या सर्व प्रश्नांची खरी खरी उत्तरं द्यायची, मला जसं सांगितलंस तस्स सांगायचं ! ...

राजू– (पाय आपटत) (हिरमुसला चेहरा करून) ए आई ग ! ...मला खूप भूक लागलीय ना ! ...

आबा– त्यांना वेळ नाही राजू ! प्रथम ते काय विचारतात त्याची उत्तरं दे.

आई– मी तयार ठेवते सगळं ! पोळी भाजी चालेल ना तुला ?

राजू– आणि मोरंबा !

आई– बरं ! बरं !

(आई व हेमा आत जातात.)

आबा– राजू नीट उत्तरं दे हं ! (आबा व सगळे उठू लागतात.)

चक्रवर्ती– तुम्ही थांबायला हरकत नाही. फक्त अट एक. माझ्या प्रश्नांची उत्तर तुम्ही द्यायची नाहीत. अॅन्ड नॉट टु डिस्टर्ब अस् ओ. के. (आबा तिथेच बसतात आणि चक्रवर्ती काय विचारतात ते उत्सुकतेने ऐकू लागतात.)

चक्रवर्ती– (शांत स्वरात) राजू ! तुझं नाव नाही का ? राजू ! ...इथं टेबलाशी उभा रहा.

(राजू मान खाली घालून उभा)

चक्र– माझ्याकडे बघ.

राजू त्यांच्या नजरेला नजर देतो. त्याच्या नजरेत निखळ बालिश भाव. अत्यंत शांतपणे चक्रवर्ती उलट तपासणीला सुरुवात करतात.)

चक्र– हे बघ राजू ! तुझं वय काय ?

राजू– चवदा. दोनच दिवसांपूर्वी माझा वाढदिवस झाला. काका.

चक्र– म्हणजे तुला ती शाळा सोडावी लागली तेव्हा तू तेरा वर्षांचा होतास ? बरोबर ?

राजू– हो.

चक्र– आता तू एप्रिल महिन्यातली सात तारीख आठव. त्या दिवशी जे काही घडलं ते तसंच्या तसं तुझ्या शब्दात सांग.

राजू– त्या दिवशी शुक्रवार होता. आम्हाला सुटी होती.

चक्र– कसली ?

राजू– आमच्या शाळेने क्रिकेटची मॅच जिकली होती.
सकाळी आम्ही ड्रिलसाठी ग्राऊंडवर गेलो. नंतर मी बॅकेत गेलो.

चक्र– बॅकेत ?

कमा– सिघानिया स्कूलच्या हॉस्टेलमधल्या प्रत्येक मुलाचं बॅकेत खातं आहे. मुलांना बॅकेचे व्यवहार कळावेत व सेव्हिंगची सवय लागावी यासाठी.

चक्र– गुड्...तर तू बॅकेत गेलास ?

राजू– हो.

चक्र– कशासाठी ?

राजू– मला चेकबुक हवं होतं.

चक्र– का ?

राज– मला पैसे काढायचे होते.

चक्र– किती ?

राजू– २५ रुपये.

चक्र– इतके पैसे ?

राजू– मला शाल घ्यायची होती.

चक्र– तुला ?

राजू– आईसाठी. तिला चकित करायचे होते.

चक्र– शालीची किमत २५ रुपये होती.

राजू– नाही. ३५ रु. ५० पैसे.

चक्र– उरलेले ?

राजू– मी जमवले होते.

चक्र– १० रु. ५० पैसे कसे ?

राजू– मी एकवेळ पायी जायचो. बस एक वेळसाठीच घेतली होती मी.

चक्र– तुझ्या खात्यात किती पैसे होते ?

राजू– अठ्ठसष्ट रुपये.

आबा– त्यामुळे तुम्हीच पहा वकीलसाहेब तो दुसऱ्याचे २५ रुपये कशासाठी घेईल ? आमच्या राजूला सवय नाही हो असली. तो खूप सरळ मुलगा आहे.

चक्र– तू बँकेतून आल्यावर काय केलंस ?

राजू– मी मेसवर जेवलो. नंतर शाळेच्या लायब्ररीत निघालो. त्याच वेळी मला चारु इनामदार भेटला.

चक्र– तुझा रूम पार्टनर.

राजू– हो. तो म्हणाला कुणीतरी साल्यानं माझ्या कपाटाचं कुलूप काढलं आणि माझा चेक लांबवला. मी प्रिन्सिपॉलकडे तक्रार केलीय.

चक्र– चारु इनामदाराचे शब्द तू मला जसेच्या तसे सांगतोस ?

राजू– सालाऐवजी त्याने दुसरी वाईट शिवी वापरली असेल. इतकंच. बाकी शब्द हेच.

चक्र– तुझी स्मरणशक्ती फार चांगली आहे राजू ! पुढे ?

राजू– त्यानंतर तीन चार दिवसांनी मला आमच्या प्रिन्सिपॉलनी भेटायला बोलावलं. बँकेतली एक जाडी बाई तिथे आली होती. प्रिन्सिपॉलनी तिला विचारले, "हाच तो मुलगा का ?"

ती म्हणाली, "असू शकेल. मला नक्की सांगता येणार नाही. शाळेच्या गणवेषात सगळीच मुले सारखी दिसतात."

आबा– म्हणजे ती तुला ओळखू शकली नाही.

चक्र– प्लीज ! (राजूला) यस !

राजू– नंतर ती म्हणाली मला फक्त इतकंच आठवतंय की ज्या मुलाने चेकबुक घेतलं त्याच मुलाने चेक वटवून २५ रुपये घेतले. नंतर प्रिन्सिपॉलने मला विचारले की तू २५ रुपये काढले का ? मी म्हणालो' "नाही."

त्यांनी मला चारु इनामदाराचे नाव माझ्या वहीच्या कागदावर लिहायला सांगितले. ते नाव चेकवरील सहीशी जुळते का ते बघितले आणि जायला सांगितले. १० दिवसांनंतर त्यांनी मला शाळेतून काढून टाकले.

चक्र– तू चारु इनामदाराची सही करून चेकचे पैसे घेतलेस ?

राजू– नाही.

चक्र– तू सांगतोस ते सत्य आहे. केवळ सत्यच आहे सत्याशिवाय तू काहीही बोलत नाहीस ?

राजू– नाही. मी खरंखरंच सांगतो आहे.

चक्र– तू शपथपूर्वक सांगशील ?

राजू– हो.

चक्र– जेव्हा तुला प्रिन्सिपॉलनी चारूचं नाव कागदावर लिहायला सांगितलं तेव्हा तू ते कसं लिहिलंस ? म्हणजे संपूर्ण की आणखी वेगळं ?

राजू– चारुदत्त इनामदार असं लिहिलं !

चक्र– चारुदत्त इनामदार ? तुला तो खोटी सही केलेला चेक बघायला मिळाला ?

राजू– हो. प्रिन्सिपॉलनी तो मला दाखवला.

चक्र– तू कागदावर चारूचं नाव लिहिण्यापूर्वी की नंतर.

राजू– नंतर !

चक्र– त्याच्यावर सही कशी होती ?

राजू– (खाली मान घालून) मी केली तशीच होती.

चक्र– (आश्चर्याने) तशीच. म्हणजे चारुदत्त इनामदार ?

राजू– हो.

चक्र– जेव्हा तू तुझ्या वहीच्या कागदावर त्याचं नाव लिहिलंस तेव्हा याच पद्धतीने तू ते का लिहिलंस ?

राजू– तो अशीच सही करायचा.

चक्र– तुला कसं माहीत ?

राजू– तो माझा मित्र होता.

चक्र– हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही. तुला कसं माहीत ?

राजू– मी त्याला सही करताना बघितलं होतं.

चक्र– केव्हा ? कुठे ?

राजू– त्याला त्याच्या वह्यांवर सह्या गिरविण्याचा नाद होता.

चक्र– का ?

राजू– मला माहीत नाही.

चक्र– तुला सगळं माहीत आहे. तो वह्यांवर सह्या कशासाठी गिरवायचा.

राजू– त्याची ती सवय होती.

चक्र– तू ते बघितलंस ! त्याला माहीत आहे तू हे बघितलेलं ?

राजू– हो.

चक्र– दुसऱ्या शब्दात असं सांगता येईल की त्याने तुला तो सही कशी करतो हे दाखवलं !

राजू– हो

चक्र– तू त्याची सही गिरविण्याचा कधी प्रयत्न केलास ?

राजू– केला असेलही

चक्र– केला असेलही याचा अर्थ काय ? केलास की नाही ?

राजू– हो केला.

आबा– राजू ह्या गोष्टी तू मला कधीही सांगितल्या नाहीस !

राजू– आम्ही सहज गंमत म्हणून करायचो आबा.

चक्र– म्हणजे गंमत म्हणून तू चारूची सही करण्याचा प्रयत्न केलास !

राजू– सही करण्याचा प्रयत्न नाही.

चक्र– मग त्याला काय म्हणायचं ?

राजू– त्याचं नाव मी लिहायचो.

चक्र– त्याच्याच सारख्या हस्ताक्षरात सहज गंमत म्हणून.
ज्या मुलाने चारूचा चेक चोरला आणि बॅन्केत वटवला त्याने सुद्धा चेकवर चारूच्या हस्ताक्षरासारखे चारूचे नाव लिहिले होते.

राजू– असेल.

चक्र– असेल नको. हो की नाही ?

राजू– हो.

चक्र– आणि आश्चर्याची गोष्ट अशी की ज्या कोणी चेक चोरला, त्याने अशा पद्धतीने चेकवर सही केली होती की ज्या पद्धतीने तू चारूचे नाव लिहायचास.

आबा– वकीलसाहेब, म्हणजे आपल्याला असं म्हणायचंय का ? की,

चक्र– मला काहीही म्हणायचं नाही. हा मुलगा जे सांगतोय त्यावरून

निघणारा हा निष्कर्ष आहे.

तुला माहीत आहे. राजू तो सही केलेला चेक तुझ्या शाळेने हस्ताक्षर तज्ज्ञाकडे पाठविला होता.

राजू– हो.

चक्र– आणि तुला हेही माहीत असेल की' हस्ताक्षर तज्ज्ञांनी असे सांगितले की, चेकवरील सही आणि तू केलेली कागदावरील सही ह्या दोन्ही एकाच व्यक्तीच्या हस्ताक्षरांतील सह्या आहेत.

राजू– हो.

चक्र– तरी तू म्हणतोस की ती मी केलेली नाही ?

राजू– हो मी खरंच ती सही केली नाही.

कमा– याचा अर्थ हस्ताक्षर तज्ज्ञांना त्यांचे काम येत नाही, त्याना काडीची अक्कल नाही.

राजू– तसं नाही पण त्याची चूक होते आहे.

चक्र- तुमची ड्रील किती वाजता संपली.

राजू– साडेसात.

चक्र– तू बॅन्केत कधी गेलास ?

राजू– साडे आकराच्या सुमारास.

चक्र– मधले चार तास तू काय करत होतास ?

राजू– मला आठवत नाही.

चक्र– मला वाटतं तुला ते आठवतं ! मी सांगतो ड्रील झाल्यावर तू खोलीवर गेला असणार !

राजू– मी बॅन्केत गेलो इतकंच मला आठवते.

चक्र– साडेसातला तुझी ड्रील संपल्यानंतर तू जर मधे कुठे थांबला नसशील जर बॅन्केत पोचायला चार तास ? मधे मित्राकडे गेला असशील आठव.

राजू– मी खोलीवर गेलो.

चक्र– एकटा ?

राजू– हो.

चक्र– तुला चारूचं कपाट माहीत असणारच.

राजू– अं ! ...अं !

—चक्र– हो की नाही ? अरे तो तुझा रूम पार्टनर ! कपाट का लपवून ठेवणार आहे ? म्हणून मी म्हटलं तुला चावीचं कपाट माहीतअसणारच !

राजू– हो.

चक्र– खोलीवर कशासाठी गेला होतास ?

राजू– माझ्या खिशातले पैसे ठेवायला.

चक्र– ड्रीलनंतर तुमच्या शाळेत पैसे वाटतात ?

राजू– नाही.

चक्र– मग तुझ्या खिशात पैसे आले कुठून ?

राजू– माझे जमवलेले दहा रुपये पन्नास पैसे.

चक्र– ते पसे तू खिशात घेऊन फिरायचास ?

राजू– हो आमच्या हॉस्टेलमधली पोरं पैसे चोरायची.

चक्र– रूमवर तू खिशातले पैसे ठेवायला गेला होतास ?

राजू– हो.

चक्र– का बरं ?

राजू– मला वाटलं खिशातून पडलेबिडले तर ? त्यापेक्षा कपाटात सुरक्षित ठेवलेले बरे !

चक्र– खिशात ठेवण्यापेक्षा कपाटात सुरक्षित रहातील. असं तुला का वाटलं ?

राजू– मला सांगता येणार नाही.

चक्र– अरे ! ड्रील होईपर्यंत ते तुझ्या खिशात होते. त्याचं कारणही तूच सांगितलंस ! हॉस्टेलमधली पोरं पैसे चोरतात. एकाएकी तेच पैसे खिशातून पडतील असं तुला का वाटू लागलं ?

राजू– ते मला नाही सांगता येणार !

चक्र– एकाएकी तुला असं कोणतं भय वाटलं की ज्यामुळे ते तुला कपाटात ठेवावेसे वाटले ?

राजू– (घाबरून) मला माहीत नाही. मला काही सांगायचं नाही.

चक्र– (आवाज चढवून) तुला खरंच माहीत नाही की माहीत असून सांगायचं नाही ? पण तुला जे सांगायचं नाही ते मला माहीत झालंय ! मी तुला सांगतो. कारण त्यावेळी रूमवर चावी नसणार

याची तुला पक्की खात्री होती. बरोबर ?

राजू– नाही. मला माहीत नाही.

चक्र– चारूचं कपाट तुझ्या कपाटाशेजारी होतं ?

राजू– मला आठवत नाही.

चक्र– शेजारी नसेल तर समोर असेल. एका रूममध्ये असून असून असणार कुठे ते ? त्यात न आठवण्यासारखं काय आहे ? पण तुझ्या रूममध्ये चारूचं कपाट होतं हे तर खरं !

राजू– हो.

चक्र– तू एकटा रूमवर गेलास तेव्हा चारूचं कपाट होतं तिथंच होतं ना की कुणी हलवलं होतं ?

राजू– तिथंच होतं !

चक्र– मग तू काय केलंस ?

राजू– माझ्या कपाटात पैसे ठेवले.

चक्र– चारूने कपाटात ठेवलेला चेक कधी हरवला ?

राजू– मला माहीत नाही. मला हेही माहीत नाही की चारूजवळ चेक होता व तो त्याने कपाटात ठेवला होता.

चक्र– अरे ! पण तो तुझा जिवलग दोस्त होता ना ?

राजू– पण तरीही त्याने ही गोष्ट मला सांगितली नाही.

चक्र– हे तू म्हणतोस म्हणून आम्ही खरं समजायचं ! ड्रीलनंतर तू रूमवर लगेच गेलास ?

राजू– हो. बहुतेक लगेच गेलो.

चक्र– नंतर ?

राजू– मी तुम्हाला सांगितलंच की मी बँकेत जायला आमच्या हॉस्टेल सुपरिन्टेन्डट्ची परवानगी घ्यायला गेलो.

चक्र– तेव्हा किती वाजले होते ?

राजू– साडेदहा.

चक्र– तुझी ड्रील साडेसातला संपली. तू साडेदहा वाजता परवानगी घ्यायला गेलास. तीन तास तू खोलीवर काय करत होतास ?

राजू– इतका वेळ मी खोलीवर नव्हतोच मुळी.

चक्र– हो की नाही ? अरे तो तुझा रूम पार्टनर ! कपाट का लपवून ठेवणार आहे ? म्हणून मी म्हटलं तुला चालूचं कपाट माहीतअसणारच !

राजू– हो.

चक्र– खोलीवर कशासाठी गेला होतास ?

राजू– माझ्या खिशातले पैसे ठेवायला.

चक्र– ड्रीलनंतर तुमच्या शाळेत पैसे वाटतात ?

राजू– नाही.

चक्र– मग तुझ्या खिशात पैसे आले कुठून ?

राजू– माझे जमवलेले दहा रुपये पन्नास पैसे.

चक्र– ते पैसे तू खिशात घेऊन फिरायचास ?

राजू– हो आमच्या हॉस्टेलमधली पोरं पैसे चोरायची.

चक्र– रूमवर तू खिशातले पैसे ठेवायला गेला होतास ?

राजू– हो.

चक्र– का बरं ?

राजू– मला वाटलं खिशातून पडलेबिडले तर ? त्यापेक्षा कपाटात सुरक्षित ठेवलेले बरे !

चक्र– खिशात ठेवण्यापेक्षा कपाटात सुरक्षित रहातील. असं तुला का वाटलं ?

राजू– मला सांगता येणार नाही.

चक्र– अरे ! ड्रील होईपर्यंत ते तुझ्या खिशात होते. त्याचं कारणही तूच सांगितलंस ! हॉस्टेलमधली पोरं पैसे चोरतात. एकाएकी तेच पैसे खिशातून पडतील असं तुला का वाटू लागलं ?

राजू– ते मला नाही सांगता येणार !

चक्र– एकाएकी तुला असं कोणतं भय वाटलं की ज्यामुळे ते तुला कपाटात ठेवावेसे वाटले ?

राजू– (घाबरून) मला माहीत नाही. मला काही सांगायचं नाही.

चक्र– (आवाज चढवून) तुला खरंच माहीत नाही की माहीत असून सांगायचं नाही ? पण तुला जे सांगायचं नाही ते मला माहीत झालंय ! मी तुला सांगतो. कारण त्यावेळी रूमवर चालू नसणार

याची तुला पक्की खात्री होती. बरोबर ?

राजू– नाही. मला माहीत नाही.

चक्र– चारूचं कपाट तुझ्या कपाटाशेजारी होतं ?

राजू– मला आठवत नाही.

चक्र– शेजारी नसेल तर समोर असेल. एका रूममध्ये असून असून असणार कुठे ते ? त्यात न आठवण्यासारखं काय आहे ? पण तुझ्या रूममध्ये चारूचं कपाट होतं हे तर खरं !

राजू– हो.

चक्र– तू एकटा रूमवर गेलास तेव्हा चारूचं कपाट होतं तिथंच होतं ना की कुणी हलवलं होतं ?

राजू– तिथंच होतं !

चक्र– मग तू काय केलंस ?

राजू– माझ्या कपाटात पैसे ठेवले.

चक्र– चारूने कपाटात ठेवलेला चेक कधी हरवला ?

राजू– मला माहीत नाही. मला हेही माहीत नाही की चारूजवळ चेक होता व तो त्याने कपाटात ठेवला होता.

चक्र– अरे ! पण तो तुझा जिवलग दोस्त होता ना ?

राजू– पण तरीही त्याने ही गोष्ट मला सांगितली नाही.

चक्र– हे तू म्हणतोस म्हणून आम्ही खरं समजायचं ! ड्रीलनंतर तू रूमवर लगेच गेलास ?

राजू– हो. बहुतेक लगेच गेलो.

चक्र– नंतर ?

राजू– मी तुम्हाला सांगितलंच की मी बँकेत जायला आमच्या हॉस्टेल सुपरिन्टेन्डट्‌ची परवानगी घ्यायला गेलो.

चक्र– तेव्हा किती वाजले होते ?

राजू– साडेदहा.

चक्र– तुझी ड्रील साडेसातला संपली. तू साडेदहा वाजता परवानगी घ्यायला गेलास. तीन तास तू खोलीवर काय करत होतास ?

राजू– इतका वेळ मी खोलीवर नव्हतोच मुळी.

चक्र– मग किती वेळ होतास ?

राजू– पाच दहा मिनिटे.

चक्र– उरलेला वेळ तू कुठे काढलास ?

राजू– मला आठवत नाही.

चक्र– काही गोष्टींत तुझी स्मरणशक्ती मोठी तीव्र आहे. काही गोष्टींत ती फारच कमकुवत आहे.

राजू- कदाचित तो वेळ मी बँकेत काढला असेल.

चक्र– म्हणजे आठच्या सुमारास तू लगेच बँकेत गेलास. बँकेत जाण्याची परवानगी तर तू साडेदहा वाजता घेतलीस ! म्हणजे साडेसात ते साडेदहा तू खोलीवर होतास की आणखी कुठे ?

राजू- हाँ ! मला आठवलं मी लायब्ररीत होतो.

चक्र– एवढे तीन तास लायब्ररीत असूनही तुला कोणी बघितलं नाही ?

राजू– नाही.

चक्र– लायब्ररीत कसला विचार करत होतास ? काय शिजत होतं डोक्यात ?

राजू- (फाटलेल्या आवाजात) काहीही नाही. मी तेथे होतो की नाही हे सुद्धा मला आठवत नाही. कदाचित मी लायब्ररीत नसेनही.

चक्र– तुला आता काहीच आठवणार नाही. तू लायब्ररीत नसणारच. कदाचित तू तुमच्या खोलीवरच असशील. चारूचे कपाट उघडण्याच्या प्रयत्नात.

कमा- एक्स्युज मी ! तुम्हाला असं विचारतो–

चक्र– प्लीज ! तुम्ही जरा गप्प बसायला काय घ्याल ? बोल.

राजू– आठवलं ! आता आठवलं ! मी लायब्ररीतच होतो. कारण संतोषने मला बघितलं ! मी त्याच्याशी बोललो सुद्धा.

चक्र– काय बोललास ?

राजू– मी त्याला म्हणालो, ' संतोष माझ्याबरोबर बँकेत चल की ! मला थोडे चेकचे पैसे घ्यायचेत.'

चक्र– चेकचे पैसे घ्यायचेत !

राजू– (घाईघाईने) नाही म्हणजे मला असं म्हणायचं होतं की चेकबुक घ्यायचंय !

चक्र– पण तू म्हणालास चेकचे पैसे घ्यायचेत. तुला चेकबुक घ्यायचं असताना तू चेकचे पैसे घ्यायचेत असं का म्हणालास ?

राजू– मला कल्पना नाही. मला माहीत नाही.

चक्र– कारण तुला चारूचा चेक वटवून पैसे घ्यायचे होते हे सत्य होतं.

राजू– नाही, नाही, तसं नाही. खरंच तसं नाही हो. त्यांना सुद्धा जीव तोडून मी हेच सांगत होतो. पण कुणीच माझं ऐकलं नाही. सगळेजण मला खोटारडा म्हणतात, चोर म्हणतात. त्यांनी मला मारलं तरी मी कबूल केलं नाही. मी जे केलंच नाही ते का कबूल करायचं ? मी गोंधळून गेलोय ! (रडायला लागतो.)

चक्र– राजू !...तू रडण्यात आणि गोंधळून जाण्यात पटाईत दिसतोस ! आणखी किती खोटया गोष्टी तू वडिलांना सांगितल्यास ?

राजू– एकही नाही. मी खरं खरं सांगतो. मी एकदाही खोटं बोललेलो नाही. अवाक्षरही खोटं बोललो नाही.

चक्र– (पुढे सरसावून) मला असं म्हणायचंय की तू जे सर्व सांगितलंस ते साफ खोटं होतं ! तू एक नंबरचा खोटारडा मुलगा आहेस.

राजू– नाही ! नाही ! मी जे सांगितलं ते खरं आहे मला खोटं बोलायची सवय नाही.

चक्र– सवय नसेल, पण तू जे मला सांगितलंस, आबांना सांगितलंस, प्रिन्सिपॉलना सांगितलंस त्यात सत्याचा अंशही नाही. तू चारूचं कपाट उघडलंस ! कपाटातील कोरा चेक लांबवलास आणि त्या चेकचे पैसे तू खोटी सही करून घेतलेस.

राजू– नाही. मी तसं केलेलं नाही. मी शपथ घेऊन सांगतो. आईरक्ताची शपथ.

चक्र– आईची शपथ इथं कुचकामाची आहे. तुझी चोरी लपविण्यासाठी तू आईच्या मागे दडतो आहेस.

तू चारूच्या सह्या गिरवायचास हे तू कबूल केलं आहेस. ड्रीलनंतर. साडेसात ते साडेदहा तू कुठे होतास याचं उत्तर तुझ्याजवळ नाही. चारूच्या चेकवरील सही तुझ्या हस्ताक्षराशी का जुळते त्याचं स्पष्टीकरण तुझ्याजवळ नाही. चेकबुक हवं असताना चेकने पैसे काढायचेत असं तू का म्हणालास याचं उत्तर तुझ्याजवळ नाही. तुला

२५ रुपायांचीच गरज होती आणि चारुच्या खात्यातून २५ रुपयेच गेलेत हा योगायोग कसा याबद्दल तुला काहीच सांगता येत नाही. तू फक्त एकच एक उगाळतो आहेस. 'मी ते केलेलं नाही' शाळेच्या इन्क्वायरीतही तुझं म्हणणं कुणीही ग्राह्य धरलेलं नाही. यावर तुला काय सांगायचंय !

राजू– मी काय सांगू ? कसं समजावून देऊ ? कुणीच माझं काहीही ऐकायला तयार नाही. सगळे म्हणतात मीच ती सही केली. मीच ते पैसे चोरले.

कमा– उगीच म्हणायला सगळ्या माणसांना वेड का लागलंय !

चक्र– मला असं म्हणायचं नाही की तू चोर आहेस. असंही नाही की तुला ते पैसे चोरायचे होते तू ते सहज गंमतीनेही घेतले असशील ! तुझी अशीही इच्छा असेल की ते पैसे चारू भेटला म्हणजे त्याचे त्याला देऊन टाकायचे.

...पण जेव्हा तो तुला भेटला आणि म्हणाला मी ही गोष्ट मुख्याध्यापकांच्या कानावर घातली आहे तेव्हा तू घाबरलास आणि गप्प बसायचं ठरवलंस !

राजू– नाही ! हेही खरं नाही.

चक्र– तू लक्षात ठेव की सतत तुझी चूक नाकारण्याने तू तुझ्या आई-वडिलांना त्रास देतो आहेस. तुझ्या हट्टी आडमुठेपणामुळे शाळेतील तुझ्या शिक्षकांना तू त्रास दिलास. आणि आता तू नाहक कोर्टांत जाऊन कोर्टाचा वेळ खाणार आहेस. तुझ्या वडीलांचे पैशापरी पैसे जाणार आहेत. तुझ्या प्रिन्सिपॉलची तशी खात्री झाली आहे. हस्ताक्षर तज्ज्ञांनी तोच निर्णय दिला आहे. इन्क्वायरीत देखील तुझ्या शिक्षकांनी तुझ्या विरुद्ध कौल दिलाय !

मी तुला हेही सांगतो की तुझा खरोखर पैसे चोरण्याचा उद्देश नसेलही. पण त्याचबरोबर हेही सांगतो की खोटं कधी पचत नाही. हीच वेळ आहे आत्ता जे खरं असेल ते कबूल केलंस तर त्यात तुझं हितच आहे.

तू जरी स्वतःच्या तोंडानं म्हणत असलास तरी माझी निश्चित खात्री पटली आहे की तू खोटारडा आहेस. तू चारूचं कपाट उघडून चेक लांबवलास. त्यावर चारूची सही करून तू पैसे काढलेस. तू चोर आहेस. चोर ! ...चोर...

राजू– (किंचाळून हुंदके देत) मी तसा नाही. मी चोरी केलेली नाही. माझ्यावर उगाच तसला आळ घेऊ नका.

आबा– राजू ! तुझ्यावर कुणीही कसलाही आळ घेत नाही. पण वकील-काकांनी तुला जे प्रश्न विचारले त्यावरून मलाही वाटतं तू खरं कबूल करावंस !

कमा– (कुत्सितपणे) एका अर्थी चक्रवर्तींसारख्यांची खात्री पटली हे बरं झालं !

राजू– नाही ! नाही हो आबा. नाही ! नाही !

(राजू ते सहन न होऊन खाली कोसळतो.)

शांतता...

चक्रवर्ती सगळीकडे नजर फिरवतात. मेजावरचे सगळे कागद गोळा करतात एक क्षण कमाकाकावर नजर स्थिरावतात.

आणि उभे राहून...

चक्र– मी ही केस स्वीकारली.

(पडदा)

◻ ◻

# अंक तिसरा

(स्थळ तेच. आई धुण्याची बादली घेऊन कपडे झटकत येते.)

आई– निघतो आहेस ना रे श्री ?

श्री– (तयारीत) हो ग !

आई– आज निकाल आहे ना ?

श्री– आज लागेल किंवा दोन महिन्यांनीसुद्धा लागेल.

आई– मी गणपतीला तोरण बांधीन बाबा.

श्री– हं ! द्या देवाला लाच.

आई– हेमा तर म्हणत होती की राजू कोर्टात काहीतरीच उत्तरं देतो.

श्री– हुच: ! हेमाला काय कळतंय.

आई– काय होतंय कोण जाणे बाई.

श्री– जिंकणार ग आपण.

आई– खरंच कारे ?

श्री– नाय बाबा. तसं आपल्याला त्यातलं काहीच कळत नाही. आयला... जेवढ्या तारखा पडल्या तेवढ्या तारखांना आपण हजर होतो. पण सालं जिंकणार की हरणार शेवटपर्यंत समजत नव्हतं.

आई– म्हणजे राजू चोरच ठरणार का ?

श्री– नाही ग माते ! तू कसली काळजी करतेस ? अमीत चक्रवर्तींच्या हातात केस दिलीय ना आपण ?

आई– हो. तुला बरे बाबा एकेक भेटतात खरे. आणलेस हो त्यांना.

श्री– मग ? हम है तो क्या कम है ?

आई– पण.

श्री– पणबिण कुछ नही· आपण जिंकणार. मी इव्हन वर्तमानपत्राच्या वार्ताहारांनासुद्धा सांगून टाकलं माते.

आई– काय ते ?

श्री– अग मी राजूचा भाऊ आहे हे समजल्यापासून कोर्टाच्या आवारात मला गराडा. सारखे राजूबद्दल प्रश्न.

एका इंग्रजी पत्राच्या वार्ताहरिणीनं मला विचारलं,

" हाऊ इज हिज बिहेविअर अॅट होम ?"

मी म्हणाल्लो ' जस्ट लाइक चम्या. ' आयला ! दिलं ठोकून इंग्रजी-तूनच कमाकाकासारखं.

' व्हाट डु यू फिल अबाऊट धिस् फोर्जरी ?' दुसरा प्रश्न.

मी म्हणालो, ' आय फिल सॉरी.'

' व्हाय्...व्हाय्. '

' इन्स्टेज ऑफ फोर्जींग ए चेक ऑफ रुपिज टवेंटी फाय हि शुड हॅव फोर्जंड् ए चेक ऑफ रुपिज ट्वेंटी फाय थाऊजंड. ' ती हदरलीच ग कटली.

आई– काहीतरीच बाबा तुझं.

श्री– अग नस्ता व्याप. पंचवीस रुपये चोरलंन् नी आबांना पाच हजारांच्या खड्डयात घालतोय.

आई– पाच हजार रुपये फी आहे का त्यांची ?

श्री– आहे. पण मागितलेत का त्यांनी ?

आई– हो· पण द्यावे लागणारच ना आज ना उद्या· त्यात मोहनरावांन. आठ हजार रुपये देण्याचं कबूल करून बसलेत हे पुढं मागं.

श्री– पुढचं पुढं ग ! तू उगाच काळजी करू नकोम. तरी मी आबांना सांगत होतो. आपण इन्क्वायरी मागितली बस्स् झालं.

आई– असं काय बोलतोस श्री ? तूच तर आणलंस ना चक्रवर्तींना ?

श्री– पण का आणलं ? इन्क्वायरीत हरल्यानंतर· आबा तापातसुद्धा बडबडत होते.

'मोठ्ठा वकील आपल्याला मिळाला पाहिजे. माझा मुलगा चोर नाही. राजू, राजू बाळ खरं सांग.' काहीतरीच.

आई– ते सगळं जाऊ देत. तू जातोस ना !

श्री– होय माते ! (आईचे खांदे धसमुसळेपणाने धरतो)

आई– अरे ! अरे ! सोड...सोड मेल्या ! (मारतात) श्री ! ए श्री ! माझं एक काम करशील का रे जाताना ?

श्री– नाही हं आई ! मला वेळ नाही.

आई– असं काय रे ! माझं सगळं आवरायचं राहिलंय बघ ! आज इतकी दमलेय मी !

श्री– काय ? सांगा.

आई– आज आपली मोलकरीणच आलेली नाही. तिच्याकडे निरोप देऊन पुढे जा की !

श्री– मी नाही हं आई ! राजूला सांग.

आई– राजू शाळेत गेलाय ! तिथून कोर्टात जाणार आहे.

श्री– आत्तापासून ? कोर्ट झाडायला ?

आई– आधी शाळेत जाणार आहे. रिझल्ट आहे ना त्याचा.

श्री– आयला काय निरोप द्यायचाय !

आई– भिमी भेटली तर तिला म्हणावं साने काकींकडचं आटपून इकडंचं ये

श्री– बरं ऽ माते ए माते आपला पण रिझल्ट अनऑफीशियली कळलाय !

आई– सुटलास का बाबा ?

श्री– अंहं !

आई– म्हणजे ? खरं सांग हं श्री ?

श्री– नुसता सुटलो नाही. सेकंड क्लास आलोय ! सेकंड क्लास.

आई– बघ. आणखी अभ्यास केला असतास तर.

श्री– आई ! सेकंड क्लास म्हणजे चांगलं हं !

आई– ह्यांना सांगितलंस का ?

श्री– आबांना ? आयला. त्यांचा अन्ऑफीशियल गोष्टीवर विश्वासच बसत नाही.

आई– बरं ! बरं ! सगळीकडे सांगू नकोस इतक्यात.

श्री– नाही ग आई ! एवढं मला समजत नाही ? फक्त तुला कळलं. ! हेमाला कळलं आणि–

(तोच हेमा प्रवेश करते, हातात औषध.)

हेमा– कळलं !

श्री– या आपणच कमी होतात. आबा कुठंत ? का गेले परस्पर कोर्टात. काय म्हणाले डॉक्टर ?

हेमा– डॉक्टर म्हणाले काही नाही. फक्त रेस्ट हवी. ब्लडप्रेशर नॉर्मल.

आई– पण एका हातला मुंग्या येतात असं म्हणत होते हे.

श्री– आबांना हाताला मुंग्या ? आयला गोड वस्तूला मुंग्या येतात आई.

आई– श्री... तू जा आता.

हेमा– तो चालला आई ! मी सांगते. (आईचं लक्ष नसताना हेमा श्रीला) " बेला कोर्टात निकाल ऐकायला आज येणार आहे. "

आई– जातोस ना ? नीघ आता लवकर.

श्री– निघतो... निघतो माते.

आई– आणि जाताना भिमाला निरोप द्यायला विसरू नकोस.

हेमा– का ग आई !

आई– अग अजून आली नाही बघ भिमा.

हेमा– मग तू कशाला कपडे धुतलेस ?

श्री– मग ? तू धुणार होतीस ? मी पिळून दिले आईला माहीत आहे ? या मोलकरणी म्हणजे...

( तोच आबा प्रवेश करतात. )

आबा– काढून टाका तिला ! उद्यापासून नको सांगा.

आई– अहो, इतकी वर्षं करतये ती काम आज एखादे दिवस नाही आली म्हणून नको ? घरात होणार आहेत का धुणी भांडी ?

आबा– ( श्रीकडे बघत ) प्रत्येकाने जेवल्यावर आपली ताटवाटी घासून ठेवायची ! आहे काय त्यात ?

श्री– बोलायला सोपं आहे आबा, पण सगळ्यांना ५० वेळा सांगायल लागेल.

आबा– आजपासून प्रत्येकाने आपली ताटवाटी जेवल्यावर घासून ठेवायची.

श्री– पण का आबा ? उद्या ती येईल मी निरोप देतोय ना.

आबा– ही शिस्त आहे. प्रत्येकाला आपलं स्वत:चं काम स्वत:लाच करता आलं पाहिजे.

श्री - मला वाद वाढवायचा नाही आबा. पण आपल्याला हे पटत नाही.

आबा– का ? काम करावं लागेल म्हणून.

श्री– तसं नाही. पण प्रत्येकाला स्वत:चं काम स्वत:लाच करता आलं पाहिजे हे तत्त्व एकदा मान्य केलं की या न्यायाने स्वत:चे केसही स्वत:च कापले पाहिजेत आणि स्वत:ची केसही स्वत:च लढवली पाहिजे. आबा

आई– श्री ! तू जातोस ना ?

श्री– पण यात चूक काय आहे आई ?

आबा–चूक नाही. पण स्पष्टच सांगायचं तर मोलकरीण येथून पुढे आप-ल्याला परवडणार नाही. आणि प्राप्त परिस्थितीला आपण सग-ळ्यांनी एकत्रितपणे तोंड दिलं पाहिजे.

श्री– असं सांगा ! हे बरोबर. ह्यात तुम्ही स्वत:ची असमर्थता व्यक्त केलीत आणि त्यात सगळं आलं.

आबा–तू असमर्थता म्हण की काही म्हण. कालच मी तुझ्या आईला एकूण खर्चाचा अंदाज दिला. आता आपल्याला अधिक काटकसरीनं राहचला हवं ! वावगी पै देखील खर्च होता कामा नये. मी स्वत: बस सोडली आहे. चहा कमी केला आहे. त्यामुळे साधारण महि–न्याला ९० रुपये वाचतात श्री ! नाटक सिनेमा वर्षभर बंद.

श्री– पण इतकी काटकसर करण्याची गरजच काय आबा ?

आबा– आत्ताच गद्रेकाका सांगत होते–कम्या त्यांना म्हणत होता. शाळा कदाचित् हायकोर्टात जाईल. आपलीही तयारी हवी.

श्री– काटकसर करायला लागत असेल तर आपण हायकोर्टात जायचं नाही.

आबा– म्हणजे ? आपण केस हरलो तरी ? आपला राजू चोर आहे हे मान्य करायचं ?

श्री– मान्य कशाला करायचं ? राजू चोर नाही असंच समजायचं. त्यासाठी हायकोर्टात जाऊन आणखी पैसे कशाला खर्च करायला हवेत. आणि

तिथेही निकाल आपल्या विरुद्ध लागला तर ? तुम्ही कुठे जाणार आहात ?

आबा– तुझ्याशी बोलण्यात काहीही अर्थ नाही.

आई– अहो, पण आतापासून इतकी काटकसर करण्याची आवश्यकता आहे का ?

आबा– कुणी काहीही म्हणालं तरी सत्यपरिस्थितीत बदल होत नाही. मी माझी बँकेतील एफ्. डी. आर. मोडतो आहे. प्राव्हिडंट फंडातूनही मी थोडं लोन काढलंय. सगळे पैसे या केसमध्ये जाणार आहेत.

श्री– 'तुम्ही आणखी जिद्द धरली तर हे घरसुद्धा जाईल आबा.' मी म्हणत नाही कमाकाकांची वाक्यं आहेत ही कोर्टात येतात ते.

आई– श्री ! श्री ! श्रीचं तुम्ही काही ऐकू नका. पण मला वाटतं हे... हे आपण आवरतं घ्यावं.

आबा– का म्हणून ? काही व्यावहारिक अडचणी आल्या म्हणून ?

आई– मी व्यावहारिक अडचणींबद्दल बोलत नाही. एकूण परिस्थितीबद्दल बोलतेय. वर्षा दीड वर्षांपूर्वी तुम्ही ज्या गोष्टींना महत्व देत होतात त्या आता तुम्हाला तितक्या महत्वाच्या वाटत नाहीत.

आबा–उदाहरणार्थ ?

आई– आपल्या मुलांचं शिक्षण, हेमाचं लग्न, आपल्या कुटुंबाचं भवितव्य. ह्या सगळ्या गोष्टींसाठी तुम्ही झटत होतात. आता या सगळ्या गोष्टी तुमच्या दृष्टीने बिन महत्वाच्या ठरल्या आहेत. कोर्ट, राजूची केस आ ण त्या केसबद्दल पेपरमधून येणाऱ्या बातम्या हेच तुमचं जग झालंय.

श्री- त्य त तुम्हाला वेगळा आनंद मिळत असेलही आबा. पण आपण जे या दीड दोन वर्षांत गमावलं ते परत मिळविण्याची शक्ती त्यात नाही. आईच्या हातात तर आता काटकसर करण्यापलीकडे काही नाही. काटकसर, आणखी काटकसर, काटकसर करता करताच ती मोडून गेलीय. तुमचं तिच्याकडे लक्षच नाही आबा.

आबा– लक्ष नसायला काय झालं.

श्री– तिच्या पायांना सूज आलीय. तरी ती धुणी घरातच करते आहे ती

डॉक्टरांकडे गेलेली नाही.

आई– माझं एक मरो ! मला काही होत नाही. पण हेमा कशी रहाते हे तुम्ही बघितलंत का ? तिला साध्या साड्यासुद्धा नाहीत. श्रीला केस कापायला पैसे दिले तरी तो दोन दोन महिने केस कापत नाही.

श्री– माझं नको हं आई ! ती स्टाईल आहे. पण आबा तुम्ही स्वतःकडे बघा ना. पण मी म्हणतो हे सारं कशाला ? आणि का ?

आबा– माझा मुलगा निरपराध आहे हे पटवण्यासाठी. त्यासाठी हवे ते कष्ट, परिश्रम व त्याग करण्याची माझी तयारी आहे.

श्री– पण हे सगळं आपल्याला परवडणारं आहे का ?

आबा– त्याचा विचार मी केलेला नाही.

श्री– पण तुम्हीच तर म्हणता की सर्वांगीण विचार करून कोणतीही गोष्ट करावी.

आबा– आज मी बदललो आहे. मी सगळ्या बाजूने विचार केला नसेल कदाचित्. पण आपल्या राजूवर झालेला अन्याय मला कदापि सहन होणार नाही. मी तत्वासाठी भांडतो आहे तुम्ही मला साथ दिलीत तर आनंद आहे. नाही दिलीत तरी–

श्री– साथ न द्यायला काय झालं आबा ? पण राजूचं आता व्यवस्थित चाललं आहे. त्याला चांगली शाळा मिळाली आहे. सगळे तो प्रकार विसरले आहेत. असं असताना तुम्ही दर कोर्टाच्या तारखेला तोच प्रकार कशाला उकरून काढता ? आजसुद्धा तिथे तोच प्रकार चालला असेल. मग राजू येणार. तुम्ही त्याला काय झालं विचारणार. मग तुम्ही त्याला रागवणार. कोर्टावर संतापणार आणि त्यावरून केसबद्दल तर्कवितर्क लढवणार.

आबा– परवा कोर्टात चक्रवर्तीसुद्धा रागवले होते. ज्या कुणाला भावना आहेत, न्याय अन्यायाची चाड आहे त्यांना एका लहान मुलावर अन्याय झाला याचा राग येणारच.

श्री– नाही आबा. तुम्हाला जे वाटतं तसं मात्र त्यांना वाटत नाही.

आबा– मग काय वाटतं त्यांना श्री ? काय हेतू आहे त्यांचा त्यात ?

श्री– ते मला नाही सांगता येणार. केसचा निकाल काहीही लागला तरी

केस छान फाईट केली असंच सगळे म्हणणार.

आणि आपल्या दृष्टीने केसचा निकाल काहीही लागला तरी आयुष्य-भर तो राजेन्द्र करमरकर केसमधील मुलगा म्हणून ओळखला जाईल. 'राजेन्द्र करमरकर' ज्याने २५ रुपयांचा चेक चोरला.

आबा– ज्याने २५ रु. चा चेक चोरला नाही.

श्री– काय फरक पडतो त्यामुळे. हजारो माणसं त्याच्याकडे गढूळ नजरेने बघणार आहेत. असं असताना त्याने तो चोरला किंवा चोरला नाही यात कुणाला काय स्वारस्य आहे ? तो या केसमध्ये होता हे तर खरं ?

'करमरकर केसमध्ये गोवलेला राजेंद्र करमरकर तुम्ही त्याच्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची भाषा करता आहात. परंतु तो जेव्हा मोठा होईल तेव्हा तो तुम्हाला क्षमा करणार नाही आबा. तुम्ही तुमचं आयुष्य त्याच्यासाठी खर्च केलंत तरी. जग बदलतंय आबा. जग झपाट्याने बदलतंय.

तुम्ही तुमच्या आजाराबद्दल शब्दही बोलत नाही. पण तुम्हाला काय त्रास होतो, किती कष्ट पडतात हे आम्हाला तुम्ही न बोलता समजतं !

तुम्ही तुमच्या प्रकृतीची हेळसांड करता. कशासाठी हा नाश आरंभ-लाय ? का ही जिद्द ?

आबा– न्यायासाठी. या बाबतीत मी कुणाचंच ऐकणार नाही. कसलीही तडजोड करणार नाही माझा मुलगा खोटं बोलणार नाही. तो चोर नाही. मी त्याच्यावर काही संस्कार केले आहेत.

श्री– संस्कार तर तुम्ही माझ्यावरही केले आहेत पण समजा हा आरोप माझ्यावर आला असता तर तुम्ही इतके झगडले असतात ?

आबा– होय श्री. मी तुझ्यासाठीही.

श्री– नाही आबा. तुम्ही खरं बोलत नाही. खोटं बोलत आहात. तुमचा चेहराच सांगतोय. आवाज सांगतोय. तुमचे शब्द तुम्हाला तरी खरे वाटतात का ?

तुम्ही न्यायासाठी भांडता आहात की तुमच्या हट्टीपणाला खतपाणी

घालण्यासाठी ? यावेळी कुणीही तुमच्या बाजूने उभे राहिले तर मी विरोध करीन आबा.

आई धुणीभांडी घरात घेणार नाही. कारण या खस्ता खाण्यात काहीच अर्थ नाही.

एका माणसासाठी कुटुंबातील सगळ्यांनी किती करावं याला मर्यादा आहेत तो आजारी असेल तर जरूर करावं ! तो संकटात असेल तर साथ द्यावी पण आपणच आपल्या कुटुंबावर जाणूनबुजून संकट ओढवून घ्यायचं आणि इतरांना त्या संकटाखाली मुद्दाम त्यागाच्या नावाखाली चेंगरून जायला सांगायचं हा कुठला न्याय ?

आबा– श्री ! दोन चार दिवसांत तुझा रिझल्ट दिसतो त्यामुळे तू अपसेट झाला आहेस.

श्री– नाही आबा तसं नाही. मी मला रिझल्ट कळलाय आबा. मी.

आबा– तू पास झालास किंवा नापास झालास तरी मला त्याचं फारसं काही वाटणार नाही

श्री– (दुखावून) का आबा ?

आबा– तू आता मोठा झाला आहेस. निदान स्वतःच्या वडिलांना शिकवण्याइतपत तर तू निश्चित मोठा झाला आहेस मी हे उपरोधिकपणाने बोलतोय किंवा तू मला विरोध केलास म्हणून मनात कटुता आणून बोलतोय असं नव्हे.

तू पास झाल्याबद्दल मी तुला कितीही शाबासकी दिली किंवा तू नापास झाल्याची मला कितीही हळहळ वाटली तरी पुढल्या वर्षी तुला स्वतःच्या पायावर उभं रहावं लागणार आहे कारण तुला माहीत आहे. यापुढे तुझा पुढील शिक्षणाचा खर्च मला झेपेलसं वाटत नाही.

तुझी इच्छा नसताना तू माझ्या बाजूने उभा राहू नकोस. पण या घरात मला विरोध करू नकोस. परिस्थिती माणसाचं सगळं बळ कमी करते तेच माझं झालं आहे

माझा मोठा मुलगा म्हणून मी तुझ्याकडून इतपत अपेक्षा केली तर तुलाही त्यात काही वावगं वाटू नये.

नोकरी मिळेपर्यंत तू इथंच राहयचवं आहेस. राग डोक्यात घालून कुठंही जायची गरज नाही.

श्री– ठीक आहे. मी निघतो आबा.

आई– नीघ तू ! आधीच तुला उशीर झालाय.

(श्री जातो.)

...अहो, काय त्याला तोंडाला येईल ते बोललात ! तो तुम्हाला त्याच्या रिझल्टचं सांगत होता. आणि तुम्ही इतका काही जीव गुंतवून घेतला आहात त्या केसमध्ये. मग काहीतरी गैरसमज होतात मुलांचे.

आबा– मघाशी त्याने उपदेशाचे डोस पाजले, आता तुम्ही. पण मी तुम्हाला सांगतो की या बाबतीत मी कुणाचं काहीही ऐकणार नाही.

(आबा जातात. मोहन येतो.)

मोहन– हेमा आहे आई ?

आई– आहे की.

मोहन– परवा कोर्टात थांबली नाही. आज ती गेली नाही ?

आई– नाही .. हेमा ! ए हेमा... (आत जातात.)

हेमा– कोर्टातून आलात ?

मोहन– हो. कमाकाका भेटले होते तुमचे. सांगत होते शाळेनं हा 'प्रेस्टीज इश्यू' केलाय ! सिघानिया स्कूल हरलं तरी हायकोर्टात जाणार !

हेमा– हं !

मोहन– मी जे काही परवा सांगितलं ते वडीलांच्या कानावर घातलंस ?

हेमा– नाही. अजून नाही.

मोहन– आठ हजार कबूल केले नी चारच हजार दिले. चार हजारात ब्लॉकची एक भिंत तरी येईल का ?

हेमा– अरे पण ! तू बघतोच आहेस सगळं ! हा खर्च... आजारपणाचा खर्च... शिवाय घर चालवायचं म्हणजे काय लागत नाही ?

मोहन– ते सगळं माहीत आहे. पण आमच्या काकांना काहीतरी उत्तर हवं तुमच्याकडून. तुम्ही दिलेला शब्दसुद्धा पाळू शकत नाही.

हेमा– मी भेटू का काकासाहेबांना ?

मोहन– त्याचा काही उपयोग होणार नाही. आज निकाल आहे ना केसचा ?

हेमा– बहुतेक.

मोहन– समजा. तुम्ही ही केस हरलात तर तुझे वडील ही केस चालविण्याचा हट्ट धरणार नाहीत ना ? मला वाटतं तरच आपलं लग्न होईल.

हेमा– का ? का बरं ?

मोहन– या केसमुळे मिळणाऱ्या अप्रसिद्धीने काका अस्वस्थ झाले आहेत. अशा ठिकाणी जुळवायचं म्हणजे...
तू पेपर वाचतेस ?

हेमा– हो

मोहन– आमचे काका तर अथपासून इतिपर्यंत वाचतात. कालचा पेपर बघितलास ? वाचकाच्या पत्र व्यवहारात एका वाचकाने लिहिलंय "राजेंद्र करमरकर विरुद्ध सिंघानिया स्कूल केस हा पैशाचा अपव्यय आहे महाराष्ट्रातच अमल्या तत्त्वासाठी भांडण्याचा मर्ख प्रकार होऊ शकतो."
माझे वडीलही या सगळ्याच्या अगेंस्ट आहेत.

हेमा– पण तुला स्वतःला काय वाटतं ?

मोहन– मी काय म्हणतो हेमा ! म्हणजे तू गैरसमज करून घेऊ नकोस. पण या सगळ्या प्रकारामुळे आपल्या लग्नात अकारण अडचणी येताहेत. माझी मावशी म्हणाली करमरकरांची मुलगी नका करू ! कारण तिच्या छोट्या भावाचे हे धंदे ! उगाच विषाची परीक्षा पहा कशाला ?

हेमा– तुला सुद्धा असंच वाटतं मोहन ?

मोहन– माझं एक जाऊ देत हेमा ! पण तुला तरी खात्री आहे का की राजूने पैसे चोरले नाहीत ?

हेमा– चक्रवर्तींची तशी खात्री आहे.

मोहन– वकीलाला तसं करावंच लागतं ! आपला अशिल निर्दोष आहे हे अशिलाच्या मनावरही बिंबवावं लागतं !

हेमा– पण असं करण्यात त्यांचा काय फायदा आहे ?

मोहन– त्यात त्यांचा किती फायदा आहे याचा विचार करण्यापेक्षा आपला किती तोटा आहे याचा विचार तू का नाही करीत.

आई वडिलांच्या मर्जीविरुद्ध लग्न करण्याच्या मी विरुद्ध आहे. म्हणूनच मी तुझ्याही घरची परवानगी घेतली. मला माझ्या वडिलांचं मन मोडायला आवडणार नाही. तेव्हा तू तुझ्या वडिलांना यापुढे तरी कोर्ट कचेऱ्या थांबवायला का नाही सांगत ?

हेमा– मोहन !

मोहन– भावनेच्या भलतीच आहारी जाऊ नकोस ! शेवटी व्यवहार सोडून चालत नाही. तुझ्या वडिलांनी जी फाइट केली ती चांगली केली. परंतु आता अति झालं आणि हसू आलं अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा कृपा करून तू तुझ्या वडिलांना आवर घाल ! त्यांना समजुतीने सांगून बघ, माझं नाही ऐकणार ?

हेमा– मी तुझं ऐकन. पण आबा माझं कसं ऐकतील ?

मोहन– हेमा तू हे कसं समजू शकत नाहीस की या महागाईच्या काळात कोर्ट कचेऱ्यात पैसा घालवणं म्हणजे अकारण उधळपट्टी आहे. थोडा तर व्यवहार बघ.

हेमा– तू काय सुचवतोस ?

मोहन– मला वाटतं पुढचं पाऊल उचलण्यापूर्वी त्यांनी एकदा काळजीपूर्वक सर्व परिस्थितीचा विचार करावा.

हेमा– पाऊल उचलण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करावाच लागेल. प्रश्न असा आहे की पुढचं पाऊल काय उचलायचं ?

मोहन– मी जर स्पष्ट बोललो तर...मला वाटतं तुला राग येणार नाही.

हेमा– मुळीच नाही. उलट तू जे सांगशील त्याचा मी विचार करीन.

मोहन– राजूने २५ रुपयाचा चेक चोरला की नाही अजून कुणालाच माहीत नाही. जवळजवळ वर्षभर तुझ्या वडीलांनी ही केस लढवली. कुणीही त्यांचं कौतुक करील.

हेमा– तुझ्या वडिलांनी नाही केलं.

मोहन– असतो एखाद्याचा स्वभाव. पण मी एखाद्या माणसाबद्दल बोलत

नाही. सर्वसामान्य माणसांबद्दल सांगतो.
एक लक्षात घे. शाळेच्या इन्क्वायरीत तुम्ही हरलात हे सत्य आहे आणि कोर्टातील जबानीवरून तुम्ही ही केस जिंकाल याची काही शाश्वती नाही. कोर्टातील निकाल किती चमत्कारिक लागतात याची कल्पना तुला आहे.
आता दुसऱ्या बाजूने विचार करायचा म्हणजे लग्न म्हटलं की सगळं आलं! खर्च आला. मला हुंडा नको. पण मुलीची बाजू म्हणजे राग येऊ देऊ नकोस! पण आजच हे सगळं तुमच्या आवाक्याबाहेर चाललंय !

हेमा– हो. पण...

मोहन– आणखी एक गोष्ट. तुझी खात्री आहे राजूने काही केलेलं नाही ?

हेमा– नाही. मलाही तसं सांगता येणार नाही.

मोहन– तुलाच काय ! कुणालाच सांगता येणार नाही. मग मी तुम्हाला असं विचारतो त्यानं काय केलं आणि काय केलं नाही यापैकी काहीही माहीत नसताना, त्यानं काहीहि केलं नाही हे सिद्ध करण्याचा खटाटोप तुझे वडील एवढा पैसा ओतून का करताहेत ?

हेमा– त्यानं तो चेक चोरला किंवा चोरला नाही हे माझ्या दृष्टीनं महत्वाचं नाही. आबांना ते महत्वाचं वाटतं.
परंतु मला आपलं ! त्यानं ते केलं नसावं. वाटतं... बस् इतकंच. पण जर माझी चूक होत असेल. त्याने ते केलेच नाही हे उभ्या महाराष्ट्राला समजावं असलीहि खुळचट महत्वकांक्षा मला नाही.
मला फक्त इतकंच वाटतं की शिस्तीच्या नावाखाली एखाद्या शाळेने कुठल्याही पोराला भडकू नये. बस् इतकंच. माझ्या दृष्टीने इतकंच महत्वाचं !

मोहन– बरोबर ! पण कोर्टाच्या दृष्टीने महत्वाचं इतकंच या १४ वर्षाच्या पोरानं २५ रु. चा चेक चोरला की नाही ?
देशात खून, दरोडे, चालू आहेत. कोर्टाने या सगळ्या गोष्टींसाठी वेळ खर्च करावा की या छोट्या पोरानं २५ रु. चेक चोरला नाही यासाठी ? तूच सांग.

हेमा– मला इतकंच समजतं मोहन की जर त्याने तो चेक घेतला नसेल तर त्याला या देशाच्या कोर्टात न्याय मिळायला हवा. नाहीतर आपण सारे पैशाने तर गरीब आहोतच पण किमान न्यायालाही पारखे होऊ. मला तुझा दृष्टिकोन समजला. एका ठराविक मर्यादेपर्यंत तो पटला.

मोहन– मला हे समजत नाही की तुम्हाला मिळणारी ही प्रसिद्धी तुम्हाला सहन तरी होते कशी ? ही केस आता इतकी रिडीक्यूल्स झाली आहे ! एखाद्या गोष्टीचं दळण किती दळायचं याला सुध्दा मर्यादा आहे. तेव्हा . . .

हेमा– मला इतकंच सांग ! . . . तुला माझ्याशी लग्न करण्याची इच्छा आहे ?

मोहन– निश्चित. तुलाही ते माहीत आहे. यापूर्वी मी कधी नाही म्हणालो?

हेमा– आता ?

मोहन– आताही नाही म्हणत नाही मी. मी फक्त तुला माझ्या विचारांची दिशा दाखवली. मला वाटतं ! . असं असं व्हावं !

हेमा– समजा ही केस आम्ही अर्ध्यावर सोडली

मोहन– तर लोक काही दिवसात हे विसरून जातील. लोकांची स्मरणशक्ती दुबळी असते. मी आई वडीलांचं मन संभाळलं असंही होईल.

. .. (शांतता) काय उत्तर समजू मी ?

(ते दोघे जवळ येतात तोच श्रीनिवास येतो)

श्री– आबा ! . आबा ! . .

ओ ! सॉरी ! . .

मोहन-- आमचं बोलणं संपलंच आहे.

श्री– ताई, आबा कुठेत ? त्यांना एक महत्वाची बातमी सांगायचीय.

हेमा– काय ती ? सांग की !

श्री– (मोहनकडे पहात) नाही ! . . . तुम्ही असलात तरी हरकत नाही. चक्रवर्तीचे सेक्रेटरी आपल्याकडेच येत होते. चक्रवर्तींचा निरोप आहे. इथं निकाल काहीही लागो. जिंकलो तरी सिंघानिया स्कूल आपल्याला हायकोर्टात नेणार ! . . हरलो तर आपल्याला पुढं जावं लागणार ! . .

(शांतता)

(हेमा आणि मोहन त्याच्या अविर्भावांकडे बघत रहातात. दारात आबा उभे )

आबा ! . . . सेक्रेटरींना आपल्या तातडीच्या सूचना हव्या आहेत. पुढं जायचं की नाही ! . . .

आबा– मी एकट्याने निर्णय घेऊ शकत नाही आता यापुढे जे करायचं ते आपल्या सर्वांच्या मते ! . . . माझे निर्णय मी कुणावरही लादू इच्छित नाही . . .

मी कशीबशी इथवर केस रेटली . . . आता माझ्यात ती शक्ती नाही तो उत्साह नाही. तेवढी उभारीही नाही.

हेमा– श्री तुम्हाला काय वाटतं ?

(श्री आणि हेमा एकमेकांकडे बघत राहतात. मोहन हेमा काय सांगते हे लक्षपूर्वक ऐकतो)

हेमा– माझ्या सूचना कायद्यात लिहिलेल्या आहेत. आबा . . हजारो दोषी कायद्याच्या कक्षेतून निर्दोष सुटले तरी हरकत नाही. परंतु एकही निर्दोष व्यक्ती दोषास पात्र होऊ नये . . .

मोहन– निर्दोष व्यक्ती ! . . . लक्षात ठेव हेमा . . .

श्री– याचा अर्थ . . .

हेमा– आता माघार घेण्यात अर्थ नाही. आता आपल्याला कुणी माघारही घेऊ देणार नाही.

मोहन– (आश्चर्याने) म्हणजे... म्हणजे... बरंय ! येतो मी.

श्री– थांबा. आपण बरोबरच जाऊ. मीही तिकडेच चाललो आहे.

मोहन– मी पुढे जातो. आपल्या वाटा वेगळ्या आहेत.

(मोहन जातो. हेमाला मोहन गेल्याचे फिल होते. आबांनाही हे समजते. श्री जातो. हेमाही निघून जाते. आबांना आभाळ कोसळल्यासारखे वाटते. तोच राजू धावत येतो.)

राजू– आबा !

आबा– काय रे राजू ? आलास ?

राजू– हो.

आबा– कोर्टात थांबला नाहीस ?

राजू– नाही आबा. माझा रिझल्ट मी काकांना दाखवला. ते म्हणाले, ' जा घरी जा... मजा कर.'
पण आबा उद्यापासून मी व्हेकेशन बॅचला जाणार नाहीए ! मला सगळेजण शाळेत चिडवतात. त्रास देतात आबा.

आबा– काय चिडवतात ?

राजू– चोर चोर पक्का चोर
दीड दमडीचा हरामखोर !
मुलं माझ्या मागे लागतात. हलकट साले !

आबा– राजू ! असं नाही बोलायचं. रडू नकोस. आपण कोर्टात गेलो की नाही ?

राजू– नाही. आबा... मी जाणार नाही... शाळेत मला त्रास देतात.

आबा– बरं ! बरं ! रिझल्ट मिळाला तुझा ?

राजू– हं ! (प्रगतीपुस्तक देतो.)

आबा– कितवा नंबर आला ?

राजू– सातवा.

आबा– का रे ? म्हणजे तू शाळेत करत काय होतास ? असा कसा खाली गेला ?

राजू– (रडवेला होत) काय माहीत ?

आबा– मार्क तर चांगले आहेत. (प्रगती पुस्तक बघतात राजू चुळबुळत तिथेच उभा रहातो.)

राजू– आबा !

आबा– आता आणखी काय हवंय ?

राजू– (घाबरत) मला तुमच्याकडून वचन हवंय !

आबा– कसलं ?

राजू– मी जर तुम्हाला काही सांगितलं तर तुम्ही मनावर घ्यायचं नाही.

आबा– बोल तर !

राजू– ही केस आपण काढून घेऊ आबा.

आबा– का ?

राजू– उगीच !

आबा– (त्याच्याकडे रोखून बघत) उगीच कसं असेल. उगीच कसं ? तू घेतला होतास तो चेक ?
(राजू मानेने हो म्हणतो.)

आबा– राजू ! ...राजू. तू पुन्हा एकदा सांग तू तो चेक घेतलास ?

राजू– मला क्षमा करा आबा.

आबा– (ओरडून त्याच्या अंगावर जात) राजू ! ...राजू.

राजू– होय आबा. ती चोरी मी केली. तो चेक मी चोरला. मला क्षमा करा...मला क्षमा करा आबा.

आबा– नाही ! नाही ! खोटं खोटं आहे हे राजू !

राजू– नाही आबा मला मोह आवरला नाही. माझ्याकडे असं बघू नका आबा. मला मारू नका. तुमच्या राजूला एकदाच क्षमा करा.

आबा– (खचत जात) राजू ! मी हरलो राजू बाप म्हणून घ्यायला मी नालायक आहे. मला पोटच्या पोराची पारख नाही. बाप अगन मला अक्कल नाही. नाही रजू. मी तुला मारत नाही खरंच रे मी तुला मारत नाही नाही रे बाबा. तुला कोण मारणार ? त्यापेक्षा मी स्वत:च्याच थोबाडात मारून घेईन. (फाड् फाड् स्वत:च्या तोंडात मारून घेतात. राजू किंचाळून रडत त्यांना धरायला धावतो.)
नको राजू नको, माझे संस्कार खोटे ठरले. माझ्या इच्छा आकांक्षांची तू राखरांगोळी केलीस ! आजपासून तु माझ्याशी बोलायचं नाही तुझे वडील तुला मेले.

राजू– आबा ! आबा ! असं काय करता आबा. (राजू त्यांच्या जवळ जातो. ते त्याचे हात झटकतात राजू त्यांच्या मागे जात.)
आबा ! मला बोला. वाटल्यास मला मारा. झोडा पण माझ्याशी अबोला धरू नका हो ! मला नाही सहन होणार ! मला तुम्ही खूप आवडता. आबा नका ना असं करू! मी नाही पुन्हा असं करणार ! खरंच नाही. ( आबा त्याचे प्रगतिपुस्तक भिरकावून देतात राजू आबा. आबा. अशी हाका मारतो. आंतून हेमा धावत येते आई

येते.)

आई ! आबा बघ ना कसं करतात ? (आई आबांच्या मागोमाग 'अहो. अहो' म्हणत जाते. हेमा प्रगती पुस्तक उचलते आणि राजूला जवळ घेऊन

हेमा– काय झालं रे राजू ? (तोच बाहेरून गद्रेकाका धावत येतात)

गद्रे– आबा ! आबा अरे केसचा निकाल लागला तुमच्या अमीत चक्रवर्तींनी कमाल केली. तुम्ही जिंकलात ! सिंघानिया स्कूल हरले. राजू! ए राजू ! अरे रडतोस कसला ? वहिनी ! कोर्टानं राजूची निर्दोष मुक्तता केली. उद्याचे सगळे पेपर मी विकत घेऊन येणार ! आणि इथे बसून राजेश करमरकर विरुद्ध सिंघानिया स्कूल केस मोठ मोठ्यांदा वाचणार ! पेढे काढा आता पेढे. (तोच बाहेरून श्रीनिवास धावत येतो)

श्री– राजू ! ए राजू ! वंडरफुल. सिंपली वंडरफूल. आबा, आहो आबा. (राजूला एकदम उचलून घेतो)

हेमाताई ! आपला राजू निर्दोष सुटला. कोर्टानं राजूची निर्दोष मुक्तता केली.

माते...ए माते.

(आईला हात धरून खेचत आणतो.)

आज कोर्टात धम्माल.

तुफान गर्दी. .मी शेवटी शेवटीच गेलो.

...पण अमीत चक्रवर्तींची उलट तपासणी बघायला तू हवी होतीस आई !

गद्रे– ...त्या जाडच्या बाईला तर त्यांनी पार खल्लास केली.

श्री– मिसेस वेर्णेकर.

गद्रे– हो.

श्री– आई ! ती कोर्टात चक्क रडायलाच लागली ग.

गद्रे– तिला त्यांच्या वकिलानं पढवलेलीन्...

श्री– चक्रवर्तींनी तिला विचारलं, 'आपण राजेश करमरकराला ओळखता? ती म्हणाली, ' हो. '

खोटा चेक राजेश करमरकरानं वटवला याची तुम्हाला खात्री आहे?
ती म्हणाली, ' हो. '
' अहो पण सगळ्याच मुलांची बँकेत खाती आहेत. '
' तरीही राजेश करमरकरला मी कुठूनही ओळखेन. '
ती म्हणाली.
आणि अक्षरश: बँड परेडप्रमाणे चक्रवर्तीनी भर कोर्टात शाळेच्या गणवेशात २५ मुलं आणली. त्यातून तिला राजूला ओळखायला सांगितलं.

आई– मग ? ओळखलं का तिनं आपल्या राजूला ?

गद्रे– छ्या: ! ती कसली ओळखतीय. शेण खाल्ल्यागत तोंड करून बसली दाखवलन् घाबरत घाबरत एकाकडे बोट.

श्री– २५ चान्सेस दिले असते तरी ओळखलं नसतं तिनं. कारण राजू त्यांच्यात नव्हताच मुळी ! अक्षरश: फूल बनवली तिला.

गद्रे– तुमच्या कम्याला तर अस्सा फैलावर घेतलाय! त्याची सगळी बत्तीशी घशात. आबाला म्हणाव तुमच्या बंधुराजांचे जे गुण तुम्हाला माहीत नव्हते ते चक्रवर्तीनं चव्हाट्यावर मांडलेन्. त्याची सगळी अंडीपिली बाहेर काढलीन्. तुम्ही आणि आबानं जोड्यानंच बघायला यायला हवं होतंत..

(अंधार)

(कोर्टाचे दृश्य)

(कोर्टात जज्ज, अमीत चक्रवर्ती आणि कमाकाका. अमीत चक्रवर्ती कमाकाकाच्या उलट तपासणीला सुरुवात करतात)

चक्र– आपलं नाव ? [पा. १ ओळ ८ पहा]

कमा– कमलाकर भास्कर करमरकर.

चक्र– आपण सिंघानिया स्कूलचे सन्माननीय सदस्य किती वर्षे आहात ?

कमा– तीन वर्षं.

चक्र– आपण सिंघानिया स्कूलमध्ये अनेक उत्तम शिक्षकांना संधी दिलीत ?

कमा– हे मीच कसं म्हणू. पण मी सिंघानियाचा स्टाफ उत्तम असावा यासाठी जातीने प्रयत्न केले.

चक्र– सहस्रबुद्धेसरांना आपल्याच प्रयत्नांनी प्रवेश मिळाला ?

कमा– त्यांच्या मेरीटवर मिळाला. मी निमित्तमात्र.

चक्र– एक सन्माननीय सदस्य म्हणून आपणाला विचारतो. शिक्षकाची क्वॉलीफिकेशन, अनुभव या व्यतिरिक्त आणखी आपण त्या शिक्षकात काय पहाता ?

कमा– मुख्य म्हणजे त्याचं चारित्र्य. त्याची कसोटी.

चक्र– आपल्या शाळेचा महाराष्ट्रात नावलौकिक आहे ?

कमा- असं मला वाटतं !

चक्र– राजेश करमरकर किंवा त्याच्यासारख्या हुशार विद्यार्थ्याला समजा तो थोडा घसरला तर आणखी एखादी संधी द्यावी असं आपणाला वाटत नाही ?

कमा– शाळेच्या शिस्तीत हे बसत नाही.

चक्र– पण आपला पुतण्या म्हणून ?

कमा– नाही. पुतण्या, काका, ही नाती कुटुंबात कर्तव्याच्या आड ती येऊ देणं मला पर्सनली स्वत:ला अयोग्य वाटतं !
चोरी म्हणजे चोरी. त्याला क्षमा नाही.

चक्र– राजूनं तो चेक चोरला आणि सही करून वटवला हे आपणाला कुणाकडून कळलं ?

कमा– सहस्रबुद्धेसरांकडून. शिवाय प्रिन्सिपॉलनीही मला हे सांगितलं.

चक्र– तुम्हाला ते पटलं ?

कमा– हो कारण मी तुम्हाला सांगितलंच की आमचा स्टाफ खोटं बोलणारा किंवा आकसानं कुणाबद्दल काही सांगणारा नाही. विशेषत: सहस्रबुद्धेसर हे तर तोलून मापून बोलणारे व काटेकोर शिस्तीचे भोक्ते आहेत खोटेपणा आणि लबाडीचा त्यांना कमालीचा तिटकारा आहे.

चक्र– आपला स्टाफ उत्तम आहे याबद्दल माझंही दुमत नाही

कमा– थँक्यू.

चक्र– पण राजूला त्याचे वय लक्षात घेता दया दाखवणं.

कमा– चोरीला आमच्या शाळेत दया, क्षमा नाही. कारण हा स्कूलच्य

प्रेस्टिजचा प्रश्न आहे.

चक्र– आपला मुलगा सिंघानियालाच असणार !

कमा– हो मनोहर राजूच्याच वर्गात आहे.

चक्र– त्याचं वय.

कमा– राजूपेक्षा एखाद वर्षानं मोठा.

चक्र– तरी राजूच्याच वर्गात ?

कमा– आजारपणामुळं त्याचं वर्ष फुकट गेलं.

चक्र– आपला मुलगा सिंघानिया स्कूलची मेरीट परीक्षा पास झाला आहे ?

कमा– सन्माननीय वकीलांना काय म्हणायचं आहे ?

चक्र– प्रश्न नको. उत्तर द्या.

कमा– मेरीट परीक्षा पास झाल्याशिवाय सिंघानिया स्कूलमध्ये कुणालाच प्रवेश मिळत नाही.

चक्र– का ? देणगीदारांच्या मुलांना कसा प्रवेश मिळतो ? मेरीटवर ?

कमा– फक्त देणगीदार वगळून. तरीही किमान गुण बघितले जातातच ?

चक्र– शाळा देणगीदारांना रीतसर रिसिट देते ?

कमा– अर्थात्.

चक्र– मनोहर देणगीदाराचा मुलगा की मेरीट लिस्टवरचा ?

कमा– म . . . मला इतकं आठवत नाही.

चक्र– पण गेल्या वर्षीच तो सिंघानियाला गेला.

कमा– हो.

चक्र– गेल्यावर्षीची मेरीट लिस्ट प्रिन्सिपॉलनी आम्हाला दाखवली त्यात मनोहरचं नाव नाही.

कमा– नसेल.

चक्र– नसेल नाही. लिस्ट कोर्टापुढे आहे. आपण बघू शकता.

कमा– आवश्यकता नाही.

चक्र– म्हणजे आपण देणगी देऊन त्याला प्रवेश दिलात असं समजायचं ?

कमा– अं ! ...हो.

चक्र– देणगीची रीतसर रिसिट शाळा देते असं आपणच म्हणलात मनोहरची देणगी दिल्याची रिसिट आपल्याजवळ आहे ?

कमा– मी ती जपून ठेवलेली नाही.

चक्र– शाळेनंही ती ठेवलेली दिसत नाही.

कमा– तुम्हाला काय म्हणायचंय ?

चक्र– कृपा करून प्रश्न विचारू नका. मला जे म्हणायचंय ते सूज्ञ जज्ज-साहेब तिथं नोट करताहेत.

कमा– केस राजूबद्दल आहे, प्रश्न राजूबद्दल विचारा.

चक्र– मला असं दाखवायचं आहे की मनोहर हा एक बिनडोक उनाड विद्यार्थी आहे.

कमा– व्हॉट यू मीन ?

चक्र– आय मीन द सेम थिंग व्हॉट यू मीन बट डोंट कन्फेस. कुठलीही गोष्ट पुराव्याने दाखविल्याशिवाय तुम्ही कबूलच करत नाही. सिंघानिया स्कूलमध्ये मार्क वाढविण्याची पद्धत आहे ?

कमा– जज्जसाहेब, आय ऑबजेक्ट. प्रश्न राजूसंबंधी विचारा मनोहर-संबंधी नको.

चक्र– मी तुम्हाला जनरल प्रश्न विचारला. सिंघानिया स्कूलमध्ये मार्क वाढवितात का ? हा प्रश्न तुम्हाला मनोहरसंबंधी का वाटला ?

कमा– मनोहरसंबंधी वाटला नाही.

चक्र– मग उत्तर द्यायला हरकत नाही.

कमा– प्रश्न असंबद्ध आहे. या प्रश्नाचा केसशी काही संबंध नाही.

चक्र– संबंध आहे की नाही ते सन्माननीय जज्जसाहेब ठरवतील.

जज्ज– प्रश्न विचारायला हरकत नाही.

चक्र– मार्क वाढवतात का ?

कमा– मला माहीत नाही.

चक्र– ही दोन ओळींची चिठ्ठी वाचा.

कमा– इतक्या लांबून मला दिसत नाही.

चक्र– (थोडे जवळ जात व चिठ्ठीतली एकच ओळ दाखवत) हे अक्षर तुमचंच.

कमा– चिठ्ठी संपूर्ण दाखवा.

चक्र– म्हणजे चिठ्ठीतला मजकूर वाचून तुम्ही हो सांगायचं की नाही.

सांगायचं हे ठरवणार का ? अहो, दोन ओळी दाखवल्या काय किंवा संपूर्ण चिठ्ठी दाखवली काय तुमचं अक्षर तुम्हाला ओळखता येतं की नाही ?

कमा - अं...हो...हो.

चक्र– अहो, हो कशाला म्हटलंत ? तुमचं अक्षर तुम्हाला ओळखता येतं की नाही ? या प्रश्नाला की हे अक्षर तुमचंच का ? या प्रश्नाला नंतर मग शब्दांची फिरवाफिरवी करू नका.

कमा– चिठ्ठीतलं अक्षर माझंच आहे.

चक्र– नक्की ? हस्ताक्षर तज्ज्ञांची गरज नाही.

कमा– नाही.

चक्र– मजकूर वाचा.

कमा– (घाम पुशीत) मनोहरचं लक्षात असू द्या.

चक्र– याचा अर्थ ?

कमा– म्हणजे. मनोहरकडे लक्ष ठेवा. तो हूड आहे.

चक्र– अहो, लक्षात असू द्या म्हणजे लक्ष ठेवा ?

कमा– माझं मराठी तितकसं चांगलं नाही.

चक्र- मग संपूर्ण चिठ्ठी वाचल्यावर तरी आम्हाला या शब्दांचा अर्थ कळतो का बघा. प्रिय सहस्रबुद्धे सर 'आजच गणिताचा पेपर झाला. आपण पूर्वी ठरविल्याप्रमाणेच करायचं एवढं मनोहरचं लक्षात असू द्या.' या चिठ्ठीत काय अभिप्रेत आहे ? मनोहरकडे लक्ष ठेवायला सांगायचंय की मनोहरच्या पेपरकडे ?

कमा– तुम्ही तुम्हाला हवा तो अर्थ काढू शकता !

चक्र– तुम्ही यातून काय अर्थ काढाल ?

कमा– मनोहरकडे लक्ष ठेवा.

चक्र– पण सहस्रबुद्धे सरांनी हा अर्थ काढला नाही. परीक्षेत गणितात मनोहरला १०० पैकी ८८ गुण मिळाले.

कमा– तो खूप झटून अभ्यास करत होता.

चक्र- अगोदर कधीही मिळालेले नाहीत.

कमा– पूर्वी तो अभ्यासाचा कंटाळा करायचा.

चक्र– खूप झटून अभ्यास करत होता तर सहस्रबुद्धे सरांना चिठ्ठी पाठवून त्याच्यावर लक्ष ठेवायला सांगायचं प्रयोजन काय ? ...की काही वेगळ्या संदर्भात ही चिठ्ठी लिहिलीत ?

कमा– आठवत नाही.

चक्र– मध्यंतरी तुमच्या मिसेसचे आणि सोसायटीतल्या क्षीरसागरबाईंचे कडाक्याचे भांडण झाले ?

कमा– बायकांच्या भांडणात मी पडत नाही.

चक्र– त्यानंतर तुम्ही मनोहरला झोडपून काढलंत ?

कमा– नाही. मी माझ्या मुलांना कधीही मारझोड करीत नाही.

चक्र– क्षीरसागरांच्या कपाटातून मनोहरने आख्खा पगार काढला असता पाच दहा रुपये देऊन तुम्ही ते प्रकरण...

कमा– नाही आख्खा पगार नाही.

चक्र– मग किती ? म्हणजे काहीतरी पैसे चोरले हे खरं ! (जज्जला) नोट इज..

चारूच्या कपाटावरही मनोहरने हाच प्रयोग केला. कुलूप तोडून चेक लांबवला. त्याच वेळी राजू तिथं आला. त्यानं मनोहरला बघितला. मनोहरनं त्याला शपथ घातली. यातलं अवाक्षरही तू कुणाजवळ बोललास तर तुझे वडील खल्लास होतील. त्यामुळे राजू घाबरला आणि गप्प बसला.

कमा– खोटं...खोटं आहे सगळं !

चक्र– पण चारुदत्तने मात्र चेक चोरीला गेल्यावर तडक प्रिन्सिपॉलकडे तक्रार केली. मनोहरला हे समजल्यावर त्याला वाटलं आता प्रिन्सिपॉल राजूला बोलावणार आणि राजू सगळं सांगणार. म्हणून त्याने घाबरून तुम्हाला सांगितलं. तुम्ही विचार करून रात्री जेवून खाऊन चारुदत्त इनामदाराकडे गेलात.

कमा– नाही. खोटं आहे.

चक्र– वहीच्या कागदावर त्याची सही घेतलीत.

कमा– साफ खोटं !

चक्र– चारुदत्तनेच त्याच्या स्टेटमेन्टमध्ये तसं लेखी दिलंय. तरी खोटं ?

नंतर दुसऱ्या दिवशी प्रिन्सिपॉलला भेटून तुम्ही राजूलाही चारुदत्तची सही करायला लावलीत.

कमा– मी नाही. प्रिन्सिपॉलनीच ती घेतली. राजूला बोलावून.

चक्र– दॅटस् इट ! म्हणजे तुम्ही प्रिन्सिपॉलकडे याच कारणासाठी गेलात हे तर खरं ? नंतर तो कागद आणि चेक हस्ताक्षर तज्ज्ञाकडे पाठवतो असं सांगून खिशात घातलात. हस्ताक्षर तज्ज्ञांकडे मात्र चारुचाच चेक आणि चारुच्याच सहीचा कागद पाठविण्याची काळजी घेतलीत. दोन्ही सह्या एकाच व्यक्तीच्या हस्ताक्षरातील आहेत असा निर्णय मिळाला.

कमा– खोटं ! खोटं आहे सगळं कशावरून ? कशावरून तुम्ही हे म्हणता?

चक्र– राजूच्या सर्व वह्या सरकारी कटसाईज कागदाच्या आहेत. त्या वह्याचे पान आठरा ओळींचे आहे चारुच्या वह्या 'डिलक्स' आहेत. त्या वह्यांचे पान १९ ओळींचे आहे. त्या सही केलेल्या कागदावरच्या ओळी मोजून पहा. १९ आहेत.

राजूने स्वतःच्या वहीला कागद फाडून त्यावर सही केली असं प्रिन्सिपॉल सांगतात. त्यामुळे १९ ओळींच्या कागदावर असलेली सही राजूची असणं शक्य नाही. ती चारूची सही आहे. आणि चेकवरही चारूची सही आहे.

का ? राजूवर बालंट आणून राजूला शाळेतून हकलून देण्याचं कारस्थान तुम्ही का रचलंत ? चारुदत्तच्या वडीलांनी तुम्हाला १५००० रुपये देण्याचं कबूल केलं म्हणून ?

कमा– ते शाळेला देणगी म्हणून दिले आहेत. त्या १५००० रुपयांची रिसिट आपण पाहू शकता. मी माझ्याच हस्ताक्षरात लिहिली आहे.

चक्र– नक्की ?

कमा– हो. नक्की.

चक्र– पण त्याची काऊंटर फॉईल मी तुम्हाला दाखवतो.

कमा– तुम्हाला . . . तुम्हाला त्याची काऊंटर फॉईल . . .

चक्र– बघा. ती फक्त १००१ रुपयांची आहे. रिसिट १५००० रुपयाची. काऊंटर फॉईल १००१ रुपयांची. १३९९९ रुपयांचं काय झालं ?

महाराष्ट्रात नाव असलेल्या आणि शिस्तीसाठी सुप्रसिद्ध असलेल्या शांतादेवी सिंघानिया स्कूलच्या सदस्याला माझा प्रश्न आहे की १३९९९ रुपयांचं काय झालं ! बोला... येस्... कम आऊट . पोराच्या अपराधावर पांघरूण घालण्यासाठी तुम्ही स्वत: किती अपराध करणार आहात ! आणखी किती गोष्टी नाकबूल करणार आहात ! जरा काही जनाची नाही पण मनाची असूद्यात.

तुमच्या खरं बोलणाऱ्या स्टाफपैकी तोलून मापून बोलणाऱ्या सहस्रबुद्धेसरांनी आम्हाला सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. तुमच्या नंतर त्यांचीच साक्ष मी काढतो आहे. या सर...

(सहस्रबुद्धे येण्याच्या आतच)

कमा– सहस्रबुद्ध्या ! ... मास्तरड्या ... शेवटी तूही सामील...

चक्र– स्टॉप इट्. हे कोर्ट आहे. (कोर्टाला)

... सरांची साक्ष काढण्याची आता गरज नाही. तुमच्या आताच्या वर्तनानं आणि अविर्भावानंच त्यांच्या साक्षीपेक्षा आधिक सगळं स्पष्ट झालं आहे, तेव्हा मी कोर्टाला विनंती करतो की...

(चक्रवर्तीचे हातवारे. कमाकाकांच्या ओठातल्या हलचाली कमाकाक कपाळावर बुक्के मारत असतानाच. अंधार )

(पुन:श्च पूर्वीचे दृश्य)

(सगळेजण हसाहेत)

गद्रे– आबा ... अहो आबा .. खाली तर या.

(आबा येतात. तोच चक्रवर्ती प्रवेश करतात)

चक्र– अभिनंदन.

आबा– थँक्यू.

चक्र-- आपण केस जिंकलो

आबा– हं ! ...

चक्र– तुम्हाला आनंद झालेला दिसत नाही.

आबा-- तसं नाही. पण आता मात्र आम्हाला पुढं जायचं नाही. शाळा गेली तरी.

चक्र– (उत्साहाने) छे ! छे !... कोर्टानं शाळेला पुढं जायची परवानगीच

दिली नाही. राजूच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून आणि बोलण्यावरून कोर्टाची खात्री पटली की तो निर्दोष आहे.

माझ्या मनावर नाही म्हटलं तरी टेन्शन होतं ! सगळ्या महाराष्ट्रातल्या सुशिक्षित लोकांचं या केसकडे लक्ष होतं. कोर्टाचा निकाल हा आपल्या बाजूने लागला हा चमत्कारच !

आबा– (मधे तोडत) जिंकलो !... चला... मला पुढचं ऐकण्यात काही स्वारस्य नाही

श्री– असं कसं म्हणता आबा! त्यांनी आपल्या राजूला न्याय मिळवून दिला

चक्र– (उत्साहाने) तुम्हाला कल्पना नाही. या केसमध्ये चेकची रक्कम किती याला महत्त्व नव्हतंच मुळी

महत्त्व होतं ते एका मध्यम परिस्थितीतील वडील आपल्या निरपराध मुलासाठी काय करतात ? कुठवर जातात ? त्या छोटया पोराच्या कॅरेक्टरवर कुठलाही कलंक लागू नये यासाठी किती धडपड करतात याला. आणि याचसाठी ही केस मी घेतली.

आबा– आपण तरी असं बोलू नका वकीलसाहेब.

(उठून जाऊ लागतात)

हेमा– आबा ! असं काय करता तुम्ही ? निदान ऐका तरी ते काय म्हणताहेत ते !

आबा– आता मला कुणाचंही काहीही ऐकायचं नाही.

श्री– पण आबा कोर्टानं. .

आबा– कोर्टानं जरी काहीही सांगितलं आणि कुणी काहीही म्हणालं तरी मला माहीत आहे.

श्री– काय ?

आबा– माझा मुलगा चोर आहे. माझ्या मुलानं तो चेक चोरला होता.

चक्र– (ओरडून) व्हाट ?

आबा– होय. कायदा आणि पालक दोघेहि गाढव असतात. त्यानं तो चेक वटवून पैसे घेतले इतक्या छोटया वयात माझा मुलगा इतका हुशार निघाला की बँकेच्या व्यवहाराची नुसती माहिती मिळवून तो स्वस्थ बसला नाही तर त्यानं सही करून पैसेही काढून दाखवण्यात यश

मिळवलं. इतकंच नव्हे तर दोषी असून निर्दोष ठरण्याचं यश मिळवलं. असं असता या केसच्या निर्णयात मला कसला इंटरेस्ट राहीलाय वकीलसाहेब.

का ?... का म्हणून मी कोर्टाची पायरी चढलो ? कशासाठी मी कोर्टाची विनवणी केली ? का म्हणून मी न्यायासाठी भीक मागितली ? माझ्या चोर मुलाला संपूर्ण निर्दोषी ठरविण्यात ?... नाही. नाही...

त्यानं माझ्या डोळ्यात धूळ फेकली. पण सोपंच होतं ते. कारण माझा त्याच्यावर भाबडा विश्वास होता. भाबडा विश्वास ठेवला की लहान मुलंदेखील फसवतं ! आणि नेमकं तेच त्यानी केलं. पण तुमच्यासारख्या कसलेल्या अनुभवी नी निष्णात वकिलाच्या डोळ्यातही त्यानं धूळ फेकावी ?

(हसत हसत) माझा मुलगा किती कमालीचा हुशार आहे याची यावरून तुम्हाला कल्पना येईल वकीलसाहेब. खूप खूप हुशार आहे तो. उगीच नाही शांतादेवी सिंघानिया स्कूलच्या परीक्षेत पहिला आला तो.

होतं असं कधी कधी ! आता प्रश्न आपली फी ! मी ती देईन. मला थोडी मुदत द्या. आपली पै न् पै मी चुकती करीन.

पण लक्षात असू द्या. माझा मुलगा चोर आहे. दोषी व्यक्तीला निर्दोष सोडवणं ही आपली बुद्धिमत्ता. म्हणून आपले पैसे दिलेच पाहिजेत. माझ्या चोर मुलाला छान सोडवलंत ! तुमचंच अभिनंदन. पण लक्षात ठेवा माय सन इज ए फोर्जर !

चक्र– (त्यांच्या पाठीवर हात ठेवीत) हू सेज सो ?

आबा– खुद्द माझा मुलगा. राजूनं तशी कबूली दिलीय.

चक्र– कुणाजवळ ?

आबा– माझ्याजवळ.

चक्र– कोर्टातही त्यानं तशी कबुली देऊन तो निर्दोष सुटला ह्यावरून काय ते समजा. कुठाय राजू ?

आबा– असेल इथंच घरात !

चक्र– त्याला बोलावून आणा माझ्यासमोर !

आबा– नको वकीलसाहेब. पुन्हा त्याच्या तोंडून ते ऐकण्याची माझ्यात शक्ती नाही. माझं मन पार मोडून गेलंय.

हेमा– (आतून येत) राजू झोपलाय ! मागच्या पडवीत.

आबा– झोपू देत बिचारा, पण वकीलसाहेब, तुम्हाला अजूनही खात्री वाटते? अजूनही तो तुम्हाला प्रामाणिक वाटतो का हो ?

चक्र– हो .. वाटतो.

असं पहा आबासाहेब ! त्या दिवशी मी त्याला प्रश्न विचारले तेव्हा अनेक गोष्टी त्याने पटापट कबूल केल्या. त्याने जर ती सही केली असती तर फार फार काळजीपूर्वक त्याने ही गोष्ट लपविण्याची धडपड केली असती. तशी धडपड मला कुठंही जाणवली नाही.

मी त्याला सतत हमरिंग करून तू चोर आहेस. तू चेक चोरलास असे म्हणत होतो आणि दुसऱ्या बाजूने हळूच सुचवून बघत होतो की जरी तू चेक घेतला असलास तरी चोरी करण्याचा तुझा हेतू नव्हता. तू तो चेक चारूची थोडी मजा करण्याकरता घेतलास. पण चेक परत करण्याअगोदरच चारूने प्रिन्सिपॉलकडे तक्रार केल्याने तुझा नाइलाज झाला.

जर राजू दोषी असता तर त्याने हे तर्कट तत्काळ मान्य केलं असतं, कारण चोरी केल्यानंतर मानाने बाहेर पडण्याचा हाच एकमेव मार्ग होता. कोणत्याही बुद्धीमान मुलाने हा मार्ग स्विकारला असता.

परंतु मी त्याला तिथं गुंतवला तिथं तो गुंतलाही नाही आणि मी जो मार्ग दर्शविला त्या मार्गाने तो सुटण्यासाठीही पुढें आला नाही.

कारण उघड होतं. त्याने तो चेक चोरलाच नव्हता. त्यामुळे असं काही जाणीवपूर्वक करण्याचा प्रश्नच नव्हता.

आबा– मग का ? कशासाठी सांगितलं त्यानं मला ?

चक्र– अहो, नुसतं तुम्हाला सांगून उपयोग काय ? कशासाठी सांगितलं हे त्याला बोलावल्याशिवाय कसं समजणार. कोर्टात देखोल तो भिजलेल्या कुत्र्याच्या पिलागत थरथरत उभा राहयचा. त्याच्या

IRBK-0119589

IRBK-0119589